सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक ११३ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



श्री रामकृष्ण परमहंस यांची आज जयंती

# चमोलीत हिमस्खलनात ५७ मजूर दबले

## ३२ जण बचावले, बचावकार्य युद्धस्तरावर



उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात शुक्रवारी महाकाय हिमकडे कोसळून, त्याखाली ५७ कामगार दबले. त्यांना बाहेर काढण्यासाठी तातडीने मोहीम हाती घेण्यात आली. आतापर्यंत ३२ कामगारांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे

**चमोली, २८ फेब्रुवारी**

शुक्रवारी सकाळी सव्वासातच्या सुमारास उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले. कामगार आठ कंटेनर आणि एका शेडमध्ये होते. बद्रीनाथला लागून असलेल्या चमोलीच्या माना गावात ही घटना घडली. येथे बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनची टीम चमोली-बद्रीनाथ महामार्गावरील बर्फ हटवण्याचे काम युद्धस्तरावर करीत आहे.

लष्कराच्या मते, घटनेची माहिती मिळताच आयबेक्स ब्रिगेडचे १०० हून अधिक जवान तातडीने बचाव कार्यात सहभागी झाले. यात डॉक्टर आणि रुग्णवाहिका कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. सकाळी ११.५० वाजता पथकाने पाच कंटेनर शोधले आणि १० कामगारांना वाचवले. या लोकांना जोशीमठ आणि माना येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. १० पैकी ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. आतापर्यंत एकूण ३२ कामगारांना वाचवण्यात आले आहे. लष्कराव्यतिरिक्त एनडीआरएफ, एसडीआरएफ, आयटीबीपी आणि बीआरओच्या तुकड्या घटनास्थळी उपस्थित आहेत.

**उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा इशारा**

उत्तराखंड येथे हवामान विभागाने २० सेमीपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. घटनास्थळी सतत पाऊस आणि बर्फवृष्टी होत आहे, त्यामुळे हेलिकॉप्टर पाठविण्यात अडचण जात आहे. एसडीआरएफच्या आयजी रिधिमा अग्रवाल यांनी बीआरओ कमांडंटचा हवाला देत सांगितले की, ही घटना बद्रीनाथ धामजवळ घडली. एसडीआरएफची एक टीम जोशीमठहून रवाना झाली आहे. लंबागड येथे रस्ता रोको आहे. सैन्य ते उघडण्यात व्यस्त आहे. दुसऱ्या पथकाला सहस्रधारा हेलिपॅडवर सतर्क ठेवण्यात आले आहे. एसडीआरएफची ड्रोन टीम देखील सतर्क आहे. (वृत्तसंस्था)

### कुल्लूमध्ये घरांमध्ये पाणी शिरले, गाड्या ढिगाऱ्याखाली

हिमाचल प्रदेशात गेल्या तीन दिवसांपासून बर्फवृष्टी आणि पाऊस पडत आहे. लाहौल स्पीती, चंबा येथील पांगी-भरमौर आणि किन्नौर जिल्ह्यातील बर्फवृष्टीनंतर रस्ते बंद करण्यात आले आहेत. २८ फेब्रुवारी रोजी सर्व शाळांमध्ये सुटी जाहीर करण्यात आली. कुल्लूच्या आखाडा बाजारात मुसळधार पावसामुळे लोकांच्या घरात पाणी शिरले. पुरामुळे अनेक वाहने ढिगाऱ्याखाली गाडली गेली.

# सरकारच्या ५०० सेवा आता व्हॉट्सअॅपवर

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा



**मुंबई, २८ फेब्रुवारी**

आशिया खंडातील सर्वांत मोठा टेक्निकल इव्हेंट मुंबई टेक वीक् पार पडत आहे. त्यामुळे मुंबई ही टेकची राजधानी आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. इतकेच नाही तर, आता राज्य सरकारच्या ५०० सेवा व्हॉट्सअॅप गव्हर्नन्सच्या माध्यमातून नागरिकांना मिळणार असल्याची घोषणा देखील त्यांनी केली. त्यासाठी राज्य सरकारने मेटा या कंपनीसोबत करार केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई टेक इव्हेंटमध्ये आम्ही मेटासोबत एक करार केला आहे. त्यानुसार राज्यातील अनेक सेवा व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मिळू शकतील. मुंबई मेट्रोचे तिकीट जेव्हा आम्ही व्हॉट्सअॅपवर आणले, त्यावेळी ५० टक्क्यांपेक्षा जास्त तिकीट व्हॉट्सअॅपवर निघाली, हे आमच्या लक्षात आले. त्यामुळे आता राज्यातील सर्व सेवा आता व्हॉट्सअपच्या माध्यमातून आपल्याला मिळू शकतील.

आता गावातील शेवटचा माणूसही व्हॉट्सअॅप वापरत आहे. त्यामुळे त्याला कुठेही ऑनलाईन जाण्याची आवश्यकता नाही. व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ५०० सरकारी सेवा तो प्राप्त करू शकतो. हा अत्यंत महत्त्वाचा करार राज्य सरकारने केला असल्याचे फडणवीस म्हणाले. (वृत्तसंस्था)

## नेपाळ, पाकिस्तानला भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** शुक्रवारी पहाटे नेपाळ आणि पाकिस्तानमध्ये भूकंपाचा धक्का जाणवला. राष्ट्रीय भूकंप संशोधन केंद्राच्या मते, भूकंपाचे केंद्र काठमांडूपासून सुमारे ६५ किलोमीटर पूर्वेला असलेल्या सिंधुपालचौक जिल्ह्यातील भैरवकुंड येथे होते. स्थानिक वेळेनुसार पहाटे २.५१ वाजता भूकंपाचा धक्का बसला, त्यामुळे मध्य आणि पूर्व नेपाळमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

माहितीनुसार, नेपाळमध्ये ६.१ इतक्या तीव्रतेचा, तर पाकिस्तानमध्ये याची तीव्रता ४.५ रिश्टर स्केल मोजली गेली. दरम्यान, यात कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

**महत्त्वाचे**

## तुहिन कांत पांडे सेबीचे नवे प्रमुख

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने वित्त सचिव तुहिन कांत पांडे यांची भारतीय सिक्युरिटीज अॅण्ड एक्सचेंज बोर्डाचे (सेबी) पुढील प्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. तुहिन पुढील ३ वर्षांसाठी हे पद भूषवतील. ते सध्याच्या सेबी प्रमुख माधवी पुरी बुच यांची जागा घेतील. ज्या शुक्रवारी निवृत्त झाल्या.



तुहिन कांत पांडे हे १९८७ च्या बॅचचे ओडिशा कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत. मोदी ३.० सरकारमधील ते भारतातील सर्वांत व्यस्त सचिवांपैकी एक आहेत. ते सध्या केंद्र सरकारमधील चार महत्त्वाचे विभाग सांभाळत आहेत. ७ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांची वित्त सचिव म्हणून नियुक्ती झाली होती. अर्थमंत्रालयाने २७ जानेवारी रोजी नवीन अध्यक्षांच्या नियुक्तीसाठी अर्ज मागवले होते.

## चाकूचा धाक दाखवून अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग

**रिसोड, २८ फेब्रुवारी**

चाकूचा धाक दाखवून एका अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग झाल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली.

पीडितेने रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ती कॉम्प्युटर क्लासमधून दुपारी सव्वादोनच्या दरम्यान घरी जाण्यासाठी रस्त्यावर आली असता तिच्याजवळ एक अनोळखी इसम आला व मी तुझ्या वडिलांचा मावस भाऊ आहे, तुझे मामा मला ओळखतात. तू माझ्या घरी चल, माझी मुलगी तुला भेटण्यासाठी इच्छुक आहे. असे सांगून तिला एका ऑटोत बसवून सवडच्या दिशेने घेऊन गेला. काही अंतरावर अत्यंत निर्जनस्थळी पीडितेला नेऊन चाकूचा धाक दाखवला व तू माझी इच्छा पूर्ण कर अन्यथा तुझा गळा चिरून विहिरीत टाकून देईन, अशी धमकी देत तिच्यासोबत अतिप्रसंग केला.

या प्रकरणी रिसोड पोलिसांनी पोक्सोनुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. घटनेचे गांभीर्य बघता पोलिस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल यांनी रिसोड पोलिस स्टेशनला भेट देऊन घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली. या प्रकरणाचा तपास ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक नागरे करीत आहेत. या प्रकरणी रिसोडचे पोलिस अधिकारी व कर्मचारी रिसोड वाशीम मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. (तभा वृत्तसेवा)

## जोस बटलरने इंग्लंडचे कर्णधारपद सोडले

**कराची :** इंग्लंडच्या जोस बटलरने एकदिवसीय आणि टी-२० स्वरूपातील संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये संघाच्या खराब कामगिरीनंतर बटलरने हा निर्णय घेतला. शनिवारी कराची येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गट फेरीच्या सामन्यात तो शेवटच्या वेळी संघाचे नेतृत्व करेल. शुक्रवारी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत बटलरने कर्णधारपद सोडण्याबद्दल सांगितले. बटलर म्हणाला, 'माझ्यासाठी कर्णधारपद सोडण्याची हीच योग्य वेळ आहे.

## रोहिंग्यांना मदत करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करा

**नवी दिल्ली, २८ फेब्रुवारी**

बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांना मदत करणाऱ्या नेटवर्कविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी एका उच्चस्तरीय बैठकीत दिला.

दिल्लीतील सुव्यवस्थेबाबत आज गृहमंत्रालयात उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत महिला सुरक्षा आणि बांगलादेशी घुसखोरांच्या मुद्यावर चर्चा झाली. याच नेटवर्कच्या मदतीने बांगलादेशी आणि रोहिंगे भारतात घुसखोरी करीत असतात. हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा असून, तो कठोरपणेच हाताळला जावा. कारवाईत कुणीही सुटता कामा नये. सोबतच मादक पदार्थांचे नेटवर्कही उद्ध्वस्त करण्यात यावे, अशी सूचना अमित शाह यांनी केली.

# भूक लागल्याने नातेवाईकांच्या घरी गेला अन् अडकला

**स्वारगेट बलात्कार प्रकरण; आरोपी दत्तात्रय गाडेला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी**

**शिरूर, २८ फेब्रुवारी**

स्वारगेट बलात्कार प्रकरणी पुण्याच्या स्वारगेट बलात्कार प्रकरणी आरोपी दत्तात्रय गाडेला अटक करण्यात आली असून त्याला पुणे कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजुची सुनावणी पार पडली व न्यायाधीश टी.एस. गायगोले यांनी आरोपीला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दोघांमध्ये संमतीने शारीरिक संबंध असल्याचा दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे. कोणताही प्रतिकार केला नाही, तरुणी स्वत:हुन बसमध्ये चढली, असाही दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे. तर सरकारी वकिलांनी आरोपीवरील गुन्ह्यांची माहिती कोर्टात दिली आहे. पिडीतेवर आरोपीने दोनवेळा बलात्कार केला. तसेच तिला आपण बसचा वाहक असल्याचे सांगीतले होते, अशी माहिती पोलिसांनी कोर्टात दिली असून १४ दिवसांची पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली आहे. तसेच आरोपीवर ६ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीने अनेकवेळा आपण पोलिस असल्याचे सांगत तरुण मुलींना फसवायचा. तसेच गाडे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## रशिया-युक्रेन युद्धबंदी अमेरिका, ब्रिटनमध्ये सहमती

**ट्रम्प-स्टारमर यांनी जारी केले संयुक्त निवेदन**

**वॉशिंग्टन, २८ फेब्रुवारी**

रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष संपवण्याच्या मुद्यावर ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात व्हाईट हाऊसमध्ये गुरुवारी चर्चा झाली. दोन्ही देशांच्या नेत्यांनी संयुक्त निवेदन जारी करीत युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे. यावेळी स्टारमर म्हणाले, आज अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांसोबत एका योजनेवर चर्चा झाली. युक्रेन आणि रशियातील संघर्ष रोखण्यासाठी करार करण्यावर ब्रिटन आणि अमेरिका पूर्ण ताकदीने मदत करणार आहे.



पत्रपरिषदेला संबोधित करताना ट्रम्प यांनी सांगितले की. युक्रेन-रशियात सुरू असलेला संघर्ष संपुष्टात यावा यासाठी आठवडाभरापासून चर्चा सुरू आहे. दोन्ही देश युद्धबंदी करार करण्यावर सहमत आहे. युद्ध

संपवण्यासाठी वाटाघाटी करण्यावर वेळ घालविण्याऐवजी प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली आहे. तीन वर्षांपासून सुरू असलेले युद्ध संपल्यानंतर युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी अमेरिका युक्रेनला मदत करणार आहे. कुठल्याही परिस्थितीत युद्धबंदी व्हावी ही अमेरिकेची भूमिका आहे. यावेळी ब्रिटिश पंतप्रधान स्टारमर म्हणाले. शांतता प्रस्थापित करायची असल्यास दोन्ही बाजूने प्रयत्न होणे गरजेचे आहे. जगाने आक्रमकांच्या बाजूने नव्हे, तर शांतता प्रस्थापित करणाऱ्यांच्या बाजूने असायला हवे. मी इतर मुद्यांवर युरोपीय नेत्यांसोबत चर्चा करीत आहे. त्यानंतर मी स्पष्ट करतो की, कराराला पाठिंबा देण्यासाठी ब्रिटन सर्वोतोपरी मदत करण्यास तयार आहे.

## बोलताना संवेदनशीलता बाळगा : मुख्यमंत्री

**मंत्री योगेश कदमांना सल्ला**

**मुंबई, २८ फेब्रुवारी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वारगेट बलात्कार प्रकरणात पीडितेने 'प्रतिकार' न केल्याच्या मुद्यावर बोट ठेवणाऱ्या गृह राज्यमंत्री योगेश कदम यांना संवेदनशीलतेने बोलण्याचा सल्ला दिला आहे.

अशा प्रकरणांत बोलताना संवेदनशीलता बाळगली पाहिजे. कारण, बोलताना चूक झाली तर त्याचा थेट समाजमनावर परिणाम होतो. त्यामुळे मंत्री असो की लोकप्रतिनिधी सर्वांनी संवेदनशीलतेने बोलावे असा माझा सल्ला आहे, असे ते म्हणालेत. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी गुरुवारी स्वारगेट बलात्कार प्रकरण 'फोर्सफुली' घडले नसल्याचा दावा केला होता. स्वारगेट एसटी स्टँडवर घडलेली घटना स्ट्रगल किंवा फोर्सफुली घडलेली कृती नाही. ही घटना घडली तेव्हा शिवशाही बसच्या आजुबाजूला १० ते १५ जण होते. पण तरुणीने प्रतिकार न केल्याने कुणालाही शंका आली नाही. परिणामी, आरोपीला गुन्हा करता आला, असे ते म्हणाले होते. या विधानावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### माढा नगरपंचायतच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी ॲड. मिनल साठे

**माढा, दि. २८ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हातील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाची एकमेव माढा नगरपंचायती च्या सभापती पदाच्या निवडणुक बिनविरोध पार पडल्या. माढा नगरपंचायतच्या स्थायी समिती अध्यक्षपदी नगराध्यक्ष मिनल साठे, बांधकाम सभापती पदी उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे, पाणीपुरवठा समितीच्या सभापती पदी शबाना बागवान, महिला व बालकल्याण समिती सभापती रेश्मा लंकेश्वर, आरोग्य सभापती मोहिनी नेटके यांची निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने माढा नगरपंचायत येथे सभापती निवडी घेण्यात आल्या त्यामध्ये पीठासीन अधिकारी म्हणून मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी काम पाहिले वरील सर्व निवडी पार पडल्यानंतर पिठासीन अधिकारी सचिन मुळे व मुख्याधिकारी नेहा कंठे यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष व सभापतींचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी नितीन साठे, विकास साठे, अजिनाथ राऊत, अरुण कदम, वंदना लंकेश्वर, निर्मला थोरात, सुनीता राऊत, राजू गोटे, मारुती पवार उपस्थित होते.



### 'मित्र प्रेम' या पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

नवोदित लेखक निलेश महामुनी यांच्या मित्र प्रेम या पुस्तकाचे प्रकाशन चौडेश्वरी मंगल भवन येथे माजी मंत्री विजयकुमार देशमुख, लेखक समीर गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण, ॲड. राजन दिक्षित, महेश धाराशिवकर यांच्या हस्ते करण्यात आले. कथा साकारत असताना ती प्रमाणित भाषेतच असावी असा दंडक नाही, आपल्या लहेजा त केलेले लेखन हे अधिक भावते, निलेश महामुनी यांनी आपल्या मित्रांना केंद्रबिंदू मानून जे लेखन केले आहे ते वाचत असताना जी भाषा वापरली आहे ती प्रत्येकास आपली वाटते, आपल्या बालपणीच्या आठवणी जाग्या करते. केलेल्या उनाडक्या, गल्लीतील घटना, उस्तव, घडलेले गंमती जागवल्या जातात. मैत्री खातर केलेल्या चुका त्यातून होणारे दुष्परिणाम याचा योग्य संदेश देण्याचा प्रयत्न या सदरातून झाले आहे वाचकांना योग्य संदेश देण्याचा प्रयत्न या पुस्तकातून झाले आहे असे मत लेखक आणि समिक्षक समीर गायकवाड यांनी व्यक्त केले. लेखन केंव्हा आणि कोठे सुचते याला महत्त्व आहे. आपलं वेळ सत्कारणी लावण्याचं काम निलेश महामुनी यांनी केले आहे, असे मत माजी मंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी व्यक्त केले.



### 'मी बाप बोलतोय' या कवितेने सभागृह मंत्रमुग्ध

**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात शिक्षणयात्रा: एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट परदेशातील उच्च शिक्षण, प्रक्रिया आणि आव्हाने या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून ॲड. दिपक चटप, लंडनची चेव्हनिंग स्कॉलरशिप प्राप्त व ॲड. प्रणव देशमुख, लंडन शिष्यवृत्तीधारक यांचे व्याख्यान आयोजित केले होते. ॲड. दिपक व ॲड. प्रणव यांनी लंडनची शिक्षण प्रक्रिया व आव्हाने यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चटप यांनी माजी कुलगुरु नरेंद्र जाधव यांचे उदाहरण देवून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्याक्षणी डॉ. राहुल पालके यांनी 'मी बाप बोलतोय' या कवितेचे सादरीकरण केले. या कवितेत बाप मुलाला घर कसे बांधायचे हे सांगतो. आईला शिव्या देण्याऐवजी शाईने संस्काराची अक्षरे गिरवायला सांगतो. भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याऐवजी खताने जमिनीचं सोनं करायला सांगतो. वाईट काम करुन तोंड काळं करण्याऐवजी काळ्या मातीशी ईमान राखायला सांगतो. जीवनात उभारी घेण्यासाठी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व संयमाने जगण्याचे सांगतो. बाप मुलाला भारत देशाची सेवा करण्यासाठी प्रवृत्त करतो. तो म्हणतो, थांब रे लेकरा, आता तू शिक याप्रसंगी जयकुमार शितोळे, खजिनदार व प्रा.डॉ. आर.आर. कोठावळे व प्रा. डॉ. अशोक कदम, डॉ. आसावरी फरताडे, प्रा. आशा कांबळे उपस्थित होते.



### शंकरलिंग प्रशालेत राष्ट्रीय विज्ञान दिन

**वळसंग, दि.२८ फेब्रुवारी-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थळंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, श्रीमंत भोसले उपस्थित होते. याप्रसंगी थोर शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विज्ञान विभागाचे बाळकृष्ण गुंड, सिद्धारूढ हिरेमठ, यांच्यासह गंगाधर बिराजदार, वीरेश थळंगे, अजय माणकोजी, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, सेवक कट्टेप्पा कोळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन तेजस्विनी ख्याडे व कुमारी जोया पठाण यांनी केले तर आभार विजय प्याटी यांनी मानले.

# तेलुगु शाळांविषयी लोकप्रतिनिधींसह महापालिका प्रशासनकडून होतोय दुजाभाव

**उर्दू व कन्नड प्रमाणे तेलुगु शाळांकडे लक्ष दिले जात नाही**

**तेलुगुभाषिक मंडळी पदावर येऊनही काहीच उपयोग झाला नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने मराठीसह उर्दू, कन्नड, तेलुगु माध्यमांच्या शाळा चालविण्यात येतात. मात्र लोकप्रतिनिधींसह महापालिका प्रशासनाकडून तेलुगु माध्यमाच्या शाळांविषयी दुजाभाव होत आहे. तेलुगभाषिक त्या त्या समाजधुरिणांचीही याबाबत अनास्था दिसून येत आहे. या सर्व प्रकारांमुळे तेलुगु शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने तेलुगु भाषाप्रेमी संत्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.

मराठी, कन्नड, तेलुगु, उर्दू, हिंदी, गुजराती यांसारख्या विविध भाषाभगिनी सोलापूर शहरात गुण्यागोविंदाने नांदत आहेत. त्यामुळे 'बहुभाषिक शहर' म्हणून 'सोलापूर'ची ख्याती सर्वदूर आहे. ही बाब लक्षात घेवूनच सोलापूर महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शहरातील विविध भागात विविध माध्यमांच्या शाळा उघडण्यात आल्या. या शाळांमधून शिक्षण घेतलेले अनेकजण




मोठमोठ्या हुद्द्यांवर, पदावर गेलेले आहेत.

सोलापूर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने तेलुगु माध्यमांच्या ४ मुख्य तर २ उपशाखा चालविण्यात येतात. कुचन हायस्कूलसमोरील कौंड, हैद्राबाद रोडवरील विडी घरकुल, गांधीनगर व सुनीलनगर येथील तेलुगु माध्यमाच्या शाळा ह्या मुख्य तर न्यू पाच्छा पेठ व शास्त्रीनगर येथील शाळा उपशाखा होत. महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या नियमानुसार तेलुगु माध्यमाच्या सर्व शाळांमधून एकूण ३५ शिक्षक असणे गरजेचे आहे. परंतु बोटावर मोजण्याइतके तेलुगु शिक्षक असून जेवढे काही शिक्षक आहेत त्यापैकी काही शिक्षक सेवानिवृत्त झालेले किंवा होत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून तेलुगु शिक्षक भरतीच न झाल्यान आहे त्या शाळाही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. विशेष म्हणजे, शिक्षण मंडळाच्या सभापती, उपसभापती, सदस्य पदांवर अनेक तेलुगुभाषिक मंडळींना संधी देवूनही त्याचा काहीही उपयोग झाला नाही, याकडेही लक्ष वेधले जात आहे. मराठी ही महाराष्ट्राची प्रमुख भाषा आहे. त्यामुळे मराठी माध्यमांच्या शाळांना देण्यात येत असलेल्या सोयी-सुविधांबाबत दुमत असण्याचे कारणच नाही. परंतु उर्दू व कन्नड माध्यमांच्या शाळांकडे ज्या आस्थेवाईकपणे लक्ष दिले जाते. त्याप्रमाणे तेलुगु माध्यमांच्या शाळांकडे लक्ष दिले जात नसल्याची खंत व्यक्त करताना तेलुगु माध्यमांच्या शाळांना वाली नाहीत का? असा संतापजनक सवाल उपस्थित केला जात आहे.

# अरणमध्ये आज शिक्षक अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २८ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती माढा तालुका या संघटनेचे त्रैवार्षिक अधिवेशन आज शनिवार (दि.१)रोजी दुपारी एक वाजता श्रीक्षेत्र अरण येथे संपन्न होणार असून यामध्ये तालुक्यातील आदर्श शाळांचा सन्मान आणि आदर्श शिक्षकांचे पुरस्कार वितरण संपन्न होणार असल्याचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत आणि माढा तालुका अध्यक्ष कैलास काशिद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. अधिवेशनात माढा तालुका शिक्षक समितीची नूतन कार्यकारिणी जाहीर होणार आहे. माढा तालुक्यातील जि. प. शाळेच्या केंद्रातील उपक्रमशील शिक्षकांना तसेच नगरपालिकेतील एक शिक्षक असे २२ शिक्षकांना गुणवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.तसेच विशेष सत्कार मुखमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये टप्पा १ व टप्पा २ मध्ये माढा तालुक्यात पहिल्या तीन क्रमांकाच्या शाळासह तालुक्यातील सहा शाळांचा गौरव करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे माजी आमदार बबनराव शिंदे, आमदार अभिजीत पाटील, नारायण पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे, विनायकराव पाटील, धनाजीराव साठे, सभापती विक्रमसिंह शिंदे उपसभापती धनाजी जवळगे जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, माजी सभापती शिवाजी कांबळे,यांच्यासह माढा तालुक्यातील व जिल्ह्यातील शिक्षक समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे राज्य नेते उदय शिंदे असणार आहेत. यावेळी शिक्षण चळवळीत संघटनेची भूमिका या विषयावर राज्याचे अध्यक्ष विजयजी कोंबे यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या अधिवेशनासाठी माढा तालुक्यातील सर्व शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य उपाध्यक्ष राजन सावंत तसेच माढा तालुकाध्यक्ष कैलास काशीद यांनी केले आहे.

# बठाण येथे घर जागेत बेकायदेशीररित्या प्रवेश करून केली मारहाण

**नऊ आरोपीविरूध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२८ फेब्रुवारी**

बठाण येथे घराच्या जागेत बेकायदेशीररित्या प्रवेश करून घराचे बाजूचे पत्रे काढून घराचे नुकसान केले.तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून या घरातून बाहेर कसे निघत नाही ते बघतोच,तुम्हाला घरातच पेटवून देतो अशी धमकी दिल्याप्रकरणी मनोज दामू भंडारे,वैशाली मनोज भंडारे,शारदा संपत भंडारे व सहा अज्ञात मुंबईच्या व्यक्तीविरोधात मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सारिका शहाजी कोडगर(वय ३५ रा.बठाण) यांचे शेजारी राहणारे आरोपी मनोज दामू भंडारे व त्यांचे नातेवाईक फिर्यादीने त्यांचे जागेत अतिक्रमण केले आहे असा गैरसमज करून घेवून वाद करीत होते. यापुर्वी हा वाद आपापसात मिटला होता. दि.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.०० च्या सुमारास फिर्यादी,फिर्यादीचा पती शहाजी,दिर लक्ष्मण व तानाजी,जाऊ सुरेखा, निशा,सासू वंदना मधूकर कोडगर,आजत सासू लक्ष्मी कोडगर व फिर्यादीची मुले घरात असताना पत्रा वाजल्याचा आवाज आल्याने फिर्यादीने घराच्या पाठीमागे जावून पाहिले असता सदर ठिकाणी आरोपी व मुंबईतील सहा अज्ञात नातेवाईक आरोपी घराच्या जागेमध्ये बेकायदेशीररित्या प्रवेश करून पत्रे काढत होते. फिर्यादीने आमच्या घराच्या बाजूचे पत्रे का काढत आहात असे विचारले असता शिवीगाळी करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच तुम्ही या घरातून बाहेर कसे निघत नाही हे बघतोच,तुम्हाला आता घरातच पेटवून देतो अशी धमकी दिली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. सदरच्या भांडणात फिर्यादीच्या सासूच्या गळयातील सोने पडून गहाळ झाले असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलिस करीत आहेत.

# श्रीमार्कंडेय दिंडी संस्थेचा श्री तुकाराम महाराज बीजोत्सव उद्यापासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

पद्मनगर येथील श्रीमार्कंडेय दिंडी संस्थेच्या वतीने रविवार, २ ते १६ मार्च या कालावधीत श्री मार्कंडेय मंदिर येथे संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज बीजोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत काकडारती, तुकाराम गाथा पारायण, हरिपाठ, ज्ञानेश्वरी प्रवचन, हरिकीर्तन, हरिजागर असे विविध कार्यक्रम होणार आहेत. पारायणास बसणाऱ्या भक्तांना संस्थेच्या वतीने तुकाराम गाथा पुरविण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष नामदेव पुलगम, सेक्रेटरी किरण श्रीचिप्पा यांनी दिली.

काशीनाथ राजूल, नारायण कोटा, राकेश अन्नम, किसन चिप्पा, ज्ञानेश्वर कोटा, बालाजी कोटा, राजू पुलगम, श्रीधर पेंटा, गोपाळ पल्ली, गोवर्धन कोटा, महेश कोटा यांच्या नेतृत्वाखाली हरिपाठ. ज्ञानेश्वर एककलदेवी यांच्या नेतृत्वाखाली तुकाराम गाथा पारायण, अंबाजी



उदगिरी, नारायण वंगा, गोपाळ सोमा, मोहन जोरीगल, सुखदेव सग्गम यांच्या नेतृत्वाखाली प्रवचन व कीर्तन होणार आहेत. रोहित जन्मले व चंद्रकांत लिंबोळे हे मृदंगाची साथसंगत करणार आहेत. हभप श्रीनिवास द्यावनपल्ली, दत्तात्रय तोडमे, संजय पाटील, माऊली बचुटे, आकाश बोरकर, सुधाकर इंगळे, गणेश पुलकुंटवार यांचे प्रवचन व कीर्तन तर तुकाराम बीजेच्या दिवशी राकेश अन्नम, ज्ञानेश्वर एककलदेवी यांचे कीर्तन होणार आहे. पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलमारी यांच्या हस्ते ध्वजारोहण, वीणा पूजन करुन या उत्सवास प्रारंभ करण्यात येणार आहे. राघवेंद्र अरकाल हे धार्मिक विधींचे पौरोहित्य करणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

### ज्ञानेश्वर मंदिरात ६ रोजी ब्रम्होत्सव

श्री माकडेय दिंडी संस्थेच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त पद्मनगर येथील ज्ञानेश्वर मंदिर येथे गुरुवार, ६ मार्च रोजी ब्रम्होत्सव या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी श्रीविठ्ठल, रुकिमणी, ज्ञानेश्वर महाराज मुर्तीस अभिषेक, गीता पारायण, लक्ष्मण चव्हाण यांचे गुलालाचे कीर्तन, डॉ.विनय गुंडला यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे, असेही पुलगम व श्रीचिप्पा यांनी सांगितले.

# शिरसी जि.प.शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीत अज्ञाताने टाकले विष

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२८ फेब्रुवारी-**

शिरसी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत असलेल्या पिण्याच्या पाणी सिमेंट टाकीत अज्ञात व्यक्तीने विषारी औषध टाकून ते दुषीत करण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,शिरसी येथे जिल्हा परिषद शाळा असून येथे पहिली ते सातवी पर्यंत वर्ग आहेत. या शाळेत सात शिक्षक कार्यरत असून दि.२८ रोजी सकाळी १०.३० च्या दरम्यान नेहमी प्रमाणे शाळा भरली होती. दुपारी २ वाजता यातील फिर्यादी प्रभारी मुख्याध्यापक प्रकाश तुकाराम कुंभार हे व वर्गशिक्षक शिवाजी लेंडवे बोलत बसलो होतो. त्यावेळी सहावी वर्गातील विदयार्थी शंभू लहूजी गायकवाड हा ऑफिसमध्ये आला व त्याने टाकीतील पिण्याच्या पाण्याचा उग्र वास येत असल्याचे सांगितले. तात्काळ मुख्याध्यापक व वर्गशिक्षक शिवाजी लेंडवे,सिध्दनाथ पाटील,भारती माने आदी शिक्षकांनी टाकीमध्ये असलेल्या पाण्याचा वास घेतला असता तीव्र घाण स्वरुपाचा वास येत होता. लागलीच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहूजी गायकवाड,उपसरपंच शहाजी आवताडे यांना ही माहिती कळविल्यावर ते टाकीजवळ हजर झाले. त्यांनीही पाण्याचा वास घेतला असता तीव्र घाण वास आला. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने शाळेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये कोणतेतरी औषध टाकून ते दुषीत करुन घाण केले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. भोसे प्राथमिक केंद्रातील डॉक्टरांनी सर्व मुलांची शाळेत येऊन तपासणी केली सर्व मुले शाळा सुटेपर्यंत व्यवस्थित आसल्याचे मुख्याध्यापकांनी माध्यमांना सांगीतले.

### बाणेगावातील तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बाणेगावात तरुणाने अज्ञात कारणातून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार गुरुवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. महेश शिवाजी मते ( वय ३०, रा. बानेगाव ता. उ. सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी महेश याने राहत्या घराच्या लोखंडे अँगलला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी गळफास सोडविले. दरम्यान रात्री नऊ पंधराच्या सुमारास त्यास त्रास होऊ लागल्याने भाऊ गणेश याने शासकीय रुग्णालयात उपचारच दाखल केले. तो शुद्धीवर असला तरी त्यास बोलता येत नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

# रमजान महिन्यात पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे

**माजी नगरसेवक तौफिक शेख यांचे आयुक्तांना निवेदन**

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. या निमित्ताने महापालिका प्रशासनाने शहरात पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे. स्वच्छतेसह विविध सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात या मागणीचे निवेदन माजी नगरसेवक तौफिक शेख यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, लवकरच मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यास सुरुवात होत आहे. महापालिका प्रशासनाने शहर व हद्दवाढ परिसरातील सर्व मशिदी व प्रार्थनास्थळे या ठिकाणी परिसरात स्वच्छता करून फवारणी करावी. परिसरातील गटारी आणि ड्रेनेजची साफसफाई करावी. पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा. दोन दिवसाआड पाणीपुरवठा करावा. प्रारंभी नूतन आयुक्त ओम्बासे यांचा माजी नगरसेवक शेख यांनी सत्कार केला. यावेळी नुरोदिन मुल्ला, आशिफ़ राजे, अखिल नाईकवाडी, साजिद शेख, असलम शेख, जुबेर इनामदार, जावेद जेडी आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील ६ महिला सरपंचांची निवड

**गटविकास अधिकारी पाटील यांचीही निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**






केंद्र सरकारकडून आंतरराष्ट्रीय महिला दिन अनुषंगाने पंचायत राज्य विभागाकडून महिला सक्षमीकरणासाठी महिला सरपंच पदाधिकारी व अधिकारी यांची दिल्ली येथे राष्ट्रीय कार्यशाळेसाठी निवड झाली आहे. या प्रशिक्षणासाठी देशभरातून ११९० महिला सरपंच प्रतिनिधींची निवड झाली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यातून महिला सरपंचांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सहा महिला सरपंचांची निवड करण्यात झाली आहे. यामध्ये तिसंगीच्या सरपंच अनिता लोखंडे, तेलंगवाडीच्या सरपंच वैशाली माळी, शेटफळच्या सरपंच लक्ष्मी वागज, चपळगावच्या वर्षा भंडारकवठे, टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा बोबडे व शिंदेवाडीच्या सरपंच रोहिणी जाधव यांच्यासह जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत विभागाचे गटविकास अधिकारी महेश पाटील या कार्यशाळेसाठी म्हणून निवड करण्यात झाली आहे. ही कार्यशाळा ४ व ५ मार्च २०२५ रोजी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे दोन दिवस चालणार आहे.



# खून प्रकरणी जन्मठेप झालेल्या आरोपींना उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

लग्नाच्या वरातीत दारू पिऊन भांडण करू नका असे सांगितल्याचा राग मनात धरून आलिम सय्यद याचा चाकूने वार करून खून केल्याप्रकरणी जन्मठेप झालेले रामेश्वर चंद्रकांत कुंभार व संतोष मधुकर गाढवे यांच्या अपिलातील जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते ढेरे व न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर होऊन न्यायमूर्तींनी दोन्ही आरोपींची जामीनवर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

या खटल्याचे हकीकत अशी की, यातील आरोपी हे एका लग्न समारंभाच्या मिरवणुकीत दारूच्या नशेत नाचत असताना त्यांचे एका सोबत भांडण झाले होते. हे भांडण मयत अलीम सय्यद हा सोडवायला गेला असताना आरोपी संतोष गाढवे व रामेश्वर कुंभार यांनी अलीम सय्यद यास शिवीगाळ केली होती. दुसऱ्या दिवशी अलीम सय्यद याने संतोष गाढवे व रामेश्वर कुंभार यांना दारू पिऊन गोंधळ करायला नको होता, मी समजावत असताना मला शिवीगाळ का केली याचा जाब विचारला होता. तू आम्हाला जाब विचारणारा कोण असे म्हणून आरोपींनी अलीम सय्यद याचा चाकूने मारून खून केला, या आरोपाखाली संतोष गाढवे व रामेश्वर कुंभार यांच्यावर खटला भरण्यात आलेला होता. बार्शी सत्र न्यायालयाने दोन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर शिक्षे विरुद्ध आरोपींनी ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. अपिलामध्ये आरोपींनी जामीन अर्ज दाखल केला होता. सदर अपिलातील जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते ढेरे व न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठांसमोर होऊन न्यायमूर्तींनी आरोपी संतोष गाढवे व रामेश्वर कुंभार यांची जामीनावर मुक्तता केली. या प्रकरणी आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने ,ॲड. यश फडतरे यांनी तर सरकारतर्फे ॲड. पी.पी. शिंदे यांनी काम पाहिले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...

### भैय्या चौकात लोखंडी अँगलला टेम्पोची धडक; घंटागाडीतील एकजण जखमी

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

भैय्या चौकात उभा करण्यात आलेले लोखंडी अँगल ला टेम्पोचा वरचा भाग धडकून काच फुटली. यात घंटागाडीतील एकजण जखमी झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ७:१५ च्या सुमारास घडला. आकाश राहुल कसबे (वय २५ रा बुधवार पेठ सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी कचरा घेण्यासाठी आकाश घंटागाडी मध्ये जात होता. दरम्यान भैया चौकातून जात असताना तेथील लोखंडे अँगलला टेम्पोच्या वरचा भाग धडकला. यामध्ये टेम्पोची काच फुटून कपाळाला लागल्याने आकाश जखमी झाला. मित्र मंगेश शिरसे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. ..

### रस्ता ओलांडणाऱ्या व्यक्तीस दुचाकी धडकून तरुण जखमी

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

कुमठा नाका ते हरीभाई देवकरण प्रशाला येथे जात असताना रस्ता ओलांडणाऱ्या व्यक्तीस दुचाकी धडकल्याने तरुण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सकाळी गांधीनगर चौकात ७.१५ वाजता घडला. सम्राट उमेश जेटीथोर ( वय १८, रा कुमठा नाका, सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी सम्राट हा दुचाकी चालवीत हरीभाई देवकरण प्रशाला येथे जात होता. दरम्यान तो गांधीनगर चौक येथे आला असता अचानक रस्ता ओलांडत असणाऱ्या व्यक्तीला तो चालवीत असलेल्या दुचाकीची धडक लागली. यात खाली पडल्याने चेहऱ्याला तसेच दोन्ही पायाला मार लागून सम्राट जखमी झाला. सकाळी ८.१५ वाजता आई पंचशील यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे. .

### वैरण कापण्याच्या मशीनमध्ये हात घातल्याने बालक जखमी

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

जनावरांसाठी वैरण कापण्याच्या मशीनमध्ये हात घातल्याने दोन वर्षाचा बालक जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी रात्री नऊ वाजता मोहोळ तालुक्यातील दाईंगडेवाडी येथे घडला. शिवांश गजानन माने ( वय २) असे जखमी बालकाचे नाव आहे. गजानन हे राहत्या घराजवळ गुरुवारी रात्री जनावरांसाठी मशिनमध्ये वैरण कापत होते. त्यावेळी शिवांश हा तेथेच खेळत होता. खेळता खेळता त्याने मशीन मध्ये हात घातला. त्यामुळे त्याच्या उजव्या हातात जखम झाली. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात त्याच्यावर उपचार करून गजानन याने रात्री अकरा वाजता सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




### उपायुक्त डॉ. दिपाली काळे व पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांना राज्य शासनाचा 'बालस्नेही पुरस्कार २०२४' पुरस्कार जाहिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे देण्यात येणारा ''बालस्नेही पुरस्कार २०२४'' हा पुरस्कार सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील उपायुक्त डॉ. दीपाली काळे आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांना जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार सोहळा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे ३ मार्च २०२५ रोजी दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, गृह राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित राहणार आहेत.

सोलापूरचे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली बालकांच्या संरक्षणार्थ केलेल्या कारवाईबद्दल शासनाच्या राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केला आहे.

### जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना उपदान व पेन्शन विक्रीसाठी ३९ कोटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातून सेवानिवृत्त शिक्षकांना पेन्शन उपदान (ग्रॅज्यूटी) पेन्शन अंशराशीकरण ( पेन्शन विक्री) रक्कम देण्यासाठी ३९ कोटी रक्कम प्रत्येक पंचायत समिती बीडीओ खात्यात जमा करण्यासाठी बीडीएस काढण्यात आली असल्याची माहीती सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष फुलारी यांनी दिली.




यापूर्वी महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अध्यक्ष शिवानंद भरले सरचिटणीस रामराव वराड (हिंगोली) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्याकडे ३१ मे २०२४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना पेन्शन अंशराशीकरण व उपदाना साठी अनुदान उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली होती . त्या प्रमाणे राज्य प्राथमिक शिक्षण संचलनालय पुणे यांच्या मार्फत राज्यातील सर्वच जिल्हा परिषदेला सुमारे १२०० ते १३०० कोटी रक्कम अनुदान उपलब्ध केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षणासाठी ३९ कोटी रक्कम प्राप्त झाली आहे ते जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती बीडीओ खात्यात जमा करण्यासाठी कार्याध्यक्ष रमेश गायकवाड, सरचिटणीस मल्लिकार्जुन बडदाळ, काळप्पा सूतार, बसवणप्पा जिरगे, भिमाशंकर म्हेत्रे, बादशहा मुल्ला यांनी पाठपुरावा केले. यावेळी जिल्ह्यातील ११०० शिक्षकाचें वैद्यकीय बीलासाठीही पाठपुरावा केला आहे.

# सोलापुरात राष्ट्रीय स्तरावरील तीन दिवसीय मल्टी-मेगा इव्हेंट

## सिंहगड महाविद्यालयात ३ मार्चला उद्घाटन | रेशीम उद्योगाची फिरती प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सिंहगड संस्थेच्या पुढाकाराने सोलापुरात प्रथमच विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी ३ ते ५ मार्च असे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावर मल्टीमेगा कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे सिंहगड संस्थेच्या सेंटर फॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंटचे संशोधक संचालक, माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजी पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

हा कार्यक्रम स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि भारत सरकार च्या कृषी मंत्रालयातंर्गत डाळिंब राष्ट्रीय संशोधन केंद्र यांच्या सहकार्यातून होत आहे.आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या तीन राज्यातील नागरिकांना या कार्यक्रमाचा फायदा होणार आहे. सोलापुरात प्रथमच विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी ३ ते ५ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सिंहगड महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. छत्रपती शिवाजी विद्यापीठाची रेशीम उद्योगाची फिरती प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यांसाठी आकर्षण राहणार आहे. दि. ३ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. स्मरणिकेचे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठचे कुलगुरू प्रा.डॉ. पी. ए. महानवर यांच्या हस्ते होणार आहे.

राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कौन्सिल प्रकल्पाचा शुभारंभ सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ.शिवराम भोजे, (माजी संचालक, इंदिरा गांधी अणु संशोधन केंद्र) यांची तर डॉ. राजीव जोशी (कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ, गुलबर्गा), एनआरसीपीचे संचालक डॉ.राजीव मराठे यांची उपस्थिती राहणार आहे. माजी कुलगुरू प्रा. एस. एच. पवार यांचे बीजभाषण होणार आहे. दि. ४ मार्च रोजी कृषी मूल्यवर्धन आणि कौशल्य विकासाद्वारे शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी उद्योजकता कार्यशाळा होणार आहे. प्रा. एस एच पवार लिखित ''औषधी वनस्पती आणि त्यांच्या बायोनोकॉम्पोझिट्समधील नॅनोटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन्स'' या पुस्तकाचे प्रकाशन सकाळी दहा वाजता डॉ. आर. सेल्वराजन, संचालक, - फॉर केळी, तिरुचिरापल्ली यांच्या हस्ते होणार आहे.




डाळिंब आणि केळीमध्ये मूल्यवर्धन आणि कौशल्य विकासावर कार्यशाळा होणार आहे. दुपारी डॉ. सोमनाथ पोखरे यांचे उद्योजकतेच्या संधी आणि डाळिंबातील वरिष्ठ वैज्ञानिक कौशल्य विकास (नेमॅटोलॉजी, -, सोलापूर उत्पादन उद्योग) यांचे मार्गदर्शन होणार आहे. उद्योजकता विकासासाठी केळीमध्ये प्रक्रिया आणि मूल्यवर्धनवर डॉ. सुरेश पी (प्र. शास्त्रज्ञ (हॉर्ट) यांचे मार्गदर्शन होणार आहे. दर्जेदार केळी उत्पादनासाठी कौशल्य विकास यावर डॉ . किरण जाधव (जळगाव) यांचे मार्गदर्शन होणार आहे. बाजरी, फुले आणि रेशीम शेतीमध्ये मूल्यवर्धन आणि कौशल्य विकासावर कार्यशाळा होणार आहे. उद्योजकता विकासासाठी फुलांमध्ये प्रक्रिया आणि मूल्यवर्धनावरही मार्गदर्शन होणार आहे. निर्यात गुणवत्तेच्या फुलांच्या उत्पादनाद्वारे उद्योजकता विकासावर डॉ. गणेश कदम, वरिष्ठ शास्त्रज्ञ (फ्लॉरीकल्चर), पुणे यांचे मार्गदर्शन होणार आहे. नंतर रेशीम शेतीमध्ये कौशल्य विकासावर विनित पवार (जिल्हा रेशीम विकास अधिकारी, सोलापूर) यांचे मार्गदर्शन होणार आहे.

दि. ५ मार्च रोजी सकाळी १०.३० ते ११ -इन्क्युबेटीस मीटचे उद्घाटन होणार आहे. नंतर तांत्रिक सत्रे होणार आहेत. दुपारी २ ते ४ पर्यंत औद्योगिक संवाद होणार आहेत. डॉ. डी.डी. शिवगन, एनपीटीएल, दिल्ली, डॉ.पी.एस.पाटील, डॉ.एस.ए.देशमुख, डॉ.एसए हेमराज यादव, डॉ. दीपक सावंत यांचे मार्गदर्शन होणार आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत महाविद्यालयीन विद्यार्थीच्या टॅलेंट सर्च क्विझ स्पर्धा होणार आहेत. सायंकाळी ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत समारंभ व बक्षीस वितरण होणार असल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेस सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, सोलापूर विद्यापीठचे बी. जे. लोखंडे, एनआरसीपीचे राजीव मराठे, निलेश गायकवाड आदी उपस्थिती होती.

# यंदाचा गळीत हंगाम लवकरच आटोपला

## ऊसतोड कामगारांनी धरली परतीची वाट!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

गेल्या ३ महिन्यापूर्वी मराठवाड्यातील बीड, परभणी व इतर भागातून सोलापूर जिल्ह्यात ऊसतोडीसाठी आलेले कामगार आता परतीच्या वाटेला लागले आहेत. दरम्यान, यावर्षी ऊसतोड हंगाम जास्त काळ चालला नसल्याने काही कामगारांनी नाराजी व्यक्त केली. कारण इतक्या लांबून यायचे आणि पैसा जास्त नाही मिळाल्यावर वाईट वाटते, अशा भावनाही काहींनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना मांडल्या.

ऊसतोड कामगार हे ऊसतोडीचे काम करतात. जेथे ऊस मोठ्या प्रमाणावर लावला आहे, तेथे जाऊन तो साखर कारखान्यांकरिता कापणारा/ तोडणारा मजूर वर्ग म्हणजे ऊसतोड कामगार. राज्यातील सोळा जिल्ह्यांत बावन्न तालुके ऊसतोड व्यवसायात आहेत. ऊसशेती गेल्या सत्तर वर्षांत महाराष्ट्रात बहरली, त्यासोबत साखर कारखाने निघाले. सोलापूर जिल्ह्यातही यंदा



जवळपास ३८ कारखाने चालू होते. या साखर कारखान्यातून आजतागायत जवळपास लाख-सव्वालाख मे. टन उसाचे गाळप या कामगारांच्या जीवावर झाले आहे. आता अत्याधुनिक यंत्रणेद्वारे ऊस कापला जात असल्याने या कामगारांचे कष्टही कमी झाले आहेत.दरवर्षी हे कामगार ऊसतोडणीच्या हंगामाचे पाच-सहा महिने ऊस कापण्याचे काम करीत असतात. यंदा मात्र ३ ते साडेतीन महिनेच या कामगारांना काम मिळाले आहे. गतवर्षी सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने यंदा ऊस कमीच होता. डोक्यावरील कर्जाचे/ देण्याचे ओझे दुसऱ्या गावी जाऊन, श्रम करून खांद्यावर आणायचे आणि लगेच, पुन्हा कर्जबाजारी होऊन, पुढील वर्षीच्या कर्जफेडीच्या त्याच मार्गाला लागायचे ! अशी अनेक ऊसतोड कामगारांची जगण्याची रीत असते. हे कामगार कडाक्याची थंडी, कोसळणारा पाऊस आणि कडाक्याचे ऊन सहन जीवन जगतात. तरीही ते कुटुंब संस्था व गाव संस्कृती जपत असतात.

कामगाराने ऊसतोडणीच्या हंगामाचे पैसे इसार म्हणून मुकादमाकडून आधीच घ्यायचे अशी पद्धत आहे. त्यात एक कामगार म्हणजे एक कोयता असा हिशोब. पहिल्या हंगामात पडेल तेवढ्या पावसावर खरिपाचे येईल ते पीक पदरात पाडून घ्यायचे आणि दिवाळी झाली की बैलगाड्या, ट्रॅक्टरद्वारे आपल्या गुराढोरांसह पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांवर, मुकादम सांगेल तिकडे निघायचे, हा त्या कामगारांचा दर वर्षीचा जीवनक्रम. विविध जिल्ह्यांमधून दरवर्षी तब्बल दहा ते बारा लाख कामगार स्थलांतर करतात. यांच्या जिवावर चाळीस हजार कोटी रुपयांचा साखर उद्योग चालतो. ऊसतोड कामगार हे कोरडवाहू जमिनीचे मालक, अल्पभूधारक. वर्षानुवर्षांचा दुष्काळ त्यांच्या डोक्यावर. शिक्षण जेमतेम अक्षरओळख इतपत. तरीही अती कष्ट करून आपले जीवन जगताना दिसतात. यंदा या भागात ऊसतोडीचे काम कमी मिळाल्याची खंत व्यक्त करून ते आपापल्या गावी निघून गेले आहेत. आता दिवाळीनंतरच त्यांचा सोलापूर जिल्ह्याचा पुन्हा प्रवास सुरू होणार आहे.



# मराठी माध्यमांची शिक्षक भरती करा

**सीईओ, शिक्षणाधिकारी यांच्याकडे विद्यार्थ्यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

दुसऱ्या टप्यातील शिक्षक भरतीसाठी शिक्षण विभागातर्फे जाहिराती देण्यासाठी २० जानेवारी ते २० फेब्रुवारीची मुदत दिली होती. सुधारित संचमान्यतेसाठी वेळ वाढविल्याने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्याची भावी शिक्षकांना प्रतीक्षा आहे.

दुसऱ्या टप्प्यात शिक्षक भरतीला सुरुवात झाली असून राज्यातील सर्व माध्यमिक उच्च माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागांमध्ये १० ते १२ हजार जागा भरती होणार असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचाही समावेश आहे. सोलापूर जिल्हा परिषद मधील पवित्र पोर्टल टप्पा पहिला टप्पा मध्ये कपात केलेली मराठी माध्यमाची १० टक्केच्या तुलनेत रिक्त, अपात्र, गैरहजर पदे संच मान्यता २०२२-२०२३ नुसार शिक्षक भरती दुसरा टप्पा मध्ये पूर्ण क्षमतेने भरल्यास जिल्ह्यातील अभियोग्यताधारकांना जिल्ह्यातच काम करण्याची संधी मिळेल.

> ७० टक्के पदभरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे . मराठी माध्यमाच्या दहा टक्के रिक्त पदे अपात्र व गैरहजर पदे यावेळी भरण्यात यावी. कन्नड माध्यमाच्या आरक्षणानुसार ईडब्लूएस व खुल्या जागा सुधारित बिंदूनामावली नुसार जाहिराती प्रसिद्ध करण्यात यावे.
>
> **- प्रशांत शिरगुर,**
> राज्य उपाध्यक्ष पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना



# मराठी भाषेचे संवर्धन करणे सर्वांची जबाबदारी : डॉ. पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

मराठी भाषा ही सर्वगुणांनी संपन्न आहे. आपल्या मराठी भाषेचे संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मधुकर पवार यांनी केले.

छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ.अरुण मित्रगोत्री प्रा सचिन गायकवाड, प्रा. डॉ. अभिमन्यू ओहळ यांची उपस्थिती होती. डॉ. मधुकर पवार म्हणाले की, आपल्या मराठी भाषेविषयी जागृती होणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानातून कुसुमाग्रजांच्या साहित्यावर ओघवत्या शैलीने प्रकाश टाकला. प्रा. डॉ. अरुण मित्रगोत्री म्हणाले की भाषेचा प्रचार आणि जतन करणे साहित्याला प्रोत्साहन देणे आणि मराठी भाषेमध्ये अभिमानाची भावना निर्माण करणे तरुण लेखक कवी आणि विद्यार्थ्यांना भाषेच्या सौंदर्याची प्रशंसा करण्यासाठी प्रेरित करणे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. प्रास्ताविक प्रा. डॉ. अभिमन्यू ओहळ यांनी केले. तर आभार श्रेया मॅकलवार यांनी मानले.

# नेतृत्वाचा पाया मजबूत तर विकासाचे शिखर दिसणार

## विजयकुमार पिसे : युवा चेतना शिबिरात नेतृत्व विकासवर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

नेतृत्वाचा पाया मजबूत तर विकासाचे शिखर दिसणार. तसेच देवळाचे शिखर साकारेल, असे विचार जुळे सोलापूर येथील विवेकानंद केंद्रात पार पडलेल्या युवा चेतना शिबिरात विश्व हिंदू परिषदेचे विभाग सहमंत्री तथा ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार पिसे यांनी व्यक्त केले. नेतृत्व विकास या विषयावर पिसे यांचे युवक, युवतींसाठी व्याख्यान झाले.

जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंच आणि विवेकानंद केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने युवा चेतना शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचे उदघाटन अभियंता शुभम भागवत यांचे हस्ते झाले. याप्रसंगी युवा चित्रकार संकेत गुळेद, वि.के.वयंचे प्रकल्प प्रमुख सुहास देशपांडे, मंचचे अध्यक्ष कृष्णा सुरे, उपाध्यक्ष प्रा.चंद्रशेखर टोणपे, सचिव ज्ञानेश्वर सपकाळ, सुभाष गायकवाड, दत्तात्रय गायकवाड, निवृत्ती गायकवाड, ज्ञानेश्वर एडके, गिरीश गुळेद, शुभम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.



विजयकुमार पिसे यांनी नेतृत्व विकास यावर मार्गदर्शन करताना गणराय अधिपती, श्रीकृष्णनीती, चाणक्य चंद्रगुप्त, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य, क्रांतीकारक मंगल पांडे, झांशीची राणी, तात्या टोपे, पेशवाईच्या काळात मराठेशाहीचा अटकेपार झेंडा, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व यांची उदाहरणे दिली. तसेच ज्ञानोबा रचिला पाया, तुका झालासे कळस या अभंगाचा दाखलाही दिला.

१८५७ चे पहिले स्वातंत्र्युध्द १९७५ आणिबाणीपर्व, जयप्रकाश नारायण, शेतकरी संघटनेचे शरद जोशी अण्णा हजारे यांची आंदोलने, या चळवळींतून तयार झालेले नेतृत्व आणि विकास याकडे लक्ष वेधले. संघप्रचारक वसंत भागवत यांचा माधव पॅटर्न, एकनाथजी रानडे यांनी कन्याकुमारी येथे साकारलेले विवेकानंद शीलास्मारक, रामजन्मभूमी आंदोलनाची पार्श्वभूमी सांगितली. ज्येष्ठ संघ प्रचारक मोरोपंत पिंगळे रामजन्मभूमीच्या संपूर्ण आंदोलनाचे सरसेनानी होते. प्रदीर्घ काळ आंदोलन आणि चळवळीतून नेतृत्व घडले. टीमवर्क तयार झाले. त्याची फलश्रृती म्हणजे साडेपाचशे वर्षानंतर राममंदिरचे निर्माण. हे केवळ राममंदिर नव्हे तर राष्ट्रमंदिर आहे. आम्ही बिघडलो, तुम्ही बिघडाना असे आवाहनही पिसे यांनी केले. अन्य सत्रांमध्ये मदगोंडा पुजारी, सागर एकबोटे, सुहास देशपांडे, हेमंत भागवत, श्रीकांत गायकवाड, पत्रकार रजनीश जोशी, साहित्यिक प्रा. शरदकुमार एकबोटे, प्रा. श्रीराम जोशी यांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सृष्टी तरटे, वंदना ढगे, दीपाली एकबोटे, सई ढगे यांनी केले.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना

# राज्याचे १०० दिवसांचे उद्दिष्ट ८२ दिवसात पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या पहिल्या शंभर दिवसात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या सव्वा लाखापेक्षा अधिक करण्याचे आणि एकूण वीजनिर्मिती क्षमता ५०० मेगावॅट करण्याचे उद्दिष्ट महावितरणने ८२ दिवसात पूर्ण केले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर शंभर दिवसात म्हणजे दि. १६ मार्च २०२५ पर्यंत विविध विभागांसाठी उद्दीष्टे निश्चित करण्यात आली आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेणाऱ्या घरांची एकूण संख्या दि. ६ डिसेंबर रोजी



७१,४३७ होती व त्यांची एकूण क्षमता २८३ मेगावॅट होती. शंभर दिवसांच्या मोहिमेत एकूण घरांची संख्या १.२५ लाख व एकूण वीजनिर्मिती क्षमता ५०० मेगावॅट करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले होते. राज्यात दि. २६ फेब्रुवारी रोजी योजनेच्या लाभार्थी घरांची संख्या १,२८,४७० व एकूण क्षमता ५०० मेगावॅट झाली होती. या योजनेचे शंभर दिवसांचे उद्दीष्ट ८२ दिवसात पूर्ण झाले. या आधी महावितरणने मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत बसविण्यात आलेल्या पंपांची संख्या दीड लाखापेक्षा अधिक करण्याचे शंभर दिवसांचे उद्दिष्ट साठ दिवसात पूर्ण केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली होती. योजना सुरू झाल्यानंतर ५ डिसेंबरपर्यंत राज्यात ७१ हजार ४३७ घरांना लाभ झाला होता तर त्यानंतर शंभर दिवसांच्या मोहिमेत ८२ दिवसात ५७,०३३ घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यात आले. योजनेत आतापर्यंत राज्यातील लाभार्थी कुटुंबांना एकूण ८०० कोटी रुपयांचे अनुदान ग्राहकांच्या खात्यात थेट देण्यात आले आहे.

### ● सोलापुरात ४ हजार ७ लाभार्थी

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यामध्ये राज्यात नागपूर जिल्ह्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे. नागपूरमध्ये आता लाभार्थी घरांची संख्या २१,०२७ झाली आहे. नागपूरनंतर पुणे (९८७५ घरे), जळगाव (९४८९ घरे), छत्रपती संभाजीनगर (८८१४ घरे), नाशिक (८५५८ घरे), अमरावती (७११९ घरे), कोल्हापूर (६२९१ घरे), धुळे (४१८७ घरे) आणि सोलापूर (४००७ घरे) या जिल्ह्यांचा क्रम लागतो.

### ● सौर ऊर्जा प्रकल्पात गरजेपेक्षा अधिक वीज निर्मिती

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवून वीजनिर्मिती केली जाते. त्यासाठी केंद्र सरकारकडून सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाच्या क्षमतेनुसार एक किलोवॅटला ३० हजार रुपये, दोन किलोवॅटला ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. जास्तीत जास्त अनुदान ७८ हजार रुपये आहे. महावितरणतर्फे ग्राहकांना नेट मिटर मोफत दिला जातो. छतावरच्या सौर ऊर्जा प्रकल्पात घराच्या गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्याने वीजबिल शून्य होते. गरजेपेक्षा जास्त निर्माण झालेली वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते.

## अग्रलेख...

# नौटंकीबाज केजरीवाल आणि आपचे आमदार

दिल्लीत आम आदमी पक्षाला जनतेने सत्तेवरून पायउतार केल्यानंतरही या पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, माजी मुख्यमंत्री आतिशी तसेच पक्षाच्या अन्य नेत्यांचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. हे सर्व नेते बावचळल्यासारखे दिसत आणि वागतही आहेत. केजरीवाल आणि त्यांचा पक्ष हीच मोठी नौटंकी आहे. सुरुवातीला वेगवेगळ्या प्रकारची नौटंकी करून या लोकांनी दिल्लीच्या जनतेच्या डोळ्यात धूळ झोकली. यातून जवळपास १० वर्षे दिल्लीत सत्ता उपभोगली. केजरीवाल आणि त्यांच्या भ्रष्ट मंत्र्यांनी सत्तेचा आनंद लुटला, असे म्हणण्यापेक्षा दिल्लीला लुटले, असे म्हणणे जास्त योग्य ठरेल. त्यामुळे केजरीवाल आणि आपचे नेते म्हणजे अलिबाबा आणि चाळीस चोरसारखे आहेत. या अलिबाबाने आणि त्यांच्यासोबतच्या चाळीस नाही तर साठावर चोरांनी १० वर्षांत पूर्ण दिल्ली लुटली. दिल्लीची तिजोरी खऱ्या अर्थाने रिकामी केली. केजरीवाल आणि आपच्या अन्य नेत्यांची वागणूक आतापर्यंत जगातील कोणतीही शक्ती आपल्याला सत्तेवरून खाली खेचू शकत नाही, सत्तेचा अमरपट्टा घेऊन आपण आलो, अशी बेमुर्वतखोरीची होती. पण नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने त्यांना नुसता धडाच शिकवला नाही तर त्यांची लायकीही दाखवून दिली. पराभवानंतर केजरीवाल आणि आपच्या नेत्यांनी जनतेचा हा कौल मोठ्या मनाने स्वीकारायला पाहिजे होता, आपल्या पराभवाचे आत्मचिंतन करायला पाहिजे होते. दिल्लीच्या जनतेने सलग दोनदा आपल्याला प्रचंड बहुमताने निवडून दिले, मग यावेळी असे काय झाले, त्याच जनतेने आपला निवडणुकीत पराभूत केले. याचे कारण केजरीवाल आणि अन्य आप नेत्यांनी शोधायला पाहिजे होते, पण तसे न करता केजरीवाल आणि अन्य नेते कारण नसताना रस्त्यावर उतरत आपल्या नकारात्मक मानसिकतेचे दर्शन घडवत आहेत. कारण नसताना आक्रस्ताळेपणा करीत आहेत. आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यातील सीमारेषा खूप धूसर असते, आक्रमकता कुठे संपते आणि आक्रस्ताळेपणा कधी सुरू होतो, हे भल्याभल्यांना समजत नाही. आज आपच्या नेत्यांमध्येही हेच सुरू आहे. मुळात कोणताही विजय हा जसा अंतिम नसतो, तसा पराभवही अंतिम नसतो. निवडणुकीतील विजयाचे रहाटगाडगे कधी हार तर कधी जीत याप्रमाणे सुरू असते. त्यामुळे विजयाने जसे उन्मत्त व्हायचे नसते, तसेच पराभवाने निराशेच्या अंधकारात पडायचेही नसते. जनतेने दिलेला कौल मोठेपणाने मान्य करत जनतेने दिलेली विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी आपने प्रामाणिकपणे पार पाडायला पाहिजे. पण तसे न करता आपचे नेते विनाकारण भाजपाला घेरत आहेत, नको ते मुद्दे उचलत आपल्याच मूर्खपणाचे प्रदर्शन करीत आहेत. विरोधी पक्ष म्हणून आपला सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे. सरकार चुकत असेल तर आपने मंत्री आणि मुख्यमंत्र्यांची कानउघाडणीही करायला हरकत नाही. पण त्यासाठी नव्या मंत्र्यांना आणि मुख्यमंत्र्यांना आपले काम समजून घेऊ दिले पाहिजे, थोडे स्थिरस्थावर होऊ दिले पाहिजे. भाजपाच्या दिल्लीतील नव्या मंत्र्यांना अगदी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना कोणताही प्रशासकीय अनुभव नाही, हे जगजाहीर आहे. पण आज जी रेखा गुप्ता आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील अर्धा डझन मंत्र्यांची उणी बाजू वाटत असली, तरी हीच उद्या त्यांची जमेची बाजू ठरणार आहे.

दिल्लीत यावेळी भाजपाचे ४८ तर आपचे फक्त २२ आमदार निवडून आले. पण १० वर्षे सलग सत्तेवर राहूनही आपच्या आमदारांना विधानसभेत कसे वागायचे ते समजत नाही, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. भाजपाच्या राज्यातील नव्या सरकारने जे केलेच नाही, त्याचे खापरही आपचे हे दिवटे आमदार मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि त्यांच्या सरकारवर फोडत आहेत. यातून दोन समाजात संघर्ष निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. भाजपाच्या नव्या सरकारने सर्व मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हुतात्मा भगतसिंग यांच्या प्रतिमा हटवल्या, असा पूर्णपणे खोडसाळ आरोप अल्पकाळासाठी का होईना, मुख्यमंत्री राहून चुकलेल्या आणि आता विरोधी पक्षनेते असलेल्या असलेल्या आतिशी यांनी केला. प्रत्यक्षात भाजपाने या दोन महापुरुषांच्या प्रतिमा हटवल्या नाही तर या दोन महापुरुषांसोबत राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमा दिल्लीच्या मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात लावल्या. राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्या प्रतिमा सर्व सरकारी कार्यालयात लावणे हा राजशिष्टाचाराचा भाग आहे. कारण राष्ट्रपती आणि पंतप्रधान हे कोणत्याही पक्षाचे नसतात तर देशाचे असतात. महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपती आणि पंतप्रधान ही दोन पदे पक्षीय राजकारणाची नसतात, तर घटनात्मक असतात. खरं म्हणजे दिल्लीत केजरीवाल यांचे सरकार असताना दिल्ली सरकारच्या सर्व कार्यालयांत त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांची छायाचित्रे लावायला पाहिजे होती. त्यावेळी केजरीवाल सरकारने जाणीवपूर्वक केलेली चूक रेखा गुप्ता यांच्या सरकारने दुरुस्त केली तर त्यात आकाशपाताळ एक करण्याचे कारण नाही. या मुद्यावरून विधानसभेत धुडगूस घालण्याचे तर काही कारण नव्हते. पण तेवढे भान आपच्या आमदारांना ठेवता आले नाही. त्याची परिणती साहजिकच त्यांच्या निलंबनात झाली. विरोधी पक्षनेत्या आतिशी यांच्यासह आपच्या २२ पैकी २१ आमदारांना तीन दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. आपचे एक आमदार अमानुल्लाह खान यातून बचावले, म्हणजे निलंबित झाले नाहीत. याचा अर्थ ते खूप नीतिनियम आणि कायदा पाळणारे होते, असे नाही, तर दुसऱ्या गुन्ह्यात ते तुरुंगात होते, हे त्याचे खरे कारण आहे. दिल्ली विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांचे भाषण सुरू असताना आपच्या आमदारांनी घोषणाबाजी करत त्यांना भाषण करणे कठीण करून टाकले. आपल्या कृतीने त्यांनी नायब राज्यपालांचाच नाही तर एकप्रकारे दिल्लीच्या जनतेचाही अपमान केला. आपच्या आमदारांची विधानसभेतील जी कृती होती, ती अतिशय आक्षेपार्ह अशी म्हणावी लागेल. त्यामुळे त्यांना तीन दिवसांसाठी निलंबित करणे, ही अतिशय छोटी शिक्षा झाली असे म्हणावे लागेल. या सर्व आमदारांना खरं तर वर्षभरासाठी निलंबित केले पाहिजे. आपच्या निलंबित आमदारांनी विधानभवन परिसरात घुसण्याचा प्रयत्न केला, पोलिसांनी त्यांना रोखले तर ते तेथे धरण्यावर बसले. भाजपा सरकारवर हुकूमशाहीचा आरोप करीत आतिशी यांनी राष्ट्रपतींना पत्र पाठवत भेटीची वेळ मागितली. हा सारा प्रकार म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असा म्हणावा लागेल. आपण काय करतो, कसे वागतो, याचे भान केजरीवाल आणि आपच्या अन्य नेत्यांना राहिले नाही, असे म्हणावेसे वाटते. मुळात विरोधी पक्षनेत्या म्हणून आतिशी यांना भाजपाच्या मंत्र्यावर आणि मुख्यमंत्र्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, तो त्यांचा अधिकार कोणी नाकारू शकत नाही, पण या अधिकाराचा वापर आतिशी यांनी तर्कसंगतपणे करायला पाहिजे. आपच्या आमदारांच्या विधानसभेतील कृतीचे वर्णन नंगा नाच याच एकाच शब्दात करावे लागेल.

मुळात केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून संयमाची आणि शिष्टाचाराची अपेक्षा करता येत नाही. संयम आणि शिष्टाचार तसेच केजरीवाल यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध नाही. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांची वागणूक ही नेहमीच अराजकाची असते. आपल्या १० वर्षांच्या राजवटीत त्यांनी दिल्लीत अराजकसदृश परिस्थितीच निर्माण केली. मुख्यमंत्रिपदावर असतानाही केजरीवाल यांना या पदाची मर्यादा आणि प्रतिष्ठा कधी सांभाळता आली नाही. आपल्या कार्यकाळात त्यांनी या पदाची इज्जत पार धुळीस मिळवली. त्यामुळेच दिल्लीच्या मुख्यमंत्र्याकडे पाहण्याचा जनतेचाही दृष्टिकोन बदलला, नव्हे, केजरीवाल यांनी तो बदलण्यास जनतेला आपल्या लोकशाहीविरोधी कृतीने आणि असंसदीय आचरणाने भाग पडले. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अजूनही शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. आडातच नाही तर पोहऱ्यात कसे येणार, असे म्हणावेसे वाटते. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांची एकूणच वाटचाल ही विनाशकाले विपरीत बुद्धी याप्रमाणे आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# छत्रपतींचे निष्ठावान भक्त स्वातंत्र्यवीर सावरकर

'अनादि मी, अनंत मी' या 'आत्मबल' असे शीर्षक असलेल्या गीताला महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार' दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन!

महाराष्ट्र ही संतांची आणि महापुरुषांची भूमी आहे. एखाद्या देशालाही महापुरुषांची इतकी परंपरा लाभत नाही ती आपल्या महाराष्ट्राला लाभली आहे. पण आपले दुर्दैव असे की, आपल्याला ती परंपरा जपता आली नाही. असं म्हणतात की, दक्षिण भारतात प्रांतवादाचं राजकारण खूप मोठं आहे. उत्तर भारतात जातीचं राजकारण मोठं आहे. पण आपल्या राज्यात आपण दुसरं काय केलं. आपण सर्वांनी मिळून सर्व महापुरुषांना जातीत विभागून टाकलं. 'दूषित छद्म पुरोगामी चळवळ' महाराष्ट्रात इतकी जोर धरली की, आपल्या भूमीला महापुरुषांचं वरदान मिळालं होतं; ते आपल्याला घेता आलं नाहीच. उलट आपण त्या वरदानाचं शापात रूपांतर केलं. इतके आपण करंटे आहोत. लक्ष्मण उतेकर या कष्टकरी मराठी माणसाने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं व 'छावा' हा त्यांचा ड्रीम प्रोजेक्ट नुकताच प्रदर्शित झाला. या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम भारतासमोरच नव्हे तर जगासमोर आला. आपले थोरले आणि धाकले असे दोन्ही छत्रपती म्हणजे आपला अभिमान, स्वाभिमान, प्राण सगळंच आहेत. आपल्या छत्रपतींचा खरा इतिहास जर आपण जगाला ओरडून सांगितला तर जगातले सगळे योद्धे फिके पडतील. १०० नेपोलियन जरी समोर आले तरी आपले थोरले नि धाकले धनी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरतील, इतके आपले छत्रपती महान आहेत. पण आपण काय केलं? आपल्याला त्यांची महानता पचवता आली नाही. आपल्यासमोर साक्षात शिव-शंभू उभे असताना आपण आपला स्वार्थ पाहिला आणि आजही आपण आपला स्वार्थ पाहत आहोत. छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर ज्यांनी आपली अस्मिता बाटवली, ज्या वाळवंटी विकृतीने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली, ज्याचे गोडवे आजही भारतात गायले जातात त्यांच्याविरुद्ध पेटून उठण्याऐवजी आपण आपापसातच भांडत आहोत. फितुरी कुणी केली यापेक्षा कोणासाठी फितुरी झाली हे जास्त महत्त्वाचं आहे. त्या मूळ शत्रूचे, त्या औरंग्याचे वैचारिक वारस आजही आपल्यात फूट पाडत आहेत आणि हे बेटे सोफ्यावर बसून अंगूर चघळत आहेत. इतिहास अभ्यासक विश्वास पाटील म्हणतात, ''माणसाच्या स्वार्थानेच सर्वांना पागल बनवलं होतं आणि त्यामुळे ही शोकांतिका शंभू राजेंच्या वाट्याला आली. शिवरायांनी एक महापुत्र या भूमीला दिला होता. पण तो तेजस्वी महापुत्र सांभाळण्याइतकी पात्रता या भूमीमध्ये नव्हती, असंच आपल्याला दुर्दैवाने मान्य करावं लागेल.'' हे वाक्य विश्वास पाटील यांनी २२ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या युट्यूब चॅनलवर 'संभाजीराजांच्या घातपाताचे दुष्ट चक्र' या व्हिडीओत उच्चारले आहे. मराठी माणूस शिव-शंभूंचं तेज धारण करायला कमी पडला, हे सत्य नाकारता येत नाही वाचकहो...



आपल्या राज्यात जातिवाद निर्माण करण्यात एका विशिष्ट विचारधारेचा हात आहे. पुरोगामी या शब्दामुळे आपली वाताहत झाली आहे. पुरोगामित्व हे सर्व रोगांवरील औषध असेल असं भासवून आपल्याला 'स्लो पॉयजन' देण्यात आलं आणि हे स्लो पॉयजन आपल्या रक्तात इतलं भिनलंय की, जातिवादाशिवाय आपल्याला दुसरं काहीच दिसत नाही. त्याहीपेक्षा मोठं दुर्दैव म्हणजे आपण आपला जातीयवादाचा कंड शमवण्यासाठी महापुरुषांच्या नावांचा वापर करतो. समर्थ रामदास या महापुरुषाकडे केवळ ते ब्राह्मण आहेत म्हणून डोळेझाक करतो. त्यांचं साहित्य उच्च दर्जाचं आहे. त्यांनी रचलेल्या आरत्या आपण घरोघरी म्हणत असतो. स्वराज्यामध्ये त्यांनी दिलेलं योगदानही लक्षणीय आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे अफलातून व्यक्तिमत्त्व आपण कधी जाणून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. त्यांच्यावर कोणत्या आधारावर बेछूट आरोप केले जातात? सावरकरांचा काळ हा काही प्राचीन किंवा शिवकाळ नाही. तर तो आधुनिक काळ आहे. त्या काळाविषयीचे अनेक पुरावे, संदर्भ सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या काळाविषयी संभ्रमता असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तरीसुद्धा मुद्दामून कोणतेही मुद्दे काढून सावरकरांवर टीका केली जाते. त्यांच्यावर गलिच्छ आरोप केले जातात. तेव्हा मला त्या आरोप करणाऱ्यांचीच कीव येते. कारण सावरकरांवर चुकीचे आरोप करून आपण आपलेच नुकसान करतोय. सावरकर तर 'धन्योहं धन्योहं' म्हणत पुढच्या प्रवासाला निघून गेले. त्यांना काही फरक पडणार आहे का? पण सावरकर हे रत्न आहे. या रत्नाची पारख करण्याची आपली लायकी नाही. नुकसान आपले होते, आपल्या समाजाचे होते. छावा चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर सावरकरांनीच संभाजी महाराजांची बदनामी केली, अशी टीका काही महामूर्ख लोकांनी केली आहे. त्यावर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुरावे सादर करून समर्पक उत्तरही दिलं आहे. लक्षात ठेवा, आरोप करणाऱ्यांनाही बऱ्याचदा सत्य परिस्थिती माहिती असते. पण जातीयवाद हा त्यांचा धंदा आहे आणि तो कितीही गंदा असला, तरी तो धंदा आहे. मात्र, स्वातंत्र्यवीर सावरकर हे छत्रपतींचे निष्ठावान भक्त होते, कृतिशील भक्त होते. त्यांच्या मनात छत्रपतींविषयी असलेली भावना त्यांनी अनेकदा व्यक्त केली आहे.

*हे हिंदुशक्ति-संभूत-दीप्तितम-तेजा*  
*हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा*  
*हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतीच्या साजा*  
*हे हिंदु-नृसिंहा प्रभो शिवाजीराजा*  
किंवा  
*जयदेव जयदेव जय जय शिवराया !*  
*या या अनन्य शरणा आर्यां ताराया !!धृ!!*  
*आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला*  
*आला आला सावध हो शिवभूपाला*  
*सद्गदिता भूमाता दे तुज हाकेला*  
*करुणारव भेदुनि तव हृदय न का गेला..*

सावरकर रचित ही दोन्ही गीते शिवजयंतीला लावली जातात. या गीतांमध्ये सावरकरांची शिवभक्ती सहज दिसून येते. यासाठी वेगळ्या पुराव्यांची आवश्यकता नाही. आता तर मी आरोपांचं खंडण करणं वगैरे सोडूनच दिलं आहे. कारण आरोप करणाऱ्यांना पुरावे किंवा उत्तरे नको असतात. तर त्यांनी मांडलेलं असत्य हे सत्य असल्याचं सिद्ध करायचं असतं. माझे मित्र मला कधी कधी विचारतात की, ''सावरकरांनी इतक्या चुकीच्या गोष्टी केल्या तर आम्ही त्यांना देशभक्त का मानायचं?'' हे सगळे व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी आहेत. या व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीमध्ये पुरावे सादर करण्याची पद्धत नसते. ''आलं फॉरवर्ड की केलं फॉरवर्ड'' हाच यांचा अभ्यासक्रम. पण सावरकरांचं साहित्य, चरित्र वाचण्याचे कष्ट आपण घेतले तर आपल्या लक्षात येईल की, छत्रपतींना आदर्श मानून सावरकर कार्य करीत होते. मुघल या परकीय शक्तीप्रमाणे सावरकरांच्या काळात इंग्रज होते. सावरकरांना इंग्रजांना पळवून लावून स्वराज्य स्थापन करायचं होतं. त्यासाठी सर्व जातींना एकत्र आणण्यासाठी त्यांनी हिंदुत्वाची चळवळ राबविली. पूर्वास्पृश्योद्धाराची चळवळ राबविली. हिंदू एकत्र आले तर इंग्रज काय जगातली कोणतीही शक्ती हिंदुस्थानाकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही, असा विश्वास सावरकरांना होता आणि हा विश्वास त्यांना छत्रपतींच्या भक्तीतून मिळाला. माउलींपासून छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभू राजे ते सावरकर यांच्यापर्यंत महाराष्ट्राला अनेक महापुरुष लाभले. पण (पान ५ वर)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# सुरक्षेसोबतच बसेसची संख्याही वाढवा!

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील एस. टी. महामंडळाच्या बसस्थानक व आगारांचे सुरक्षा परीक्षण करण्याचा आदेश दिला आहे. मात्र, सुरक्षेसोबतच राज्यातील सर्वच आगारांतील बससेची संख्या देखील वाढविण्याची नितांत गरज आहे.

एस. टी. महामंडळाची राज्यातील बहुतेक तालुक्याच्या ठिकाणी आगारे आहेत. बसस्थानके आहेत. काही ठिकाणी तर दोनबसस्थानके आहेत. राज्यातील विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत आजही रेल्वे नाही. त्यामुळे या भागातील प्रवाशांना एस. टी. नेच प्रवास करावा लागतो. त्यातच राज्य सरकारने ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थ्यांना प्रवासात विशेष सवलत दिली आहे. त्यामुळे एस. टी. ने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रवासी वाढल्याने बसस्थानकांवर गर्दी वाढली आहे. या गर्दीचा फायदा घेऊन खिसेकापू व भुरट्या चोरांचा सुळसुळाट झाला आहे. बसमध्ये चढताना उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्स चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. शाळकरी मुली व महिलांच्या छेडखानीचे प्रकार बसस्थानकावर जवळपास दररोज घडतात. काल परवाच बसमध्ये एका मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. याला आळा घालण्यासाठी बसस्थानक व आगारातील सुरक्षा व्यवस्था वाढविणे आवश्यक आहे.



आज ही सुरक्षा पोलिसांवरच अवलंबून आहे. मात्र, त्या त्या शहराची लोकसंख्या बघता पोलिसांची संख्या देखील कमी पडते. एक दोन पोलिसांच्या भरवशावर या बसस्थानकांची सुरक्षा आहे. तेव्हा, पोलिसांची संख्या देखील वाढविणे आवश्यक आहे. प्रवाशांची संख्या बघता बसेसची संख्या अत्यंत तोकडी आहे. त्यातच अनेक बसेस कालबाह्य झाल्या आहेत. पण, या बसेस आगारात गेल्यावर केवळ चालक आणि वाहकांची अदलाबदल होऊन ती बस पुन्हा स्थानकात पाठवून नियोजित स्थळी फेरीसाठी पाठविली जाते. त्यामुळे त्या बसेसची देखभाल व दुरुस्ती देखील होत नाही. मग या बसेसच स्थानकातून निघाल्यावर अनेकदा वाटेतच बंद पडतात. त्याचा चालक-वाहकांसह प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. आता परिवहन मंत्र्यांनी निर्लेखित बसेस महामंडळाच्या ताफ्यातून काढण्याचा आदेश दिला आहे. १५ एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचेही त्यांनी या आदेशात म्हटले आहे. पण, त्यापूर्वी नवीन बसेच राज्यातील सर्व आगारांना देऊन त्यांची सेवा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. अन्यथा आज आहे त्यापेक्षाही एस. टी. ची प्रवासी सेवा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, ज्याप्रमाणे रेल्वेने कोणती रेल्वे कोणत्या स्थानकातून सुटली. ती सध्या कुठे आहे. ती एखाद्या स्थानकावर किती वेळात पोहचेल, इत्यादी माहिती प्रवाशांना मिळण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तशी व्यवस्था एस. टी. ने देखील उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांची सोय होईल. त्यादृष्टीने प्रत्येक बसमध्ये जीपीएस सेवा कार्यान्वित करण्याचा आदेश परिवहन मंत्र्यांनी दिला आहे. पण, त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. एस. टी. ने प्रवाशांची उचल करण्यासाठी या सर्व सुविधांसह बसेसची संख्या वाढविल्यास प्रवाशांना एस. टी.चा प्रवास सुखकर होणार आहे. तसे झाले तरच, बहुजन हिताय बहुजन सुखाय हे एस. टी. चे ब्रीद प्रत्यक्षात उतरणार आहे. यासोबतच बसस्थानकांची स्वच्छता व बसस्थानकातील स्वच्छतागृहांची साफसफाई देखील आवश्यक आहे. सामान्यतः कोणत्याही बसस्थानकात बकऱ्या, मोकाट कुत्रे, डुकरे वावरताना दिसतात. त्यावर नियंत्रण मिळविणे आवश्यक आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील शहरातील बसस्थानकावर रात्रीच्यावेळी देखील बस वाहतूक सुरू असते. त्यामुळे रात्रीच्यावेळी देखील अशा बसस्थानकात प्रवाशांची संख्या मोठी असते. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देखील उपाययोजन होणे आवश्यक आहे. या सर्व सोयी सुविधा एस. टी. महामंडळाने केल्यास प्रवाशांचा प्रवास निश्चितच सुखकर होईल!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# होऊन जाऊ द्या उद्धवसाहेब!

'हमें मराठी नहीं आती म्हणणाऱ्याच्या कानाखाली आवाज काढा...'' असा आदेश काल अर्थात मराठी भाषा दिनी आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात बोलताना आपल्या उद्धवसाहेबांनी कार्यकर्त्यांना दिला. मराठीचा अभिमान, स्वाभिमान, मुंबईतील मराठी माणूस, मराठी अस्मिता, माय मराठी वगैरे वगैरे, उर्दूत कॅलेंडर छापणाऱ्या, जनाब लिहून घेणाऱ्या, अजान स्पर्धा भरवणाऱ्या आणि मतांची भीक मागत मुंबईतील मुस्लिम भागात ''हमार हिंदुत्व वैसा नहीं, ऐसा नहीं...'' सांगत फिरणाऱ्या उद्धवसाहेबांना अचानक पाच-सहा वर्षांनी का होईना, पण आज अचानक आठवले, यातच आपण समाधान मानले पाहिजे. काही का असेना, पण साहेबांनी दिलेल्या आदेशाची कार्यकर्त्यांनी अंमलबजावणी केली पाहिजे. मात्र, या दिलेल्या पक्षाच्या उपक्रमांची सुरुवात साहेबांच्या हस्ते झाली तर, राज्यात हे 'कानाखाली वाजव अभियान' व्यवस्थित राबविला जाईल. तसेही कुठल्याही कार्यक्रमाची सुरुवात देशाचे प्रमुख, राज्याचे प्रमुख, पक्षाचे प्रमुख, गटा-तटांचे प्रमुख स्वतःच करतात. मग या अभियानाची सुरुवात साहेबांनी आपल्या शुभहस्ते करायला काय हरकत आहे? चला मुंबईच्या रस्त्यावर उतरा आणि तुमच्या शुभहस्ते 'कानाखाली वाजव' अभियानाची सुरुवात करून, कार्यकर्त्यांना अभियान राबविण्यास प्रोत्साहन द्या... मग होऊन जाऊ द्या उद्धवसाहेब!

नाही हो साहेब..! मुंबईच्या रस्त्यावर उतरायची गरज नाही. रस्त्यावरच्या कोणाच्याही कानाखाली वाजविण्यापेक्षा, मातोश्री एक-दोन जे योग्य वाटेल त्याच्या समोर एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करा आणि तुमच्या राज्यसभेच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी आणि तुमचे वर्सोवाचे आमदार हारून खान यांना बोलावून मराठीत बोलायला सांगा, तेव्हा तुम्हाला इकडे तिकडे कानाखाली वाजवायला गिऱ्हाईक शोधायची गरजदेखील पडणार नाही साहेब. त्यामुळे फार काही कष्ट न घेता, घरगुती छोटेखानी कार्यक्रमात, आपल्याच चार लोकांमध्ये अभियानाची सुरुवात होऊ शकते, नाही का...

यांना ढोंगी माणूस म्हणावं तर ढोंगी माणूसदेखील लाजेल अशी यांची परिस्थिती आहे. अर्थात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत यांना हिंदू आणि मराठी मतांची गरज नसल्यागत हे वागताना दिसत होते. आता महापालिकेत मराठी मतांची गरज असल्याचे लक्षात आल्यावर मराठी माणसाला चुचकारण्याचा प्रयत्न करताहेत साहेब. प्रियांका चतुर्वेदींना राज्यसभेवर पाठविताना यांना मराठी माणूस आठवला नाही. एवढंच काय, तर प्रीतीश नंदी, संजय निरुपम, एकनाथ ठाकूर, मुकेश पटेल, राजकुमार धूत, चंद्रिका केनिया अशा सगळ्यांना राज्यसभेवर पाठविताना मराठी माणूस यांना कधी दिसला नाही. एवढंच काय, पत्राचाळ घोटाळा म्हणजे, गोरेगाव परिसरातील ४७ एकरांत पसरलेल्या ६७६ मराठी कुटुंबांना फ्लॅट देण्याचे स्वप्न दाखवून, छत्र हिरावून घेणारा, मराठी कुटुंबांना बेघर करणारा हा घोटाळा होय. आणि महत्त्वाचं म्हणजे या घोटाळ्यात साहेबांचे अत्यंत आवडते व्यक्ती संजय राऊतांचा थेट सहभाग आहे. कोविड काळात झालेल्या खिचडी घोटाळ्याचे पैसे लाटणाऱ्यांमध्येदेखील साहेबांचे विश्वासू राऊत बाप-लेक आहेत. पण मराठी माणसांना बेघर करणाऱ्या, मराठी मुलांच्या पोटावर मारणाऱ्यांच्या कानाखाली आवाज काढा, असे कधी उद्धव साहेब आजवर बोलल्याचे ऐकिवात नाही. केतकी चितळेची काय चूक होती, पण साहेबांनी तिला तुरुंगात टाकले. काय केले होतं तिने? अन्य कोणीतरी लिहिलेली एक व्यंग्य कविता तिने केवळ फॉरवर्ड केली. दुसरीकडे मंत्रिपदावर असलेल्या जितेंद्र आव्हाडने अनंत करमुसेला मारहाण केली. तेही त्याच्या बंगल्यावर नेऊन. राहुल कुळकर्णी नावाच्या पत्रकाराने परराज्यात जाणाऱ्या लोंढ्यांची केवळ बातमी दाखवली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा करणाऱ्यांनी, संविधान बचावच्या वल्गना करणाऱ्यांनी एका पत्रकाराच्या कर्तव्यावर घाला घालत त्याला तुरुंगात टाकले. समाज माध्यमावर सरकार विरोधात लिहितो म्हणून, एका १८-१९ वर्षाच्या युवकाला तुरुंगात टाकले. तेव्हा केतकी, अनंत, राहुल हे सगळे मराठी आहेत आणि आपल्याला मराठीचा अभिमान असल्याने कारवाई करू नका म्हणण्याचे धाडस स्वतः मुख्यमंत्री असताना गृहमंत्र्यांना सांगण्याचे झाले का? किंबहुना यांची मराठी अस्मिता, स्वाभिमान, अभिमानदेखील आज जसा जागा झाला तसा त्यावेळी जागृत झाला नाही, याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे अशा या स्वार्थी वृत्तीला ढोंगी नव्हे तर काय म्हणावे?

अयोध्येत प्रभू रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर कोट्यवधी श्रद्धाळू दर्शन करून आले. महाराष्ट्राचे, मराठी माणसांचे श्रद्धास्थान असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांवरील 'छावा' सिनेमा आला. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले, तर जगभरातील कोट्यवधी लोकांनी तो पाहिला आणि भरभरून कौतुकदेखील केले. कित्येक वर्षांनंतर येणारा कुंभमेळा भरला. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील हिंदूच नव्हे, तर अन्य धर्मीय अशा कोट्यवधी भाविकांनी भक्तिभावाने सहभागी होऊन पवित्र स्नान केले. जय श्रीराम आणि राम-राम बोलण्यावर टिप्पणी करून मेंदूत किती घाण भरली आहे, याचा परिचयदेखील साहेबांनी दिला. प्रभू रामाच्या दर्शनाला जाण्याचे टाळणारे ढोंगी आता राम-राम आणि जय श्रीराम बोलण्यावर आपले तत्त्वज्ञान पाजळताना दिसत आहेत. त्यामुळे सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलारांनी आपल्या 'एक्स' या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक चारोळी पोस्ट केली आहे. ती या अशा ढोंगी लोकांना तंतोतंत लागू होते.

सभेत दाखवण्यापुरती हातात रुद्राक्षांची माळ घाली  
औरंगजेबाचा जप ज्यांच्या सदैव असे तोंडी.  
ओळखलेत का? महाराष्ट्रातील ते हिंदुत्ववादी ढोंगी?

९२७०३३३८८६

### महाकुंभाचा आनंद पर्व

महाकुंभ महापर्वाची सांगता झाली. दीडमहिना हे महापर्व सुरू होते. जवळ जवळ भारताच्या लोकसंख्येच्या अर्ध्या लोकांनी या पर्वाचा लाभ घेतला आहे. आम्हाला काही कारणांनी जाता आले नाही. परंतु जे जाऊन आलेत त्यांनी जे सांगितले, बातम्या वाचल्या ते खरोखरच सर्व अद्भुतहोते. रोजलाखो लोकांची व्यवस्था होत होती. यामुळे अनेकांना रोजगार मिळाला. लोकांनी नवीन व्यवसाय केले. आज उत्तरप्रदेशची लोकसंख्या मोठी आहे. तिथे मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता आहे. भाजपा सरकार आल्यापासून तिथल्या अर्थव्यवस्थेत चांगलीच सुधारणा झाली आहे. आज या महापर्वावर जो खर्च झाला तो वसूल झाला व उत्पन्न वाढले. खरोखरच १४४ वर्षांनी आलेला हा योग आनंद निर्माण करणारा ठरला आहे. श्रद्धेने लोक तिथे गेलेत तसेच श्रद्धेमुळेच ८ ते १० तास वाहतूक कोफ्लडीत थांबावे लागले तरी त्याचा थकवा आला नाही. फक्त स्नानाची ओढ होती. मागचा योग जेव्हा आला असेल म्हणजे १४४ वर्षांपूर्वी तेव्हा पारतंत्र्य असेल. हा योग खूपच चांगला म्हणावा लागेल. प्रयागराजच्या रहिवाशांना खूप त्रास सहन करावा लागला. घरी आलेल्या पाहुण्यांचा जसा आपल्याला त्रास होत नाही तसाच त्यांनी आनंदाने सहन केला. या महापर्वात गरीब-श्रीमंत असे तिथे आल्यावर काही नव्हते. फक्त सगळे एकाच भावनेने आलेले होते. सगळे छान पार पडले. महाकुंभ हे आनंदपर्व ठरले आहे. योगी सरकारने उत्तम व्यवस्था करून हा आनंद सगळ्यांना दिला आहे. जय गंगा माता हर गंगे. तिला त्रिवार नमस्कार.



**प्रा. अंजली पळणीटकर**/९८२२६९१२८८

## वाचक पत्रे

### ट्रम्प यांची अमेरिकेसाठी गोल्ड कार्डद्वारे गुंतवणुकीसाठी हाक



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुंतवणूकदारांसाठी गोल्ड कार्ड ही नवी योजना जाहीर केली आहे. जर अमेरिकेमध्ये ५० लाख डॉलर्सची गुंतवणूक केली तर अमेरिकेचा व्हिसा त्या व्यक्तीला दिला जाणार आहे . विशेष म्हणजे अमेरिकन नागरिकत्वाचा मार्गही त्या व्यक्तीसाठी खुला होणार आहे. जे श्रीमंत आहेत व खूप पैसा खर्च करतात तसेच मोठ्या प्रमाणावर कर सुद्धा भरतात अशा लोकांना ही एक संधी आहे . तसे अमेरिकन नागरिकत्व मिळणे अलिकडच्या काळात अवघड झाले आहे . इतर देशांतही अशा काही योजना आहेत। गुंतवणूकदारांना जगभरात अनेक देश व्हिसा देतात . त्यामध्ये ब्रिटन, स्पेन, ग्रीस, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इटली इत्यादी देशांचा समावेश आहे. अमेरिकन सरकार एक कोटी गोल्ड कार्ड विकू शकते. आज अमेरिकेसारख्या प्रगत व स्वच्छ शहरात नोकरी किंवा एखादा उद्योग मिळणे हे एक भाग्यच म्हणावे लागेल. सुंदर राहणी, उच्च शिक्षणाच्या मोठ्या सोई, स्वच्छता, कायदा व सुव्यवस्था या गोष्टींमुळे अनेक देशातील नागरिकांना अमेरिकेत जाण्याचे व राहण्याचे एक वेगळे वैशिष्ट्य वाटते त्याचाच फायदा ट्रम्प घेत आहेत असे म्हटल्यास वावगे होऊ नये. यामुळे अमेरिकेचा सुद्धा फायदाच होणार आहे. कारण अमेरिकेत नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळणार आहे आजही भारतातील अनेक जण अमेरिकेत जाण्यास व गुंतवणूक करण्यास इच्छुक आहेत

**शांताराम वाघ**/पुणे

### सांडपाण्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी प्रदूषित

१८ फेब्रुवारी २०२५ च्या तरुण भारतात एक बातमी वाचण्यात आली. ती अशी, शहरातील ११७ एमएलडी सांडपाणी मिसळते नद्यांमध्ये. शहरातून नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी अशा तीन नद्या वाहतात. या नद्यांमधून दररोज ५२० एमएलडी सांडपाणी वाहते. या सांडपाण्यांपैकी ४०३ सांडपाण्यावर एसटीपीद्वारे प्रक्रिया केली जात असून उर्वरित ११७ एमएलडी सांडपाणी वाहून नदीमध्ये जाते. या घाण पाण्यामुळे नदीतील पाणी दूषित झालेले आहे.



भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर गोसीखुर्द मोठा पाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आलेला आहे व या प्रकल्पात पाणीसाठा पण करण्यात आलेला आहे. नाग नदी कन्हान नदीला मिळते आणि कन्हान नदी वैनगंगा नदीला मिळते. त्यामुळे नाग नदीचे सांडपाणी हे गोसीखुर्द प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात मिसळते. त्यामुळे पर्यायाने गोसीखुर्द प्रकल्पाचा पाणीसाठा प्रदूषित होतो. सबब,नाग नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर एसटीपीद्वारे प्रक्रिया त्वरित करून शुद्ध पाणी कन्हान नदीत व नंतर वैनगंगा नदीत सोडण्यात यावे असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस  
tbedit2016@gmail.com  
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# खा. राऊत यांच्या 'त्या' वक्तव्याचा निषेध

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

शिवसेनेच्या नेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे तसेच वारंवार इतर महिलां भगिनींविषयी अवमानजनक शब्द वापरणाऱ्या खा. संजय राऊत यांचा येथील युवासेना सदस्य सुजीत खुर्द यांच्या नेतृत्वात सोलापूर जिल्हा युवासेनाच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. यावेळी उपजिल्हाप्रमुख सागर शिंदे, नामदेव पाटील, युवासेना शहर समन्वयक समर्थ बिराजदार, सोशल मीडिया जिल्हाप्रमुख आशिष परदेशी, आशिष जेटीथोर, उपशहर प्रमुख अल्फरन आबादीराजे, शहर समन्वयक राज मिसाळ, आकाश कोळी, उपजिल्हाप्रमुख मुबीन भेलमे उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, सेंट्रल रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/30R कामाचे नाव: वाडी यार्डचे अ वर्ग मालवाहतूक परीक्षा यार्डमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. (पुन्हा आमंत्रण अंदाजित किंमत: 1,17,77,433.48/- सुरक्षा बोली : 2,08,900/- पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने ऑफरची वैधता: 60 दिवसांची तारीख आणि वेबसाइटवर निविदा बंद होण्याची वेळ: 24/03/2025 रोजी 15.00 वाजता बोली सुरक्षा खर्च ई-पेमेंट www.ireps.gov.in या वेबसाइटवर भरले जाईल. **ANJ-41**

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

॥जो जे वांछिल तो ते लाहो॥

**मनोरमा परिवार अंतर्गत**

**महिला उद्योजक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**

**मनोरमा कॉम्प्लेक्स, अवंती नगर, जुना पुना नाका, सोलापूर**

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

**कु. अरुंधती पद्माकर नायडू**
चेअरमन (मो. ९०२८७१७२७२)

**सौ. मंजुश्री विजय कालेकर**
व्यवस्थापिका (मो. ९८८१४५५११९)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलानी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ शास्त्री नगर अ० झोपडपट्टी, सोलापूर या नावांने ओळखले जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ४८१A ही मिळकत झोपडी घरजागा आमचे अशिल बिल्कीस मकबुल नाईकवाडी यांचे मयत पती पै. मकबुल अलिशेर नाईकवाडी यांचे नावावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी त्यांचे नावे दोन खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधून वरती पन्हाळी पत्रे वासे घातलेले आहेत.

सदरच्या खोल्या आमचे अशिलांचे पती पै. मकबुल अलिशेर नाईकवाडी यांचे नांवावर असून सदरहू खोल्या आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहेत. आमचे अशिलाचे पती पै. मकबुल अलिशेर नाईकवाडी यांचे दि. २२/०५/२०२३ रोजी त्यांचा मृत्यु झालेला आहे. त्यांचे मृत्यु पश्चात आमचे अशिल ही धर्मपत्नी व कुटुंबकर्ती या नात्याने वारस आहेत.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द आलेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराने लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी व कर संकलन विभाग ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख-२८/०२/२०२५

**सही/-**
**ढेकणे एस.एम.**
**ॲडव्होकेट**
**रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## बार्शी नगरपरिषद कार्यालय
## जाहिर लिलाव

जा.क्र.मि.वि./१११०
नगरपरिषद कार्यालय,
बार्शी दि. २८ फेब्रु.२०२५

शहरातील तमाम नागरीकांना कळविणेत येते कि, बार्शी नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषद मालकीच्या जागेतील खालील ठिकाणच्या एकूण-१०५ चिंच झाडांवरील चिंचफळांची जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे.

**चिचफळ झाडे खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | ठिकाण | चिंच झाडांची सख्या |
|---|---|---|
| १ | जवाहरलाल हॉस्पिटल आवार | ०१ झाड |
| २ | भगवंत रोड प्रा. शाळा क्र. १ लगत | ०३ झाडे |
| ३ | हिंदू स्मशानभूमी | २० झाडे |
| ४ | संकेश्वर उद्यान | ०५ झाड |
| ५ | मुस्लिम स्मशानभूमी | २० झाडे |
| ६ | चांदणी जलकुंभ आवार | ०२ झाडे |
| ७ | परंडा रोड जलकुंभ टाकी | १५ झाडे |
| ८ | सुलाखे हायस्कूल रोड पवार घराजवळ | ०१ झाड |
| ९ | होळकर उद्यान | ०३ झाडे |
| १० | आनंद चौक परांडा रोड (हजरत उद्यान) | ०१ झाड |
| ११ | अलिपुर रोड पावसे घराजवळ | ०२ झाडे |
| १२ | भवानी पेठ बाशिगे लाकडी अड्डा | ०१ झाड |
| १३ | शिवाजी नगर शॉपिंग सेंटर मागे | ०१ झाड |
| १४ | हिंदू स्मशानभूमी (बिगर फळांची) | १५ झाडे |
| १५ | मुस्लीम कब्रस्तान (बिगर फळांची) | १५ झाडे |
| | **एकूण -** | **१०५ झाडे** |

सबब सदरचे लिलावामध्ये ज्यांना भाग घ्यावयाचा असेल, त्यांनी दि. ०७/०३ ०४/०२/२०२५-रोजी सकाळी ११.०० वाजता मिळकत विभाग, नगरपरिषद कार्यालय येथे हजर रहावे.

**टिप : -** १) लिलावात भाग घेणारास र.रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) अनामत म्हणून भरावे लागणार आहे. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२) लिलाव कायम झालेली संपूर्ण रक्कम जागेवर रोख भरावी लागणार आहे. याशिवाय लिलाव कायम झाला, असे समजण्यात येणार नाही.

३) याशिवाय लिलावाच्या शर्ती व अर्टी लिलावाचे वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद**

Classifieds

**विकणे आहे**

**सैफुल ओमगर्जना चौक, प्लॉट नं. १७ व १८ प्रत्येकी ३,००० स्क्वे. फूट, खुला N.A. क्लिअर टायटल प्लॉट विकणे आहे.**
**संपर्क : ९७६६१५५२१४**
**८२७७४९९६२९**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## PUBLIC NOTICE

This Public Notice is hereby given to the public at large that the property more particularly described in the below mentioned schedule, is owned and possessed by Mr. Shubham Umakant Giri and Manisha Umakant Giri and they are mortgaging the said property with Grihum Housing Finance Limited Branch Solapur. And he is assured that the said property is free from all encumbrances.

That, If anybody is any objection of whatsoever nature regarding the same and property mentioned in the schedule herein below, the same shall be communicated in writing to the under signed at office address mentioned below, within (7) seven days from the date of issuance of this notice, producing the relevant documents on any working day, during the notice period referred to below schedule.

### SCHEDULE

**All that piece and parcel of the property bearing Grampanchayat milkat no. 984/1 admeasuring 1419 sq.ft. situated at Nannaj Tal. North Solapur Dist. Solapur.**
**This Public Notice was published dt. 28/02/2025**

**Sd/-**
**Adv. Pravin C. Nikam**
**Mo. No. 9021821255**
**3B, Muraraji Peth,**
**Lobha Master Chawl,**
**front of Poonam Hotel,**
**Solapur 413001**

## जाहीर समन्स

जाक्र/उप/४१९८/२०२५

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर**

सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित
सोलापूर सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३

**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर - अर्जदार**

विरूध्द

(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | जाब देणार नं. | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३१८/२०२४ | २,०९,८५०/- | २ | **श्री. मुंगसे गोपाल तुळजाराम** रा. ७२०.१ २ वी कुर्डूवाडी रोड अध्यापक कॉलनी बार्शी, जि. सोलापूर |
| २ | ३०९/२०२४ | १,४८,३०२/- | २<br>३ | **श्री. रोकडे यशवंत शंकर** रा. २६ समर्थ नगर, जुळे सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. केकडे अशोक उध्दवराव** रा. ७३७ प. मंगळवार पेठ, फलटण गल्ली, सोलापूर, जि. सोलापूर |
| ३ | ३१३/२०२४ | १,०९,५६४/- | १ | **श्री. वडलाकोंडा बालाजी पांडुरंग** रा. घर नं १८३६ दत्त नगर, न्यु पाच्धा पेठ, सोलापूर, जि. मोलापूर |
| ४ | ३०७/२०२४ | २२,४२,५६३/- | २<br>३ | **श्री. भुरे बालाजी विरभद** रा. ९५ यामिनी नगर विजापूर रोड तुळजाई बिलडींग शेजारी, सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. सगर दिलीपकुमार हरिभाऊ** रा.१२० माशाळा वस्ती दिपमार्ग निवास, विजापूर रोड़ सोलापूर,जि. सोलापूर |
| ५ | ३१०/२०२४ | २,५२,०३९/- | २<br>३ | **श्री. शिंदे ईश्वर दगडु** रा. रूम नं १९१ आर बी १ बिल्डींग नं ८ मोदीग्वाना डी एम आर ऑफीस सोलापूर जि. सोलापूर<br>**श्री. पारधे लक्ष्मण विष्णू.** रा. ४०१ मुर्गी नाला लष्कर, उत्तर सदर बाझार अण्णाभाऊ साठे वाचनालय सोलापूर, जि. सोलापूर |
| ६ | ३०६/२०२४ | १,५७,७६६/- | २<br>३ | **श्री. शिंदे ईश्वर दगडु** रा. रूम नं १९१ आर बी १ बिल्डींग नं ८ मोदीखाना डी.एस.आर. ऑफीस सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. शिंदे दिपक सावळा** रा. ९४.३१७ जोडभावी पेठ, चांभार गल्ली, सोलापूर जि. सोलापूर |
| ७ | ३१४/२०२४ | ९८,०६४/- | २ | **श्री. माळी सुभाष महांतय्या** रा. बी.६६ कोटणीस नगर विजापूर, रोड सोलापूर, जि. सोलापूर |
| ८ | ३१५/२०२४ | २३,३८७/- | २ | **श्री. गोणेवाडीकर भगावत भाऊसाहेब** रा. गोणेवाडी, पो. नंदेश्वर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ९ | ३०५/२०२४ | ३४,३९,९२७/- | १<br>२ | **श्री. राठोड सचिन रेवणसिध्द** रा. राठोड वस्ती, प्रताप नगर, सोरेगाव, सोलापूर, जि. सोलापूर<br>**सौ. राठोड शांता रेवणसिध्द** रा.२०, ३९ वसंतराव नाईक नगर, विजापूर रोड, जि. सोलापूर |
| १० | ३०३/२०२४ | १,०४,६८८/- | १ | **सौ. सुंटे वर्षाराणी चिदानंद** रा. १९ अ निरापाल सोयटी, विजापूर रोड, सोलापूर, जि. सोलापूर |
| ११ | ३००/२०२४ | २८,२५,८४४/- | ३ | **श्री. कोलते राजकुमार शिवाजी** रा. २५८, दक्षिण कसबा, दत्त चौक, गद्रे लक्ष्मी मंदिरजवळ, जि. सोलापूर |
| १२ | २९८/२०२४ | ६,२३,६८७/- | २ | **श्री. उबाळे गिरीष आनंदराव** रा. प्लॉट नं. सी.१४ अ ग्राउंड फ्लोअर, भैरवनाथ सोसायटी, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर |
| १३ | ३०१/२०२४ | ३३,२०,०८०/- | २<br>३ | **श्री. कोलते राजकुमार शिवाजी** रा. २५८, दक्षिण कसबा दत्त चौक, लक्ष्मी मंदीरजवळ, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. काटकर बाळू महादेव** रा. बसवेश्वर नगर, कारे वस्ती, राजगुरु फुटवेअर जवळ सोलापूर, जि. सोलापूर |
| १४ | २९९/२०२४ | ३५,८८०/- | २ | **श्री. माळी सुभाष मंहातप्पा** रा. ९ए, महावीर सोसायटी, भारती विद्यापीठ सोलापूर, जि. सोलापूर |
| १५ | ३१७/२०२४ | १०,९३,३१२/- | ३<br>४ | **श्री. गिरे लक्ष्मण रत्नाकर** रा. संतोष नगर, गुरुकृपा किराणा स्टोअर्स बिरोबा मंदिर बाळे सोलापूर<br>**श्री. गुजले संभाजी भरमा** रा. हंगिरगे गुजले वस्ती, ता. सांगोला, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. ११/०३/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**(डॉ. पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

## जाहीर समन्स

नि-नं १०

पुढील नेमली तारीख १५/०२/२०२५
स्पे.मु.नं. ३९/२०१९

**वार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो.व.स्तर यांचे न्यायालयात**

**श्री. राजेंद्र सुखदेव मिरगणे** -- **वादी**
**विरुध्द**
**रघुनाथ आनंदा नागणे** - - **प्रतिवादी**

**प्रति,**
**रघुनाथ आनंदा नागणे, वय सज्ञान,**
धंदा-व्यवसाय, द्वारा वैभव महादेव नागणे,
रेणुका ट्रेडर्स चोखामेळा शॉपींग सेंटर, चोखामेळा चौक,
मंगळवेढा, ता. मंगळवेढा जि. सोलापूर

ज्याअर्थी यातील वादीने तुमचे विरुध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे परंतु तुम्ही दाव्यात नमूद पत्यावर समन्स/नोटीसची बजावणी होऊ देत नाहीत, तुमचा अचुक पत्ताही आढळून येत नाही, तुम्ही जाणीवपुर्वक समन्स/नोटीसीची बजावणी करुन घेत नाहीत, तसा बेलीफ रिपोर्ट आहे सदर दाव्याकामी तुम्ही प्रतिवादी म्हणून सामील असून तुमचेविरुध्द वादीने दाद मागणी केलेली आहे.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण सदर दाव्याकामी हे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमली तारीख १५/०४/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे कैफियत लिखीत स्वरुपात मा. न्यायालयात द्यावे. मुदतीत आपण हजर होवून आपली म्हणणे/कैफियत दिली नाहीतर आपणास सदर समन्सची बजावणी होवूनही आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी,

सदरचे जाहीर नोटीस समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यनिशी प्रसिध्द केले असे ता.२५/०२/२०२५

**सही/-**
**मा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

## जाहिर प्रसिध्दीकरण

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १९/२०२५
निशाणी नं. ६

(१) **चि. पृथ्वीराज नितीन करडे,** वय १३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. कांदलगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर, ह.मु. चिंचवडे नगर, वाल्हेकरवाडी रोड, शिवनगरी, चिचवड, जि. पुणे -- **अर्जदार**
(२) **नितीन नारायण करडे,** वय ४७ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर अर्जदार नं. २ स्वतःसाठी व अर्जदार नं. १ चे अ.पा.क. वडील म्हणून)

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन** -- **सा.वाला**

**ज्या अर्थी** डि.सोलापूर सब डि. व ता.बाशीं पैकी मौजे कांदलगाव येथील शेतजमीन याचा गट नं. **२२९/३** याचे क्षेत्र हे. ०२-३६ आर पो.ख हे. ००-०६ आर असे एकुण क्षेत्र हे. ०२-४२ आर, याचा आकार रु. ०६-९४ पैसे यापैकी मधील बाजुची जमिन याचे क्षेत्र हे. ००-८५ आर + पो.ख. हे. ००.०३ आर असे एकुण क्षेत्र हे. ००-८८ आर याचा आकार रु. ०२-५० पैसे, **यापैकी दक्षिण बाजुचे क्षेत्र हे. ००-४० आर याचा आकार रु. ०१-१३** पैसे यासी चतुसिमा पुर्वेस- भगवंत देवस्थान यांची जमिन, दक्षिणेस- रेश्मा फुरडे यांची जमीन, पश्चिमेस- प्रल्हाद करडे यांची जमीन, उत्तरेस- सदर गटापैकी जमीन, येणेप्रमाणे चतुसिमापूर्वक वर्णनाची शेतजमिन आतील सर्व झाड झुडुप दगड माती, ताली वगैरे तदंगभुत वस्तुसह

वर नमूद मिळकत पृथ्वीराज नितीन करडे याचे नावे आहे. यातील अर्जदार तर्फे अ.पा.क. म्हणून त्यांचे वडिल नितीन नारायण करडे, हे आहेत. सदर अज्ञानाचे शैक्षणिक गरजेपोटी व आर्थिक निकडीसाठी अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ०१/०४/२०२५ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल. हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्या निशी प्रसिध्द केले असे ता.१८/०२/२०२५.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**सही/-**
**हुकुमावरून**
**अक्षीक्षक, जिल्हा न्यायालय, बार्शी**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

॥ धनवृद्धि समृद्धि ॥

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार

### स्थावर मालमत्तांचे जाहीर फेर लिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि.,सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. १७/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू रा.५८/५९ शिवयोग आश्रम, सैफुल स्टॉप जवळ, नरेंद्र नगर, विजापूर रोड सोलापूर व जामीनदार १) श्री विश्वजित अप्पासाहेब बिराजदार रा. मु.पो. निम्बर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर २) सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू रा.५८/५९ शिवयोग आश्रम, सैफुल स्टॉप जवळ, नरेंद्र नगर, विजापूर रोड सोलापूर ३) श्रीमंत निन्गाप्पा पाच्छापुरे रा. प्रचंडे गल्ली, मु.पो. नागणसूर ता.अक्कलकोट, जि. सोलापूर ४) शिवरुद्रप्पा सिद्धराम कल्याण रा. ७७६, हडपद गल्ली, मु.पो.नागणसूर, जि. सोलापूर ५) संजय अण्णाप्पा संगोलगी रा. १७, नेहरू नगर, विजापूर रोड, श्रीकृष्ण मंदिर जवळ, सोलापूर यांना पाठवून रक्कम रु.२,६६,२१,३८७/- या वर दि.०१/०९/२०२२ पासून पुढे हि सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकित रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमुद थकित कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहीर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे असे.**

| अ. क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन / मिळकतदाराचे नाव | प्लॉट नं./ गट नं. | क्षेत्र आर. चौ.मी. | राखीव किमंत | अ. क्र. | प्लॉट नं./ गट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | राखीव किमंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार -** **दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू** रा.५८/५९, सैफुल स्टोप, शिवयोग आश्रम, विजापूर रोड, सोलापूर **जामीनदार -** **१. सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू** **२. विश्वजित अप्पासाहेब बिराजदार** **३. श्रीमंत पाच्छापुरे लिंगप्पा** | विश्वजित बिराजदार अप्पासाहेब मौजे. निंबर्गी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट क्र.२१०/१ अ | १ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २२ | २२ | ०.०१.२८ | १६५२७३.६० |
| २ | | | २ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २३ | २३ | ०.०१.१६ | १४९७७९.२० |
| ३ | | | ३ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २४ | २४ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ४ | | | ४ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २५ | २५ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ५ | | | ५ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २६ | २६ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६ | | | ६ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २७ | २७ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ७ | | | ७ | ०.७७.०० | ९९४२२.४० | २८ | २८ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ८ | | | ८ | ०.०१.१६ | १४९७७९.२० | २९ | २९ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ९ | | | ९ | ०.०१.२४ | १६०१०८.८८ | ३० | ३० | ९.०६.२० | ११७००८५.४४ |
| १० | | | १० | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३१ | ३१ | १.०६.२५ | १३७१९०.०० |
| ११ | | | ११ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३२ | ३२ | ०.९२,०० | ११८७९०.४० |
| १२ | | | १२ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३३ | ३३ | ०.८९.१२ | ११५०७१.७४ |
| १३ | | | १३ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३४ | ३४ | ०.८६.२५ | १११३६६,०० |
| १४ | | | १४ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३५ | ३५ | ०.८६.२५ | १११३६६.०० |
| १५ | | | १५ | ०.७८.३७ | ९८९३३.२० | ३६ | ३६ | ०.८७.०० | ११२३३७.४० |
| १६ | | | १६ | ०.८५.५० | ११०३९७.६० | ३७ | ३७ | ०.९०.६२ | ११७००८.५४ |
| १७ | | | १७ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३८ | ३८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० |
| १८ | | | १८ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ३९ | ३९ | ०.८१.०० | १०४५८७.२० |
| १९ | | | १९ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४० | ४० | ०.७८.०० | १००७१३.६० |
| २० | | | २० | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४१ | ४१ | ०.७५,०० | ९६८४०,०० |
| २१ | | | २१ | ०.७७.०० | ९९४२२.४० | ४२ | ४२ | ०.७८.१२ | १००८६८.५४ |
| | | | | | | ४३ | ४३ | ०.८१.२५ | १०४९१०,०० |
| | | | | | | | | | |
| ४४ | | **विश्वजित अप्पासाहेब बिराजदार** मौजे निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. २१०/२अ, | ३७ | १.०८.५० | १४००९५.५२ | ७१ | ६४ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४५ | | | ३८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७२ | ६५ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४६ | | | ३९ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७३ | ६६ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४७ | | | ४० | ०९४.२५ | १२१६९५.६० | ७४ | ६७ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ |
| ४८ | | | ४१ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७५ | ६८ | ०.७७.६२ | १००२२२.९४ |
| ४९ | | | ४२ | १,०५,०० | १३५५७६,०० | ७६ | ६९ | ०.८७.५० | ११२९८०.०० |
| ५० | | | ४३ | १,०५,०० | १३५५७६,०० | ७७ | ७० | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५१ | | | ४४ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ७८ | ७१ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५२ | | | ४५ | ०.९४.२५ | १२१६९५६० | ७९ | ७२ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५३ | | | ४६ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ८० | ७३ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५४ | | | ४७ | ०.९४.२५ | १२१६९५६० | ८१ | ७४ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५५ | | | ४८ | ०.९४.२५ | १२१६९५.६० | ८२ | ७५ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५६ | | | ४९ | ०.७८.०० | १००७१३.०६० | ८३ | ७६ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५७ | | | ५० | ०.७८.०० | १००७१३.६० | ८४ | ७७ | ०.७१,५० | ९२३२०.८० |
| ५८ | | | ५१ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८५ | ७८ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ५९ | | | ५२ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८६ | ७९ | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ६० | | | ५३ | ०.७८.०० | १००७१३.६० | ८७ | ८० | ०.७१.५० | ९२३२०.८० |
| ६१ | | | ५४ | ०.८७,७५ | ११३३०२.८० | ८८ | ८१ | ०.७१,५० | ९२३२०.८० |
| ६२ | | | ५५ | ०.८७.७५ | ११३३०२.८० | ८९ | ८२ | ०.९४.२५ | १२१६९५.६० |
| ६३ | | | ५६ | ०.७८.०० | १००७१३.६० | ९० | ८३ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६४ | | | ५७ | ०,७८,०० | १००७१३.६० | ९१ | ८४ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६५ | | | ५८ | ०.७८.०० | १००७१३.६० | ९२ | ८५ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६६ | | | ५९ | ०.७८,०० | १००७१३.६० | ९३ | ८६ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६७ | | | ६० | ०,९८,०० | १२६५३७.६० | ९४ | ८७ | ०.७४.२५ | ९५८७१.६० |
| ६८ | | | ६१ | ०.७७.६२ | ९७६४०.५४ | ९५ | ८८ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ६९ | | | ६२ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ | ९६ | ८९ | ०.७७.०० | ९९४२२.४० |
| ७० | | | ६३ | ०.७२.८७ | ९४०८९.७४ | ९७ | ९० | ०.९०.६२ | ११७००८.५४ |
| ९८ | | दयानंद शरणबसलिंग शिवयोगीगाळू डी व सब डी, सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ६७९/२/अ/१ | हे.१.२१.०० आर चौ मी. | ३५२२५५२.०० | | | | |
| ९९ | | सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगाळू डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ६७८ | हे.२.४५.०० आर चौ.मी. पो.ख. क्षेत्र ०.०४.०० | ७२४८८८८.०० | | | | |
| १०० | | श्रीमंत निंगप्पा पाच्छापुरे डी. व सब डी, सोलापूर पैकी ता. अक्कलकोट, मौजे गाव नागणसूर | ८०६/२/अ/२ | हे.१.२१.०० आर चौ. मी. | ३५२२५५२.०० | | | | |
| | कर्ज रक्कम बाकी दि. ३१/१२/२०२४ अखेर | रु. ३,७७,३१,३०२/- (अधिक पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च) | | | | | | | |
| | लिलावाचे ठिकाण, तारीख व वेळ | **श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर** ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ बंद लिफाफ्यात निविद सादर करणेचे दिनांक - ३१/०३/२०२५ वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची वेळ सायंकाळी ५.५० वा. | | | | | | | |

**टिप-**

१. लिलावात भाग घेणाऱ्यानी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम २८/०३/२०२५ पूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डीमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर अथवा आरटीजीएसनेने भरणा करावी.
२. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या दिवशी लिलावपूर्वी वाचून दाखविण्यात येथील आणि त्या बँकेच्या सूचना पत्रक मध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकती संबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.
५. स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थितीमध्ये विक्री करण्यात येईल.
६ लिलावाचे सर्व अधिकार व हक्क बँकेने राखून ठेवले आहेत.

**दिनांक : २८/०२/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# करमाळा तालुक्यातील पाणी टंचाई बाबत नियोजन करा

## आ. नारायण पाटील यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२८ फेब्रुवारी**

करमाळा तालुक्यातील संभाव्य पाणी टंचाई बाबत प्रशासकीय स्तरावरुन आताच योग्य ते नियोजन करा अशी सूचना विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांनी केली. करमाळा येथील संभाव्य पाणी टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. करमाळा तालुक्यातील नागरिकांना आगामी काळात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये म्हणून आ. नारायण आबा पाटील यांनी एका संभाव्य पाणी टंचाई बैठकीचे आयोजन करण्याचे सुचित केले. त्यानूसार आज करमाळा पंचायत समितीच्या सभागृहात बैठक संपन्न झाली.



या बैठकीस तहसिलदार शिल्पा ठोकडे, सभापती अतुल पाटील, सदस्य राहुल सावंत, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष संतोष वारे, राजाभाऊ कदम, बाजार समिती संचालक देवानंद. बागल, प्राचार्य जयप्रकाश बिले, विकास गलांडे, प्रा. अर्जुनराव सरक उपस्थित होते. यावेळी तहसिलदार शिल्पा ठोकडे यांनी गतसालच्या पाणी टंचाईचा आधार घेऊन प्राप्त अहवालानुसार तालुक्यातील सद्यस्थिती बाबत माहिती मांडली. तसेच या बैठकीत माहिती देताना संबंधित विभागप्रमुखांना योग्य ती माहिती प्रत्यक्षात जमिनस्तरावरअथवा गावभेटी करुन घ्यावी आणि दहा दिवसाच्या आत योग्य व अचूक अहवाल सादर करावा असे आदेश दिले. तर आ. पाटील यांनी पाणी पुरवठा विभागाने दक्ष राहून उद्याच्या पाणी टंचावर मात करण्यासाठी आताच योग्य कार्यक्रम हाती घ्यावा. आमदार म्हणून आपणास हवे ते सहकार्य केले जाईल पण यातून जनतेच्या प्रश्नांची हेळसांड झाली नाही पाहिजे. जलजीवन योजनांच्या बाबतीत सर्व माहिती घेऊन एका समितीद्वारे प्रत्यक्षात कार्यस्थळावर जाऊन पाहणी केली जाईल. यात दोषी सापडलेल्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई केली जाईल असा इशारा दिला तसेच सर्वच शासकीय विभागातील अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य माणसाला आपल्या कार्यालयात तो काम घेऊन आल्यास त्यास सन्मानाची वागणूक करुन त्याची समस्या जाणून घेतली गेली पाहिजे. सर्वसामान्य माणसाला एकाच कामासाठी हेलपाटे मारायला लावणे अथवा चुकीची माहिती देऊन त्याच्या कामाची अडवणुक करण्याचे प्रकार किमान माझ्या आमदार पदाच्या कार्यकाळात तरी खपवून घेतले जाणार नाहीत असे स्पष केले. या बैठकीत अनेक गावातील सरपंचांनी आपल्या गावातील समस्या आमदारांच्या समोर मांडल्या. विशेषत महिला सरपंचांनी सुध्दा या आढावा बैठकीत आपल्या गावातील समस्या मांडल्या. या बैठकीस पाणीपुरवठा उपअभियंता निहाल शेख उपस्थित होते.

---

## संक्षिप्त वृत्त



### जीवनामध्ये समाधान, संतुष्टता पाहिजे : शिवरात्री बहेन

**माळीनगर दि.२८ फेब्रुवारी -**

आपण केलेले सकारात्मक विचारच आपल्याला तारणार आहेत जीवनामध्ये समाधान संतुष्टता पाहिजे. जशी दृष्टी तशी सृष्टी असते. दुसऱ्याच्या अवगुणांचे वर्णन करत बसाल तर नकळत ते अवगुण आपल्या विचारात येतात, असे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या अकलूज केंद्राच्या प्रमुख शिवरात्री बहेनजी यांनी सांगितले. महाशिवरात्रीनिमित्त सालाबाद प्रमाणे अकलूज केंद्रावर झेंडावंदन, प्रार्थना, दीपप्रज्वलन आणि केक कटिंगचे आयोजन केले होते त्यावेळी शिवरात्री बोलत होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लबचे संचालक केतन बोरावके, माळशिरस तालुका सराफ संघटना असोसिएशनचे अध्यक्ष नागनाथ नागणे, प्रकाश जामदार उपस्थित होते.



### अक्कलकोट माहिती अधिकार कार्यालयास योगेश सुळे, श्रीकांत कोळी यांची भेट

**अक्कलकोट, दि. २८ फेब्रुवारी-**

अधिकार सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे व माहिती अधिकार सोलापूर शहर प्रमुख श्रीकांत कोळी यांनी प्रथमच अक्कलकोट माहिती अधिकार कार्यालय विजयनगर येथे भेट दिली. अक्कलकोट तालुका व शहर पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले. अक्कलकोट तालुका व शहर माहिती अधिकार कार्यालय कडून जिल्हाध्यक्ष योगेश सुळे यांना स्वामी समर्थांची प्रतिमा श्रीफळ शाल देऊन सत्कार करण्यात आला. सोलापूर शहर प्रमुख श्रीकांत कोळी यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी वैशाली हावनूर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे यांच्या हस्ते करण्यात आला. अक्कलकोट शहर अध्यक्ष समर्थ बिराजदार यांचाही योगेश सुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अक्कलकोट शहर संघटक संदीप राचेटि, अक्कलकोट तालुका माहिती अधिकार प्रचार संयोजक प्रवीण घाटगे, अक्कलकोट तालुका माहिती अधिकार महिला आघाडी अनिता घोडके, जयश्री कोलाटी, वर्षा मेत्रे, बसवराज गोरे, समर्थ मसूती, आकाश बबलाद, अक्कलकोट तालुका कार्याध्यक्ष स्वामीनाथ हेगडे सर्व नूतन माहिती अधिकार पदाधिकाऱ्यांचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### अणदूरच्या जवाहर महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा

**अणदूर, दि. २८ फेब्रुवारी-**

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक भारत सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. मल्लिनाथ बिराजदार, डॉ. प्रसन्न कदंले उपस्थित होते. यावेळी सातपुते म्हणाले, मराठी भाषेचा एक दिवसापुरता गौरव न करता आपण दैनंदिन जीवनामध्ये मराठीचा वापर केला पाहिजे. त्याचा प्रसार व प्रचार केला पाहिजे. अध्यक्षीय समारोप प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांनी केला. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ.प्रसन्न कंदले यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले.

### 'स्वेरी'त उद्या पत्रकारितेवर कार्यशाळा

**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

पंढरपूर प्रेस क्लब आणि 'स्वेरी'च्या वतीने रविवारी २ मार्च रोजी 'पत्रकारिता काल, आज आणि उद्या' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा होणार असल्याचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे व अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी सांगितले. सकाळी ९.३० वा ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर कार्यशाळेचे उद्घाटन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर राहणार आहेत. 'पत्रकारीतेसमोरील आव्हाने आणि समाजातील सर्व घटकांचा पत्रकारिता यावर पत्रकार राहुल कुलकर्णी व विनोद सिरसट विचार मांडणार आहेत. पंढरपूर व वारकरी संत साहित्य संदर्भातील पत्रकारांचे योगदान यावर ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, सचिन परब, विजय चोरमारे विचार मांडणार आहेत. अधिक माहितीसाठी स्वेरीचे जनसंपर्क अधिकारी संतोष हलकुडे (९८५०२४२१५५) व स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार (९५४५५५३८८८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## निधन वृत्त...

### नागेश कलढोणे



**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**

निवृत्त नायब तहसीलदार नागेश रामचंद्र कलढोणे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन. तुळजापूर येथे दर्शनासाठी गेले असताना हृदयविकाराच्या तीव्र झटका आल्याने त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांनी महसूल विभागात अव्वल कारकून म्हणून सुरुवातीला काम केले. त्यानंतर त्यांनी बार्शी, सोलापूर, मंगळवेढा, मोहोळ या ठिकाणी त्यांनी आपली सेवा केली. सेवानिवृत्तीच्या वेळेस ते नायब तहसीलदार म्हणून निवृत्त झाले.

### प्रशांत देशपांडे



**सांगोला,दि. २८ फेब्रुवारी-**

सांगोला शहरातील महादेव गल्ली येथील शनी मंदिरा समोर राहणारे प्रशांत अरविंद देशपांडे (वय ५०) यांचे अल्पशा आजाराने सोलापुर येथील खाजगी रुग्णालयामध्ये निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगी, भाऊ, बहिणी असा परिवार आहे. त्यांना रिक्षावाले देशपांडे म्हणून ओळखले जात असे.

---

# पिलीव येथील वकृत्व स्पर्धेत १५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २८ फेब्रुवारी -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी विद्यार्थी संघटना आठवणी ९५ ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वकृत्व स्पर्धेत १५० विदयार्थीनी सहभाग नोंदवीला. स्पर्धेची सुरुवात सेवानिवृत्त मुख्याध्यापक कृष्णा देशमुख व चंद्रकांत गाटे व आठवणी ९५च्या पदाधिकारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सावित्रीबाई फुले व महादेवाच्या प्रतिमेचे पुजन करुन करणयात आले. या स्पर्धेत १५० पेक्षा जास्त विदयार्थीनी सहभाग नोंदवीला.



यामध्ये गट क्रमांक एक पहीली दुसरी यामध्ये प्रथम शौर्या ठेंगल, द्वितीय सृष्टी पांढरमिसे, तृतीय ईश्वरी मदने, उत्तेजनार्थ स्वराली रणवरे, संजिवीनी लेंगरे, दुसऱ्या गटामध्ये प्रथम वेदीका मदने, यशराज पवार, तृतीय माहेरा तांबोळी, उत्तेजनार्थ वृषाली जावळे व सानिका शेंडगे, तिसऱ्या गटामध्ये पाचवी ते सातवीचे विद्यार्थी, प्रथम संहीता बोडरे, दुसरा मोहीनी लेंगरे, तृतीय भाग्यश्री सातपुते व असीन शेख तर उत्तेजनार्थ अतिफ आतार व राधीका गोडसे सर्व विदयार्थना बक्षीस म्हणून रोख रक्कम, ट्रॉफी, प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देणयात आले. पारितोषिक वितरण कार्यक्रमास सामाजिक कार्यकरत्या श्रद्धा जवंजाळ, केंद्रप्रमुख राजकुमार फासे, राजेंद्र सुरवसे, राजू गोरवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक कृष्णा देशमुख व चंद्रकांत गाटे, यासह आठवणी ९५ सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी श्रद्धा जवंजाळ, देशमुख गुरुजी, प्रा. भागवत जाधव, प्रेमनाथ रामदासी, सचिन गाटे, झाडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सदरच्या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून सुहास उरवणे, प्रेमनाथ रामदासी, किरण डोंगरे व नागेश वाघमोडे यांनी काम पाहिले. यावेळी आठवणी ९५ ग्रुपचे अध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष नितीन शिंदे, सल्लागार सचिन गाटे, उमेश देशमुख, अविनाश जेऊरकर, गुरूदेव पंडीत, विशाल शिर्के, शैलेश झिंजे, प्रा.भागवत जाधव, जयंत गोरे,विजय सपाटे, संग्राम पाटील, आबासाहेब पाटील, राणी गुजरे उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन गाटे यांनी केले तर आभार उपाध्यक्ष नितीन शिंदे यांनी मानले.

# रामलिंगेश्वर प्रशालेत विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

श्रीक्षेत्र तीर्थ (दक्षिण सोलापूर) येथील रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी विज्ञान शिक्षक नागराज पाटील यांनी भारतरत्न चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या विषयी मनोगत व्यक्त करून त्यांच्या वैज्ञानिक योगदानाबद्दल आपले मत व्यक्त केले. विज्ञानाला वगळा गतप्रभजनी होतील तारांगणे, विज्ञानाला वगळा विकेल कवडी मोलावरती ही जिणे आजचे विज्ञान म्हणजे उद्याचे तंत्रज्ञान, विज्ञानाचा अंतिम उद्दिष्ट म्हणजे मानव जातीचा विकास करणे हेच होय. विज्ञानाचा स्पर्श जिथे जिथे होतो तिथे तिथे जणू जादुई नगरीच साकार होते. असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी केला.

कार्यक्रमास शिल्पा महिंद्रकर, सिद्धेश्वर बिराजदार, सचिन गुजा, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, रेवणय्या मठपती, राजकुमार देडे, गुरुशांत बिराजदार, बाबूलाल धोडमिसे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी तर आभार शांतप्पा बगले यांनी मानले.

# अंतरराज्य टोळीतील बॅग लिफ्टींग करणारे दोन आरोपी पंढरपुर शहर पोलीसांकडुन गजाआड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२८ फेब्रुवारी -**

अंतरराज्य टोळीतील बॅग लिफ्टींग करणाऱ्या दोन आरोपींच्या मुसक्या पंढरपुर शहर पोलीसांनी आवळल्या आहेत. योहान प्रसाद गुड्डेटी आणि रवि नागराज नायडु अशी जेरबंद करण्यात आलेल्या आरोपींची नांवे आहेत.

या कारवाईची पंढरपूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शहरातील सरगम चौक येथे असलेल्या एच.डी.एफ.सी. बँकेच्या बाहेर घडला असुन यातील फिर्यादीची पैशाची बॅग ही चोरीला गेली होती. त्याप्रमाणे तपास केला असता गुन्हा करणारे आरोपी हे कपारलाटिप्पा पोस्ट बिटरगुंटा ता कावली नि वेल्लोर राज्य आंध्र प्रदेश येथील असल्याची खात्री झाली होती. सदर आरोपींच्या मागावर पोलीस होते. त्या टोळीतील काही आरोपी हे आंध्र प्रदेश मधुन निघाले असुन ते सोलापुर जिल्हयात येणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली असल्याने त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांनी सापळा रचुन गुन्हयातील दोन संशयीत आरोपींना गुन्हा करते वेळी वापरलेले दोन्ही मोटार सायकलीसह ताब्यात घेतले. दरम्यान त्यांचेकडुन चोरी करण्या करीता वापरले जाणारे काही संशयीत वस्तु मिळुन आल्या आहेत. या बरोबरच गुन्हयात चोरीस गेलेल्या रकमेपैकी ३ लाख रूपये जप्त करण्यात आलेले आहे. या कारवाई मध्ये मजुरीचे काम करणारे योहान प्रसाद गुड्डेटटी (वय ४६) आणि रवि नागराज नायडु (वय ४९ दोघे राहणार कपारलाटिप्पा पोस्ट बिटरगुंटा ता. कावली जि वेल्लोर राज्य आंध्र प्रदेश) यांना जेरबंद करण्यात आले आहे. ही कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, पंढरपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोसई राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, सपोफौ कल्याण ढवणे आणि त्यांचे सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांनी पार पाडली.



# अतिक्रमण काढण्यासाठी मंगळवेढ्यात हलगीनाद मोर्चा

## सात दिवसात कार्यवाही करण्याचे प्रशासनाने दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२८ फेब्रुवारी-**

मंगळवेढा नगरपरिषद हद्दीतील माळी गल्लीनजीक असणाऱ्या गावठाण भागातील अतिक्रमण हटवावे या मागणीसाठी नागरिकांनी नगरपालिकेवर हलगी मोर्चा काढत आंदोलन केले. येत्या सात दिवसात अतिक्रमण काढू असे लेखी आश्वासन नगरपालिका प्रशासनाने दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

अतिक्रमणाबाबत परिसरातील नागरिकांनी मंगळवेढा नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना वारंवार माहिती देऊनही अतिक्रमण काढले नाही. त्यामुळे महिला, युवक, पुरुषांनी माळी गल्ली येथून नगरपालिकेवर हलगीनाद मोर्चा काढत आंदोलन केले. हलगीच्या कडकडातामुळे नगरपालिका परिसरात एकच आवाज घुमत होता. यावेळी सचिन जगताप, संजय माळी, सर्जेराव आवताडे, लक्ष्मण कट्टे, गोपीनाथ माळी, पांडुरंग मेहेरकर, तुकाराम कुदळे, ज्ञानेश्वर भिमदे, शंकर माळी, दामाजी माळी, संतोष माळी, सचिन माळी, प्रशांत वांढरे, धनाजी माळी, नवनाथ गायकवाड, अशोक घाडगे, तुकाराम कदम, शंकर गायकवाड, चंद्रशेखर गायकवाड, दत्तात्रय नांद्रेकर, दत्तात्रय गायकवाड, अजय गायकवाड, मुरलीधर माळी, बंटी माळी, किशोर मेहेरकर, अविनाश माळी, रामा उपाडे, गौरीहर माळी, दादा माळी, अभिषेक जाधव, सत्यनारायण माळी, अमित मेहेरकर, गोरख पोळ, ऋतिक आदमाने, दत्तात्रय माळी, अभिषेक गायकवाड, आशिष मेहेरकर, श्रीशैल्य माळी, ओंकार मेहेरकर, आलोक मेहेरकर, सागर माळी, राहुल माळी, शिदलिंग मेहेरकर, अक्षय चव्हाण, सतीश माळी, सूरज घाडगे, बंडोपंत माळी, अमर भगरे, बबन माळी, बबन आसबे, अभिजीत जाधव, पिंटू गायकवाड, आदित्य माळी, पंकज माळी, बाळासाहेब वांढरे, महेश भीमदे, नंदकुमार माळी, दिगंबर माळी, हर्षवर्धन गायकवाड, तुकाराम भीमदे, गणेश भीमदे, शंकर बापू माळी, राजू मेहेरकर, सिद्धेश्वर चव्हाण, प्रथमेश बचुते यांच्यासह माळी गल्ली, कोंडुभैरी गल्ली, वडार गल्ली, कैकाडी गल्ली परिसरातील शेकडो महिला व लहान मुले उपस्थित होती.



### एक एकर जागेला तार कपाऊंड

सांगोला नाका येथून काही अंतरावर असणाऱ्या एका महाविद्यालयासमोर टप्प्याटप्प्याने अतिक्रमण करत असून, आतापर्यंत त्याठिकाणी तीन गाळ्यांचे पत्राशेड बनवले आहेत. जवळपास १ एकर परिसराला तारेचे कंपाउंड केले असून माझीच जागा असल्याच्या अविर्भावात तो सध्या वावरत आहे.




# शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ कराव्यात : कोकळगी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ फेब्रुवारी-**

आधुनिक वैज्ञानिक युग साकारण्यात विज्ञानामुळेच यश मिळाले आहे, त्यामुळे मानव प्रगतीच्या विळख्यात घट्ट बांधला गेला आहे. अशी स्थिती असताना शिक्षण संस्थांनी विज्ञानाकडे प्रगल्भतेने पाहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृती रुजावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे अशी अपेक्षा महाविद्यालय विज्ञान विद्या शाखा प्रमुख पूनम कोकळगी यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते प्रारंभी वैज्ञानिक सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा नेहा गंदमल व प्रा. प्राची गणेचारी यांनी केले. आभार प्रा. विद्याश्री वाले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. मनीषा शिंदे, प्रा. मधुबाला लोणारी यांनी प्रयत्न केले.

# बचेरीतील पोल्ट्रीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## ताबडतोब दंडात्मक कारवाई करुन पोल्ट्री बंद करणयाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २८ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील प्रा. रामलिंग सावळजकर यांच्या पोल्ट्रीमुळे लोखंडेवस्ती, मानेवस्ती, शिंदेवस्ती परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरुन वायू प्रदूषण होत आहे. या परिसरात माशांचे प्रचंड प्रमाण वाढल्याने त्याच माशा अन्नपदार्थावर बसून अन्न दूषित होऊन या भागात विविध रोगांचा झपाट्याने प्रसार होत आहे.

दुर्गंधीमुळे श्वसनाचे विकार, लहान मुलांमध्ये उलट्या, जुलाब, डोळ्याचे आजार दिवसेंदिवस वाढत आहेत. याबाबत ग्रामपंचायतीकडे नागरिकांनी वारंवार लेखी तक्रार करुनही ग्रामपंचायतीने याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याची जबादारी ग्रामपंचायतीची आहे. तरीसुद्धा ग्रामपंचायतीने फक्त तोंडी सूचना देऊन सदरचे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामसभेत या विषयावर चर्चा होऊनही ग्रामपंचायत संबंधित पोल्ट्रीला बेकायदेशीररित्या संरक्षण देत आहे. याबाबत जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाने ग्राम पंचायतीला सदरच्या पोल्ट्रीवर ताबडतोब कारवाई करण्याचे लेखी आदेश दिले आहेत. तरीही ग्रामपंचायत याबाबत कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा, जीवन-मरणाचा प्रश्न असताना या नागरिकांना वेठीस धरणाऱ्या उच्चशिक्षित प्रा. रामलिंग सावळजकर यांच्या पोल्ट्रीवर सरपंच राणीताई गोरड यांनी ताबडतोब कारवाई करुन या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ताबडतोब सोडवावा अन्यथा या भागातील नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात असून ते न्यायालयीन लढाईसुद्धा लढणयास तयार आहेत. ग्रामपंचायतीने नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असताना ग्रामपंचायत कारवाई करण्यास का टाळाटाळ करीत आहे असा प्रश्न या भागातील नागरिकांमधून विचारला जात आहे.




### पोल्ट्री फॉर्मला ग्रामपंचायतीची नोटीस

बचेरीच्या सरपंच राणी गोरड यांना विचारले असता याबाबत नागरिकांनीच्या तक्रारीची दखल घेत आम्ही आरोग्य विभागाला लेखी पत्र देऊन चौकशी करावी. तसेच जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पत्र प्राप्त होताच आम्ही ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधित पोल्ट्रीधारकाला या भागात पोल्ट्रीमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत योग्य ती काळजी घ्यावी. जेणेकरुन या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत लेखी नोटीस दिल्याचे सरपंच गोरड यांनी सांगितले.

# मनोहर सपाटे सांस्कृतिक भवन लवकरच जनतेच्या सेवेत

स्वतःला बक्षीस म्हणून मिळालेली जागा मनोहर सपाटे यांनी अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर या संस्थेला बक्षीसरुपाने घेऊन त्या ठिकाणी भव्य असे सांस्कृतिक भवन बांधून ते लवकरच जनतच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देत आहेत.

कै. बाबासाहेब गावडे यांनी सामाजिक ऋण म्हणून मराठा मंदिर मुंबई या संस्थेची स्थापना करुन महाराष्ट्रातील अनेक जिल्हयात या संस्थेच्या वतीने शाळा व वस्तीगृह सुरु केले होते. आपल्या कमाईतील काही हिस्सा समाजासाठी राखून ठेवला पाहिजे या उदात्त हेतुने कै. गावडे यांनी सोलापूर येथे हरीभाई देवकरण शाळेच्या पाठीमागे मराठा मंदिराची उभारणी करुन या ठिकाणी मुलांचे वसतीगृह उभा केले होते. या वसतीगृहातुन अनेक विदयार्थी शिकुन मोठे झालेले आपणास पहावयास मिळतील.



१९८३-८४च्या आसपास हे मराठा मंदिर वसतीगृह कै. गावडे यांनी सोलापूरातील मराठा समाज सेवा मंडळ या संस्थेला चालवायला दिले. काही वर्षे हे वसतीगृह चालवल्यानंतर पुढे मात्र मराठा मंदिर मुंबई आणि मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर या दोंन्ही संस्थेमध्ये वाद निर्माण झाले. पुढे या वादाचे कोर्ट कचेरीत रुपांतर होऊन ही जागा मुळ मराठा मंदिर मुंबई या संस्थेकडे वर्ग झाली. कोर्ट कचेरीच्या कामामुळे कै. गावडे आणि मनोहर सपाटे साहेब यांची ओळख वाढल्याने सपाटे साहेब यांनी ही जागा मराठा समाज सेवा मंडळाला देण्याची विनंती बाबासाहेबांकडे केली. योग्य वेळ आल्यावर निर्णय घेऊ असे गावडे यांनी सपाटे साहेबांना सांगीतले. परंतु बाबासाहेबांचे आकस्मिक निधन झाले. पुढे मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब बनले. सपाटे व पवार साहेब यांचेबरोबर जिव्हाळयाचे संबध असल्याने सपाटे साहेबांनी आपल्या या राजकीय संबंधाचा वापर करुन मराठा मंदिर, सोलापूर ही जागा मराठा समाजसेवा मंडळाला मागीतली. मराठा समाज सेवा मंडळाच्या पुर्वाश्रमीच्या पदाधिकाऱ्यांनी कै. गावडे यांचेबरोबर संघर्ष केलेला असल्याने ही जागा मराठा समाज सेवा मंडळाला देता येणार नाही, असे पवार साहेबांनी सांगीतले. पण माघार घेणार ते सपाटे साहेब कसले? त्यांनी पवार साहेबांकडे आपल्या जिव्हाळयाच्या संबंधामुळे हट्टच धरला. शेवटी पवार साहेब श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ या सपाटे साहेबांच्या वैयक्तिक संस्थेला ही जागा बक्षीसपत्र करुन दयायला तयार झाले. स्वतःच्या संस्थेपेक्षा समाजाची संस्था मोठी झाली पाहिजे म्हणून सपाटे साहेबांनी मराठा समाज सेवा मंडळालाच ही जागा देण्याविषयी पुंन्हा पवार साहेबांकडे हट्ट केला. मी तुला ही जागा देतो आहे, तुला काय करायचे ते कर म्हणून पवार साहेबांनी सपाटे साहेबांना सांगीतले. शेवटी दि. ६ फेब्रुवारी १९९६ रोजी सपाटे साहेबांनी कै. गावडे यांचे चिरंजीव राजेंद्र गावडे व संस्थेचे सचिव श्री. बबलादी यांचेकडून मराठा मंदिर सोलापूरची ही जागा मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर या संस्थेला बक्षीसपत्र करुन घेतली. पुढे दि. ०७ जानेवारी १९९९ रोजी शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते व सुशीलकुमार शिंदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली या ठिकाणी इमारतीचे भुमीपूजन झाले.

मराठा मंदिर सोलापूर या ठिकाणी आज आठ ते नऊ कोटी रुपये खर्च करुन मनोहर सपाटे सांस्कृतिक भवन, भव्य असे डायनिंग हॉल, कै. बाबासाहेब गावडे वस्तीगृहासाठी चाळीस खोल्या, एम.पी. एस.सी/यु.पी.एस.सी करण्याऱ्या मुलांच्यासाठी अभ्यास केंद्र आदी सुविधा जवळपास पंचवीस हजार स्केवअर फुटाचे बांधकाम करुन सपाटे साहेब निर्माण करुन देत आहेत. हॉलच्या रंगरंगोटीचे काम सध्या सुरु आहे. लवकरच जनतेच्या सेवेसाठी हे सांस्कृतिक भवन कार्यरत होईल. सपाटे साहेबांच्या हट्टामुळे खरे तर ही जागा पवार साहेबांनी सपाटे साहेबांना बक्षीसरुपी दिली. परंतु सपाटे साहेबांनी ही जागा स्वतःला न घेता मराठा समाजाची असलेली संस्था मराठा समाज सेवा मंडळ या संस्थेला बक्षीसपत्र करुन घेतली. स्वतःचा स्वार्थ न पाहता मराठा समाजाचे सांस्कृतिक केंद्र सोलापूरात तयार झाले पाहिजे, समाजाची ताकद वाढली पाहिजे. या हेतुने त्यांनी भव्य अशा मनोहर सपाटे सांस्कृतिक भवनची निर्मिती केली आहे. आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने शुभेच्छा देताना निर्माण केलेली वास्तु सोलापुरच्या वैभवात निश्चीतच भर घालेल.

**- ज्ञानेश्वर (आप्पा) सपाटे**
सांस्कृतिक कमिटी चेअरमन
मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर.
मो.नं.८२७५२०२९०६

## सपाटेंच्या दानामुळेच सांस्कृतिक भवन साकारणार

माजी महापौर मनोहर सपाटे आणि माझा परिचय तसा जुनाच आहे. संस्थाचालक म्हणून त्यांच्या सहवासात राहण्याचा मला योग आला. अध्यक्ष सपाटे हे जसे कर्तृत्वान तसे ते दानशूर देखील आहेत. याचा प्रत्यय मला त्यांनी मराठा मंदिर मुंबई यांच्याकडून हरिभाई प्रशालेच्या मागे मिळालेली वसतिगृहाची जागा सपाटे यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली होती. परंतु त्यांनी ती वैयक्तिक न ठेवता समाजासाठी म्हणून दान दिली. आज त्याच वास्तुत त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि नावाने सुध्दा मनोहर सपाटे सांस्कृतिक भवन अर्थात मंगल कार्यालय उभारले. त्यामुळे त्यांचे मोठेपण अवर्णनीय आहे. आज या जागेची किंमत ५० कोंटीच्या घरात असेल. परंतु सपाटे यांनी समाजासाठी आणि समाजातील मुलांसाठी त्यावर पाणी सोडून त्याला सार्वजनिक रुप दिले. यातच त्यांचे मोठेपणा दिसून येते. अर्थातच या कामी त्यांना या संस्थेत काम करणारे त्यावेळेचे कै. चंद्रकांत येवले, मधुकर लोंढे, माजी प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, प्राचार्य डॉ. मधुकर पवार, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, दीपक डुरे-पाटील, प्रा. संतोष गवळी, दत्तात्रय सुतार, विलास झरेकर, संतोष अलकुंटे, राजु कसबे यासारखे प्रामाणिक कर्मचारी यांचीही साथ तेवढीच मोलाची ठरली. त्यामुळेच आज ही देखणी वास्तु उभी आहे. तिला देण्यात आलेले नावही इमारतीला साजेचे असेच आहे. सपाटे हे आज वयाची ७४री साजरी करीत आहे ते शंभरी पार करोत. १९९३ साली सपाटे यांनी छत्रपती शिवाजी प्रशालेच्या इमारतीतील जागा कमी पडू लागल्याने व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र विभाग म्हणून याच मराठा मंदिर येथे स्थलांतरीत करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्यामुळेच संस्थेला हे वैभव पाहायला मिळत आहे. प्रा. महेश माने यांची त्यांना मिळणारी साथही महत्वाची आहेत. त्यामुळेच आज आमची संस्था चौफेर प्रगती करीत आहे. सपाटे यांना आजच्या शुभदिनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांना परमेश्वराने दीर्घायुष्य द्यावे, ही प्रार्थना करतो.



**- दत्ता भोसले**
अध्यक्ष, कॉलेज कर्मचारी युनियन सोलापूर जिल्हा

# मनोहरपंत सपाटे एक क्रीडाप्रेमी

प्रत्येक लहान मुलांना कोणत्या ना कोणत्या खेळाची आवड असते. तशी शालेय जीवनात सपाटे साहेबांनाही कबड्डी या खेळाची खूप आवड होती. याचे कारण म्हणजे कबड्डी मधील प्रतिस्पर्ध्याच्या अंगणात जाऊन ललकारून त्याच्यावर हल्ला करीत बाद करणे, हे त्यांच्या आवडीचे कौशल्य होते. त्यामुळेच पुढे जीवन जगत असताना कबड्डीतील कौशल्याचा उपयोग करून घेतला. आज आपण पाहतो ते राजकारणात खूप आक्रमकपणे प्रतिस्पर्ध्यावर मात करीत असतात. त्यामुळेच त्यांनी सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवकापासून स्थायी समिती चेअरमन ते महापौरपदापर्यंत अनेक पदे पादाक्रांत केली आहेत. माजी महापौर कै. पुरणचंद्र पुंजाल यांच्या सूचनेनुसार आंतरराष्ट्रीय जलतरण आणि पार्क स्टेडियमची स्टेडियम उभारण्यासाठी त्यांनी निर्णय घेतले. प्रतिवर्षी महापौर चषक स्पर्धा घेण्यासाठी प्रोत्साहन दिले.



### कबड्डीचे नेतृत्व राजकारण व समाजकारणात उपयोगी

कबड्डी खेळताना आणि स्पर्धेच्या वेळी ते आपल्या संघातील सहकारी खेळाडूंना सोबत घेऊन प्रत्येकास कशा पद्धतीने खेळावयाचे हे अधिकाराने सांगत आणि संघाचे नेतृत्व करीत असत. हाच गुण त्यांना राजकारण आणि समाजकारण करत असताना उपयोगात आला. आपल्या कबड्डी संघाला विजयापर्यंत घेऊन जाण्यासाठी मार्गदर्शक अशी चर्चा करून चढाई आणि बचाव कसा करावा, याचा निर्णय घेत. मार्गदर्शकाबरोबर चर्चा करून पुढील चढाईचा निर्णय घ्यावयाच्या सवयीमुळे राजकारणातही आमदार युनूसभाई शेख असो अथवा राष्ट्रीय नेते शरद पवार साहेब असो यांचे मार्गदर्शन मिळवण्यात ते यशस्वी झाले.

शालेय विद्यार्थी दशेमध्ये कबड्डी खेळातील बक्षीस ज्यांच्या हातून स्वीकारले ते मराठा समाज सेवा मंडळ या संस्थेचे तात्कालीन अध्यक्ष होते. ज्यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारले, त्याच संस्थेचे आपणही अध्यक्ष व्हायचे, अशी त्याचवेळी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली आणि स्वतःमधील नेतृत्व गुण विकसित करत आज या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आपले मार्गदर्शक शरदचंद्रजी पवार यांच्या नावे मोठे शिक्षण संकुल उभे करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले.

### शरद बँकेची निर्मिती

कबड्डी खेळाचा सराव करताना तसेच स्पर्धेच्या वेळी बँकिंग क्षेत्रातील व्यक्तीची मदत होती. हे पाहून आपणही एक मोठी बँक काढायची आणि अनेकांचा सत्कार करायचा. त्याचबरोबर गोरगरीब व्यक्तींना आर्थिक मदत करावयाची हे त्यांनी ठरवले होते. त्यातूनच त्यांनी शरद बँकेची निर्मिती केली आणि मोठ्या प्रमाणावर युवकांना उद्योग व व्यवसायासाठी भांडवल उभारणीसाठी पतपुरवठा करत आहेत.

### प्रतिवर्षी मॅरेथॉन स्पर्धा घेतात

शरद पवार साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्य मॅरेथॉन स्पर्धा, भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा हे दरवर्षी मोठ्या उत्साहाने आयोजित करत. तसेच शिवाजी संकुलातील शाळा आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक खेळाच्या स्पर्धांचे आयोजन करताना मार्गदर्शन करत आले आहेत. छत्रपती शिवाजी संकुलातील अनेक विद्यार्थ्यांना क्रीडांगण साहित्य उपलब्ध केल्यामुळेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू चमकले. हे सगळे यश सपाटे साहेबांच्या संघटन कौशल्यामुळे आणि पाठिंब्यामुळेच शक्य झाले. जवळपास दोनशे ते तीनशे खेळाडू याच माध्यमातून घडले आहेत.

**- प्रा. संतोष गवळी**
शारीरिक शिक्षण संचालक







सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सुजाता लोहकरे यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले सन्मान २०२५ या पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्त्या आणि निवृत्त शिक्षण अधिकारी सुजाता लोहकरे यांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण ८ मार्च रोजी विद्यापीठाच्या श्री संत ज्ञानेश्वर सभागृहात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार आहे.



विद्यापीठाच्या संत ज्ञानदेव अध्यासनाच्या प्रमुख, ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांच्या समितीने ही निवड केली आहे. सुजाता लोहकरे या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन संस्थेत भाषा विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. मतिमंद व्यक्तींच्या कल्याणासाठी कार्यरत मैत्र फौंडेशन या संस्थेच्या त्या विश्वस्त सचिव असून गेल्या ६ वर्षापासून करकंब तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर येथे विशेष मित्रांसाठी उद्योग केंद्र तसेच विशेष मुलांच्या पालकांचे समुपदेशन, विशेष शाळांमधील पालकांसाठी जनजागृती शिबिरांचे आयोजन संस्थेच्यावतीने करण्यात येते.



## संक्षिप्त वृत्त...

### ९ मार्च रोजी अखिल भारतीय पद्मशाली संघमचे अधिवेशन

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय पद्मशाली संघमच्या वतीने रविवार दि. ९ मार्च रोजी हैदराबाद येथील एक्झिबीशन ग्राउंड येथे १७ वे अखिल भारतीय पद्मशाली अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अखिल भारतीय युवक संघाचे अध्यक्ष श्रीनिवास संगा यांनी पत्रकार परिषदेत दिली. या अधिवेशनात राष्ट्रीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातील अडचणी व संधींवर विचारमंथन करण्यात येणार आहे. समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. समाजातील सामूहिक एकता, भविष्याचा विकास आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार या अधिवेशनात करण्यात येणार आहे.यावेळी विविध राज्यातील विविध विभाग संघमचे पद्मशाली समाजातील महिला, युवक, डॉक्टर, विविध क्षेत्रातील कामगार हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक अधिवेशनात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष श्रीनिवास संगा यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सुरेश फलमारी, संतोष सोमा, अशोक इंदापुरे, रमेश क्यारमकोंडा, शेखर कमटम आदी उपस्थित होते.

### एसटीमधून प्रवास करणाऱ्या महिलेचे लाखाचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी -**

एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेचे लाख रुपयांचे दागिने चोरट्याने लंपास केले. याबाबत गुलाबबाई भास्कर पवार (वय ६४, रा. हंजगी, ता. अक्कलकोट) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुलाबबाई पवार या २२ फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास अक्कलकोट ते फलटण या एसटी बसमधून सोलापूरकडे येत होत्या. त्यावेळी वळसंग ते रंगभवन या दरम्यानच्या प्रवासामध्ये अज्ञात चोरट्याने गुलाबबाई यांच्याकडील सोन्याचे दागिने व पर्समधील रोख रक्कम असा १ लाख ३ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.

### भवानी पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी -**

शहरातील भवानी पेठ परिसरातून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत प्रभाकर बालय्या बिंगी (वय ४९, रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ फेब्रुवारी रोजी रात्री प्रभाकर बिंगी यांनी त्यांची एमएच १३ एई २५२४ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून घराबाहेर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पैकेकरी पुढील तपास करीत आहेत.



### गर्दीचा फायदा घेत चोरट्याने मोबाईल पळविला

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी -**

शनि मंदिर वल्याळ मैदान येथे दर्शनासाठी गेले असता गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मोबाईल चोरून नेल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी शशिकांत गोरखनाथ सुतार (वय-२५, रा. महादेव मंदिर हगलूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### भैय्या चौकातील लोखंडी अँगलला टेम्पोची धडक

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

भैय्या चौकात उभा करण्यात आलेले लोखंडी अँगल ला टेम्पोचा वरचा भाग धडकून काच फुटली. यात घंटागाडीतील एकजण जखमी झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ७:१५ च्या सुमारास घडला. आकाश राहुल कसबे (वय २५ रा बुधवार पेठ सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी कचरा घेण्यासाठी आकाश घंटागाडी मध्ये जात होता. दरम्यान भैया चौकातून जात असताना तेथील लोखंडे अँगलला टेम्पोच्या वरचा भाग धडकला. यामध्ये टेम्पोची काच फुटून कपाळाला लागल्याने आकाश जखमी झाला. मित्र मंगेश शिरसे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# जिल्ह्यातील लखपती दीदींना ३४३ कोटींचे कर्जवाटप

**लखपती दीदींसाठी उमेदचा उपक्रम | ९७ हजार ४४९ लखपती दीदी लाभार्थी | अनेक महिलांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

जिल्हा परीषद अंतर्गत उमेदमार्फत १ लाख १९ हजार ९०९ महिलांना लखपती बनविण्याचे उद्दीष्ट होते. त्यापैकी ९७ हजार ४४९ महिला लखपती बनल्या आहेत. उर्वरीत महिलांना लखपती बनवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी उमेदकडून प्रयत्न सुरू आहेत.

ग्रामीण भागातील गरीब, जोखीम प्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करणे. तसेच त्यांना विविध वित्तीय सेवा, शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी ''उमेद मार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यवसाय संधी निर्माण करून दिले जात आहेत. कर्जाच्या रक्कमेतून महिलांना लखपती बनविण्यासाठी उमेदचा उपक्रम सुरू आहे. लखपती दीदी कर्ज योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक महिला स्वतचे व्यवसाय सुरू करून आर्थिक स्वावलंबी बनत आहेत.

एक लाख ते तीन लाख, तीन लाख ते सहा लाख व सहा लाखांच्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना लखपती दीदी बनविण्यात येत आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकारच्या लखपती दीदी बनविण्याच्या योजनेला ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या (उमेद) प्रयत्नांच्या माध्यमातून बळ मिळत आहे. सोलापूर जिल्ह्याला एक लाख १९ हजार ९०९ लखपती दीदी बनविण्याचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी २०२४-२५ वर्षात ९७ हजार ४४९ महिला लखपती दीदी बनल्या आहेत.




### वार्षिक उत्पन्नाच्या महिलांची संख्या

९७४४९ लखपती दीदींपैकी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या एक ते तीन लाख वार्षिक उत्पन्न ८५३४१ महिला, तीन ते सहा लाख वार्षिक उत्पन्न ९५५३ महिला व सहा लाख वार्षिक उत्पन्नाच्या २५५५ महिला आहेत.

### ३२० कोटी कर्जवाटपाचे उद्दिष्ट

जिल्ह्यातील २३ हजार ६७५ स्वयंसहाय्यता समूहांना ३२० कोटी कर्जवाटपाचे उद्दिष्ट होते. शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत ६० कोटींचे उद्दिष्ट वाढवून मिळाल्याने ३८० कोटीपैकी ३४३ कोटींचे कर्जवाटप झाल्याची माहिती उमेदचे जिल्हा व्यवस्थापक सचिन चवरे यांनी दिली.

### उमेदमुळे महिलांच्या जीवनात क्रांती

सोलापूर जिल्हा परीषद उमेदमार्फत महिलांना वैयक्तिक कर्जासाठी २ हजार ४७४ जणांना जवळपास २५ कोटींचे कर्ज देण्यात आले आहे. १०० दिवसांच्या कार्यक्रमात वाढीव उद्दीष्टामुळे अधिक महिलांना कर्ज उपलब्ध करून देता आले. उमेदच्या माध्यमातून महिलांच्या जीवनात आर्थिक क्रांती होत आहे.

**डॉ. सुधिर ठोंबरे,**
**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

### वार्षिक उत्पन्नाच्या महिलांची संख्या

९७४४९ लखपती दीदींपैकी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या एक ते तीन लाख वार्षिक उत्पन्न ८५३४१ महिला, तीन ते सहा लाख वार्षिक उत्पन्न ९५५३ महिला व ६ लाख वार्षिक उत्पन्नाच्या २५५५ महिला आहेत.

### लखपती दीदी कर्जामुळे सेंद्रीय निविष्ठा सुरू

स्वयंसहायता गटाअंतर्गत उमेदकडून लखपती दीदी योजनेअंतर्गत पाच लाख रूपयांचे कर्ज मिळाले आहे. या कर्जाच्या रक्कमेतुन वडकबाळ येथील गोशाळेत सेंद्रीय खत निविष्ठ व्यवसाय सुरू केले६ महिलांना रोजगार उपलब्ध झाले आहे

**- उमा बिराजदार, लाभार्थी**



## सेन्सॉर बोर्डाच्या विरोधात युवा पँथर आक्रमक

**पद्मश्री नामदेव ढसाळ यांची अवहेलना करणाऱ्या सेन्सॉर बोर्ड अधिकाऱ्यांवर अॅट्रॉसिटी दाखल करा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

मराठी भाषेला विद्रोहाचा आयाम देऊन त्याला सातासमुद्रा पलीकडे नेऊन उपजत मराठी रसातळातील मराठी चे दर्शन घडवून देणाऱ्या शोषित पिढीताचा आवाज असणाऱ्या दलित पँथर चा लढा उभा करणाऱ्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा अपमान करू पाहणाऱ्या संसार बोर्डावर अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी युवा पँथर संघटनेच्या वतीने सोलापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोस्टर प्रदर्शन करीत आंदोलन करण्यात आले.

सोलापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात नामदेव ढसाळ त्यांच्या कवितेची माहिती देणारे पोस्टर्स दाखवत युवा पँथरच्या कार्यकर्त्यांनी सेन्सॉर बोर्डाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सेन्सॉर बोर्डाने माफी मागावी आणि सरकारने कारवाई करावी नाहीतर येणाऱ्या काळात आंबेडकरी संघटनांकडून बोर्डाचे जोशी यांच्या तोंडाला काळं फासण्याचा इशारा व पँथरचे आदेश बनसोडे यांच्याकडून देण्यात आला.

दिग्दर्शक महेश बनसोडे यांच्या ''चल हल्लाबोल'' या सिनेमा बाबत गेल्या चार महिन्यापासून सेंसोर बोर्ड आणि दिग्दर्शक यांच्यामध्ये कलगीतुरा चालू आहे एवढ्यातच सेन्सर बोर्डच्या अधिकाऱ्याने अकलेचे तारे तोडत ''कोण नामदेव ढसाळ''अशा आशयाची नोटीस महेश बनसोडे यांना दिली. त्या सेंसोर बोर्डाच्या अधिकारी निरीक्षक यांना जर दलित साहित्यामध्ये आणि मराठी साहित्याला विद्रोहाचा आयाम देणारे पद्मश्री नामदेव ढसाळ माहित नसतील तर त्यांना त्या पदावर राहण्याचा काडीमात्र अधिकार नाही. नोटीशी मध्ये कोण नामदेव ढसाळ असे बोलत जर ढसाळ बद्दल अपमान जनक वाचता करत असतील तर त्यांनी मराठी आणि विद्रोही साहित्याचा अपमान केला आहे. याने महाराष्ट्रातील तमाम साहित्यिकांची मन दुखवले गेलेले आहेत.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष आतिश बनसोडे, कार्याध्यक्ष आकाश चंदनशिवे, ऋत्वीक सोनकांबळे, मनोज डी, प्रज्वल पी. पी. रोहन सर्वगोड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आत्मनिर्भरतेतून विकसित भारतकडे नेणारा अर्थसंकल्प

**भाजपा महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते विनायक आंबेकर यांचा विश्वास**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत वाढणार असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल. १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प असून विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास भाजपा महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते विनायक आंबेकर यांनी व्यक्त केला.

सोलापुरात आले असताना आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केंद्रीय अर्थसंकल्पावर आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी ही माहिती दिली. भाजपा महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते विनायक आंबेकर म्हणाले की, नागरिकांची बचत वाढून तेच देशविकासाचे भागीदार कसे बनतील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून या चारही गटांच्या




सशक्तीकरणासाठी अर्थसंकल्पाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. सामाजिक क्षेत्र, लहान मुले व युवाशिक्षण, पोषण तसेच आरोग्यापासून स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीपर्यंत प्रत्येक क्षेत्राला गती देणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. हा अर्थसंकल्प गरीब आणि मध्यमवर्गीयांना सशक्त करणार असून तरुणांना रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करणारा आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला

ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र, उद्योजकता वाढ, रोजगारनिर्मिती, एमएसएम आदी क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि नाविन्यासाठी गुंतवणूक तसेच जागतिक स्तरावर आर्थिक स्पर्धात्मकतेसाठी निर्यात क्षेत्र या चार प्रमुख आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. करप्रणाली, शहरी विकास, खाणकाम, वित्तीय सुधारणा, ऊर्जा आणि नियामक सुधारणा या सहा क्षेत्रांतील सुधारणांना प्राधान्य देण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. देशाच्या उज्वल भविष्यासाठी मध्यमवर्गाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. १२ लाखापर्यंतच उत्पन्न करमुक्त, ज्येष्ठ नागरिकांसाठी बँक व्याजावर टी डी एस मर्यादा ५० हजार वरून १ लाख, घरभाड्यावर टी डी एस मर्यादा २.४० लाख वरून ६ लाख यांसारख्या महत्वाच्या निर्णयांमुळे मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळेल असे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस आ. विजयकुमार देशमुख, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, प्रवीण दर्गोपाटील जगदीश होनराव उपस्थित होते.

### या महत्वपूर्ण योजनांमुळे अन्नदाते सक्षम होतील

पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना, खाद्यतेल आत्मनिर्भरतेसाठी सहा वर्षांची विशेष मोहीम, मखाना आणि मत्स्य उत्पादनासाठी स्वतंत्र मंडळ, फळ-भाजीपाला उत्पादक व कापूस शेतकऱ्यांसाठी विशेष योजना, युरिया आत्मनिर्भरता योजना यांसारख्या महत्वपूर्ण योजनांमुळे देशातील अन्नदाते अधिक सक्षम होतील,असे प्रवक्ते विनायक आंबेकर यांनी सांगितले.

# धर्मवीर बलिदान मासानिमित्त १५८ तरुणांनी केले सामूहिक मुंडण

**छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या बलिदानाची आठवण; श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या दिव्य बलिदानाची आठवण म्हणून सोलापूर शहर परिसरातील तब्बल १५८ तरुणांनी शुक्रवारी सकाळी गणपती घाटावर सामूहिक मुंडण केले. फाल्गुन प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या असा संपूर्ण महिनाभर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून पाळल्या जाणाऱ्या धर्मवीर बलिदान मासास शुक्रवारी प्रारंभ झाला.

प्रारंभी गणपती घाट येथे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांनी केले. यानंतर जमलेल्या १५८ तरुणांनी सामूहिक मुंडण करून धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी संभाजी सूर्यहृदय या श्लोकांचे पठण करण्यात आले.

यावेळी धारकरी ओंकार देशमुख म्हणाले, सोलापुरातील शेकडो धारकऱ्यांनी महिनाभर एक वेळचे जेवण सोडणे, पादत्राणांचा त्याग करणे, गोड पदार्थांचा त्याग करणे, कोणत्याही आनंदाच्या समारंभामध्ये सहभागी होण्याचे टाळणे, दररोज चौकाचौकांमध्ये तसेच प्रत्येकाच्या घरामध्ये धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना संभाजी सूर्यहृदयमधील २५ श्लोक म्हणून श्रद्धांजली वाहणे असे कडक व्रत अंगीकारले आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात शेकडो ठिकाणी चौका-चौकांमध्ये दररोज श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. त्यामुळे हिंदू बांधवांनी आपल्या घराजवळील धर्मवीर बलिदान मासाच्या केंद्रावर जाऊन दररोज श्रद्धांजली वहावी, असे आवाहनही देशमुख यांनी केले.



### १६ मार्चला रक्तदान शिबीर

धर्मवीर बलिदान मासानिमित्त रविवार दि. १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवी पेठेतील शिवस्मारक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांनी हिंदू धर्मासाठी आपले रक्त सांडले, त्या छत्रपती श्री संभाजी महाराजांना रक्तदान करून श्रद्धांजली वाहण्यासाठी सोलापुरातील अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान करावे. तसेच २९ मार्च रोजी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त सायंकाळी ५ वाजता नवी पेठ येथील शिवस्मारक येथून मूकपद यात्रा काढण्यात येणार आहे. यात सर्व हिंदू बांधवांनी सहभागी व्हावे आणि अधिक माहितीसाठी ९८६०८२२२८३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे करण्यात आले आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४३

**दुष्ट बुध्दि चोरी करी निरंतर ।
तो म्हणे इतर लोक तैसे ।।**

बुध्दी ही माणसाला मिळालेली अत्यंत महत्वपूर्ण अशी नैसर्गिक देणगी आहे. हे सत्य असले तरी माणूस या देणगीचा सदुपयोगच करील असे मात्र नाही. कारण सर्वच लोक सदुपयोग करणारे असते तर समाजात बलात्कार, खुन, मारा-माऱ्या, चोऱ्या, फसवेगिरी, लुबाडणूक आदी विपरीत घटना घडल्याच नसत्या. त्याचबरोबर कोणाची मुलगी हुंडाबळी गेली नसती, कोणाचे संसार उघडयावर पडले नसते. पण समाजात हे सर्व घडत असल्याचे आपण पाहतो. याचाच अर्थ असा आहे की, माणूस बुध्दीरुपी देणगीचा निश्चितच दुरुपयोग करतो आहे. विशेष म्हणजे दुष्टबुध्दी वापरणारा माणूस स्वत:पुरती दुष्टता जोपासत नाही तर तो इतरांकडेही अशा दुष्ट विचारानेच पाहात असतो. आपल्याप्रमाणेच इतरही चोर, वाईट, दुष्ट आहेत असे त्याला वाटते. त्याची समाजात दुष्टता पाहण्याची ही वृत्ती समाजासाठी अत्यंत घातक असते.आपल्याप्रमाणे इतरांनाही दुष्ट समजणाऱ्या दुष्ट बुध्दीच्या माणसाबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**दुष्ट बुध्दि चोरी करी निरंतर ।
तो म्हणे इतर लोक तैसे ।।**

आपण स्वत: स्वार्थापोटी वाईट वागायचे आणि इतरांनाही आपल्याप्रमाणे वाईट समजायचे म्हणजे महामूर्खपणा होय. स्वत:चा वाईटपणा झाकण्यासाठी किंवा स्वत:च्या नालायक वृत्तीवर पांघरुन पडून मोठेपण मिळावे या भावनेपोटी इतरांना कमी लेखणे किंवा हीन, दुष्ट समजणे योग्य नसते. समाजात असे दुष्टतेने वागणारे लोक इतरही आपल्याप्रमाणेच असल्याचे स्पष्टपणे सांगतात. एखाद्या चांगल्या माणसाचे अशांपुढे कौतुक केले तर हे लगेच म्हणतात, तुम्हाला काय माहिती आहे त्याचे? तो कसा आहे ते मला माहिती आहे. खरे म्हणजे या मुर्खाला त्या चांगल्या व्यक्तिबद्दल कांहीही माहिती नसते. पण त्याचे चांगलेपण, मोठेपण याला खुपते. म्हणून तो पटकन त्यांच्याबद्दल चुकीचे बोलून जातो. आपल्याप्रमाणे अनेक वाईट आहेत हे पटवल्याने वाईटांची संख्या वाढते. संख्या वाढली म्हणजे कोणी कोणाला नांव ठेवत नाही, असे या लोकांना वाटत असते. म्हणूनच आपली संख्या वाढविण्यासाठी हे कोणालाही नांव ठेवण्यात मागे-पुढे पाहात नाहीत. आपण वाईट वागलो तर वागलो, इतरांनी वाईट वागू नये किंवा अकारण इतरांना वाईटपणाचे नांव ठेवू नये असे यांना अजिबात वाटत नाही. म्हणूनच समाजातील संत, सज्जनांना अशा लोकांचा त्रास होत असल्याचे आपणाला पहायला मिळत आहे. समाजात असे एकही क्षेत्र शिल्लक राहिलेले नाही, की ज्यामध्ये वाईट लोकांचा शिरकाव झालेला नाही. वाईटांचा शिरकाव मानवतेचे, माणुसकीचे हरण करीत असल्याने अशा वाईट वर्तनाच्या, दुष्ट बुध्दीच्या लोकांना वेळीच लगाम घालण्याचे काम प्रत्येकाला करावे लागणार आहे. संत महात्म्यांनी वाईटांना नष्ट न करता त्यांच्यातील वाईटपणपा नष्ट करण्याचा सल्ला दिला असल्याने आपण त्यांच्या सल्लयाप्रमाणे अशा लोकातील वाईटपणाचा नष्ट करण्याचा प्रयत्न करायला हवा.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार**
**दि. १ मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. द्वितीया (२४.५०)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - पु.भाद्रपदा (२१.२२)**
**योग - साध्य (१६.२५)**
**करण - बालव (१३.४४)**

**दिनविशेष -**
**चांगला दिवस**
**रामकृष्ण परमहंस जयंती,**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** फायदेशीर चर्चा घडून येई.जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. विश्वासदर्शक वातावरण राहील.

**सिंह :** विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कन्या :** मेहनतीचे उचीत फळ मिळेल. व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल.

**तुळ :** फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील.नवीन कामाची आखणी कराल. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपले विचार योग्य असतील. आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल.

**मकर :** मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. नातेवाईकांशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** फायद्याच्या संधी मिळतील. रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# मुद्रक संघाच्यावतीने जागतिक मुद्रण दिन उत्साहात




**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सोलापूर मुद्रक संघाच्या वतीने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे थाटात संपन्न झाले. या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे प्रदेश सरचिटणीस नागेश शेंडगे, ज्येष्ठ संपादक अरविंद जोशी व फर्ग्युसन कॉलेज डिजाईन विभागाचे प्रमुख बाळकृष्ण थरकुडे यांची उपस्थिती होती.

मुद्रण दिनाच्या निमित्ताने विलास शेंडगे यांना मुद्रण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रमुख अतिथींच्या हस्ते 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच याप्रसंगी गेल्या २० वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा 'एकनिष्ठ कर्मचारी पुरस्काराने' सन्मान करण्यात आले.

याप्रसंगी कुश शिवलिंग बुगडे- रिगल प्रेसमध्ये डिटीपी ऑपरेटर म्हणून गेली ३६ वर्षे, लक्ष्मीकांत रामगोपाल खंडेलवाल-विजय ट्रेडर्स मध्ये गेली ३५ वर्षे, प्रसाद अण्णासाहेब खर्गे -कोमल ग्राफीक्समध्ये २५ वर्षे, अंबादास मनोहर जाधव -संप्रती ऑफसेट मध्ये २२ वर्षे, कल्लप्पा शामराव नागणसूरे - विनंद ऑफसेटमध्ये ४५ वर्षे, अंबादास विठ्ठल डिगे - कलाविहार प्रिंटींग प्रेसमध्ये २० वर्षे, बसवेश्वर विठ्ठल जत्ती-स्टार पेपर येथे ४२ वर्षे, सिद्राम दत्तात्रय सब्बन- मॉर्डन प्रिंटींग प्रेसमध्ये ३५ वर्षे, सूर्यकांत निलप्पा बिराजदार-आनंद ग्राफिक्समध्ये २४ वर्षे, विजयकुमार भानुदास मामड्याल - पंढरीनाथ ऑफसेट मध्ये २५ वर्षे, जावेद अब्दुल हमीद माशाळ लायन ऑफसेट मध्ये २० वर्षे, प्रभाकर सुदर्शन सग्गम समर्थ बुक बायडींगमध्ये ४० वर्षे, रमेश मडीवाळय्या स्वामी कलाश्री मुद्रण ॲण्ड स्क्रीनमध्ये २७ वर्षे, नरेश बालकिसन मादास - बाबा ऑफसेटमध्ये २३ वर्षे अशा १४ कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच याप्रसंगी सूरज चंदन चव्हाण, योगेश कल्याण भाईकट्टी, संतोष रमेश दंडगळ, अजय सखाराम सोळंकी, उमेश विठ्ठलदासलोया, मोहतसीन अल्ताफ अन्सारी, सचिन विजयकुमार सरवदे, नरेंद्र नंदकिशोर करवा, रोहित पोपट वाकडे, फयाज अहमदसाब मालदार, रिजवान अन्सारी मुद्रण क्षेत्रात आलेल्या पुढील पिढीचा सन्मानही करण्यात आला.

सत्कार समारंभानंतर अरविंद जोशी यांचे ए. आय. तंत्रज्ञान आणि त्याचे परिणाम या विषयावर तर बाळकृष्ण थरकुडे यांचे डिजाईनमध्ये ए. आय. टूल्सचा वापर या विषयावर व्याख्यान पार पडले. अध्यक्षीय भाषणात नागेश शेंडगे यांनी मुद्रक संघ नावारूपाला आणण्याची जबाबदारी प्रत्येकांनी उचलावे असे उदाहरणाव्दारे सांगितले. ज्यांना देणगीरूपात योगदान देता येते त्यांनी ती जबाबदारी उचलावी, ज्यांना मुद्रक संघासाठी वेळ देता येते त्यांनी वेळ द्यावे आणि काहीच जमत नाही त्यांनी किमान काम करणाऱ्यांना काम करू द्यावे, असे आवाहन केले.

सूत्रसंचालन मुद्रक संघाचे सचिव यशवंत बिराजदार यांनी तर आभार प्रदर्शन मुद्रक संघाचे अध्यक्ष आनंद लाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपाध्यक्ष, अजित चव्हाण, खजिनदार अनिल देवनपल्ली, सहखजिनदार, सुशील कन्ना, सहसचिव, सचिन सरवदे, संचालक, गंगाप्रसाद बंडेवार, सुरज चव्हाण, योगश भाईकट्टी, शाम खंडेलवाल आदींनी परिश्रम घेतले.

# अमोल पालेकर यांच्या 'ऐवज' या पुस्तकाचे आज प्रकाशन





**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सभ्य, सोज्वळ व प्रामाणिक अशी व्यक्तिरेखा साकारलेला एक हरहुन्नरी कलाकार अमोल पालेकर यांच्या रूपाने हिंदी चित्रपटसृष्टीला मिळाला. सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारा म्हणून या कलावंताला प्रेक्षकवर्गाची प्रचंड पसंती मिळाली. हरहुन्नरी अभिनेता म्हणून त्यांनी नाव तर कमावलेच; पण दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही आपला वेगळा ठसा उमटवला. एक उत्कृष्ट अभिनेता चांगला दिग्दर्शकही होऊ शकतो, असे त्यांना वाटते. दिग्दर्शक म्हणून त्यांनी साकारलेले चित्रपटदेखील खूप गाजले. धीरगंभीर विषय, आशयघन कथानक, सामान्य व्यक्तीची गोष्ट, हे त्यांच्या दिग्दर्शनाचे विशेष गुण. असे चित्रपटसृष्टीतील एक नावाजलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रसिद्ध अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक अमोल पालेकर. अशा या हरहुन्नरी कलाकाराचा कलाप्रवास शब्दबद्ध झालाय तो 'ऐवज एक स्मृतिबंध' या मराठी आणि व्ह्यूफाईंडर या इंग्रजी पुस्तकातून. या पुस्तकांचं प्रकाशन प्रिसिजनचे चेअरमन यतिन शहा आणि प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, दिनांक १ मार्च रोजी संध्याकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात या प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

पुस्तक प्रकाशनानंतर अमोल पालेकर, पुस्तकाच्या सहलेखिका संध्या गोखले यांची प्रकट मुलाखत ऐकणार आहोत. डॉ. अस्मिता बालगांवकर या मुलाखत घेणार आहेत. प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी प्रिसिजन वाचन अभियान हा कार्यक्रम आयोजित केला जातो. त्याच कार्यक्रमाचा भाग म्हणून अमोल पालेकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहे. 'अनकही', 'थोडासा रूमानी हो जाये', 'बनगरवाडी', 'दायरा', 'आहट', 'कायरे', 'ध्यासपर्व', 'पहेली', 'क्वेस्ट', 'समांतर', 'ॲण्ड वन्स अगेन', 'धूसर' हे त्यांचे गाजलेले काही विशेष चित्रपट. 'गोलमाल', 'चितचोर', 'छोटी सी बात', 'बातो बातो में' अशा त्यांच्या काही दर्जेदार चित्रपटांची नावे सांगता येतील. केवळ हिंदी भाषेच्या चौकटीत बंदिस्त न राहता त्यांनी मराठी, बंगाली, मल्याळम व कानडी भाषेमध्येही काम केलेले आहे. 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स' येथे फाईन आर्ट्सचे शिक्षण घेतले. 'पेंटर' म्हणून त्यांनी त्यांच्या करिअरला सुरुवात केली. चित्रकलेचे शिक्षण घेऊन चित्रकार झालो, योगायोगाने अभिनेता झालो, गरजेमुळे निर्माता झालो आणि स्वत:च्या आवडीमुळे दिग्दर्शक झालो, असे ते नेहमी म्हणतात. मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मलेल्या अमोल पालेकर यांनी काही काळ बँकेतदेखील नोकरी केली. पुस्तक प्रकाशनानंतर अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांची डॉ. अस्मिता बालगांवकर या मुलाखत घेणार आहेत. तरी सर्व सिनेरसिक व वाचकप्रेमी मंडळींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.



# मानवी मूल्यांची जोपासना आवश्यक : प्रा. बिराजदार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

संस्कृतीच्या रक्षणासाठी प्रेम, करुणा, शांती, सत्य, अहिंसा, सेवा, त्याग यासारख्या वैश्विक मानवी मूल्यांची जोपासना करणे आवश्यक असल्याचे मत स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये आयोजित कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी व्यक्त केले.

यावेळी अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य व स्वेरीचे प्राचार्य व स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्या किर्ती भोसले, प्रा. एस. व्ही. कुलकर्णी, प्रा. एस. जी. गायकवाड उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. बिराजदार यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकत आजही त्यांचे विचार प्रासंगिक आहेत. जगात दोन महायुद्धात झालेली अपरिमित जीव व वित्तहानी, रशिया व युक्रेन युद्ध, हमास व इस्त्रायल युद्ध, वर्तमान काळातील वाढत्या समस्यांवर स्वामी विवेकानंद यांचे विचार उपाय आहेत. जातपात, लिंग धर्म असे भेदभाव न मानता युवकांनी आपल्या आत्म्याचे खरे वैभव ओळखून भौतिक संपत्ती व सुखापेक्षा आत्मिक संपत्ती व वैभव ओळखून मानवतेच्या रक्षणासाठी कटिबद्ध व्हावे असे संबोधले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना योग व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. वा.यु. पनसवाड यांनी केले.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मुक्त व्यासपीठतर्फे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

'नंदनवन' या ज्येष्ठ नागरिक बहुद्देशीय संस्था, माशाळ वस्ती विजापूर रोड यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व उपाय यासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मोहन अनवेकर यांनी आयुर्वेदीक औषधीची माहिती दिली. विविध गोळ्यांचे साइड इफेक्ट होतात, तेव्हा आयुर्वेदाच्या मदतीने विविध रोगांवर उपचार सुरू करता येतील असे विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोडगनुर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात निवृत्तीनंतर आपण नवीन आयुष्य जगतो, त्यात आपले छंद, आवड यांना फुलवले पाहिजे. त्यानंतर बोडागनुर यांचा सत्कार देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल स्मिता कोर्टीकर यांचा सत्कार करण्यात आला.



त्यानंतर दुबे यांनी भजन सादर केले. निवृत्त DYSP रमेश मोहिते यांनी सभेतील सर्वांना आनंदाने जगा, समाजात अजूनही चांगले कार्य करत रहा, आवडीप्रमाणे क्षमतेप्रमाणे कार्यरत रहा असा संदेश दिला. सभेस उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी मनोगत व्यक्त केले.

मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्याचे मानस आहे हे सांगण्यात आले. वाढदिवस निमित्त ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष देसाई, सचिव औदप्पा पुजारी, बावकर, आप्पासाहेब कोरे, रमेश मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाठक, जामदार, हुंडेकर, पुजारी यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. चव्हाण यांच्या पुस्तकास छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिला जाणारा प्रथम छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कार प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी लिहिलेल्या सोलापूर जिल्ह्याचे शिल्पकार या पुस्तकास प्रदान करण्यात आला.




सोलापूर शहर व जिल्ह्याच्या जडणघडण्यात अमूल्य योगदान देणाऱ्या ३० चरित्र नायकांचा समावेश असणाऱ्या या पुस्तकातून सोलापूर जिल्ह्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार, औद्योगिक, कामगार चळवळीचा इतिहास वाचकांसमोर येतो. सोलापूर शहर व जिल्ह्याचा इतिहास जाणून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक अभ्यासक, संशोधक व सामान्य वाचकाला अत्यंत उपयुक्त ठरणारे असे आहे. सामाजिक शास्त्रे संकुलातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या समारंभात हा पुरस्कार प्रकुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी भाषा व वाङ्मय संकुलाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव डॉ. योगीनी घारे, प्रा. डॉ. श्रुतीश्री वडकबाळकर उपस्थित होते.




# चितळे प्रशालेत सायकल वाटप


**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संचलित गणेश रामचंद्र चितळे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महिला व बालकल्याण विभाग तसेच समाजकल्याण विभाग यांच्या वतीने २० गरजू मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. हवीनाळे होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली नूतन संचालक नागेशजी बिराजदार यांच्या हस्ते झाले आणि कमळे गुरुजी यांच्या प्रतिमांचे पूजन संस्थेचे सचिव एम. डी. कमळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य शिवपुत्र कोळी यांनी केले. सायकल वाटपसाठी योगदान दिल्याबद्दल राजूर गावचे सरपंच लक्ष्मण गडदे यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात गडदे साहेबांनी केलेल्या कार्याचा आढावा घेत विविध योजनांची माहिती दिली. संस्थेचे सचिव एम. डी. कमळे यांनीही गडदे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. हवीनाळे यांनी विद्यार्थ्यांना सायकलींचा योग्य वापर करण्याचा सल्ला दिला तसेच भविष्यातही गावासाठी उपयुक्त योजनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष कनशेट्टी, तसेच हत्तरसंग, चिंचपूर, बोळकवठा या गावातील प्रतिष्ठित पालक, डॉ. सुजित कुमार चौगुले, सिकंदर कुडले, पटेल, माजी मुख्याध्यापक डफळे, प्रयोगशाळा परिचर नंदराळे मामा, इरेशा मंगरुळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. गौरीशंकर बिराजदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन बोरकडे यांनी मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (६६) शत शत नमन

डॉक्टरजींचे जीवन चरित्र त्यांची वैचारिक बैठक, आजपर्यंतच्या अलक मधून आपण वाचली. अर्थातच त्यासाठी त्यांच्या जीवनातील प्रसंगांची घटनांची त्या मागच्या दृष्टिकोनाची माहिती घेण्याचा / देण्याचा मी प्रयत्न केला आहे. अशा या युगप्रवर्तक, अभिजात देशभक्त डॉक्टरांनी २० जूनला सकाळी नऊ वाजून २७ मिनिटांनी अखेरचा श्वास घेतला होता. २१ जून ला निघालेल्या अंत्ययात्रेत हजारो स्त्री पुरुष सहभागी झाले होते. ही सर्वात मोठी शवयात्रा होती. अंत्ययात्रेत रा.स्व. संघाचे कार्यकर्ते - स्वयंसेवक अन्य विचारांचे विचारवंत तसेच काँग्रेस- सोशालिस्ट- फॉरवर्ड ब्लॉक- कम्युनिस्ट - हिंदू महासभा- मजूर आंदोलनाचे आदी सहभागी झाले होते. कारण लोकसंग्रह हा डॉक्टरांचा स्वभाव होता. How to win friends and influence the people असा व्यवहार डॉक्टरजींनी शिकवला आहे.. असेच त्यांचे लोकांशी सलगी देणे असे. त्यादिवशी हितवादने असा कुशल संघटन कर्ता या देशाला मिळणे दुर्लभ आहे असे लिहिले होते मराठानी हिंदू राष्ट्राचा देवदूत असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील त्यांची तुलना लोकमान्य टिळकांशी केली होती केसरीने विनम्रता ठायी ठायी डॉक्टरांमध्ये भरलेली होती असे लिहिले आहे राष्ट्रसेवा हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी एकूणच निस्वार्थी जगण्याने समर्थ रामदासांसमान स्थान प्राप्त केले होते. बोलण्यासारखे चालणे। स्वये करूनी बोलणे।। तसेच केल्याविण होत नाही। साध्य जनी।। ही समर्थ वचने डॉक्टरजींना पूर्णांशाने लागू पडणारी आहेत. अशा समर्थ डॉक्टर केशव बळीराम हेडगेवारजींना मी शतशत नमन करते ओम शांतिः शांतिः शांतिः .

**- क्रमशः**

तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अपात्र ठेकेदारासाठी अकलूजच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पायघड्या

## राजकीय दबाव की आर्थिक लागेबांधे? चर्चेला उधाण

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि.२८ फेब्रुवारी-**

अकलूजच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने अपात्र ठेकेदारांना कामे देत असल्याच्या चर्चा सध्या चांगल्याच रंगल्या आहेत. दर्जाहीन कामे, विलंब, तसेच नियमबाह्य पद्धतीने टेंडर मंजूर केल्याचे आरोप होत आहेत. या प्रक्रियेम गे राजकीय दबाव आहे की आर्थिक लागेबांधे, यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अकलूज सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत अनेक विकास प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात टेंडर निघतात. मात्र, काही अपात्र ठेकेदारांना वारंवार कंत्राटे मिळत असल्याने



अनेकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर सत्ताधारी पक्षातील राजकीय नेत्यांचा दबाव आहे, की यामागे मोठ्या आर्थिक देवाणघेवाणीचा गैरव्यवहार सुरू आहे, यावर चर्चा सुरू आहे. याबाबत मि ळालेल्या माहितीनुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाने विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी टेंडर नोटीस नंबर ११ प्रमाणे पाच विविध कामांकरिता निविदा प्रसिद्ध केली होती. सदर निविदा अनेक ठेकेदाराने भरलेली असली तरी ती ओपन करण्यापूर्वी भरलेल्या ठेकेदारांपैकी काही ठेकेदार अपात्र असल्याबाबतच्या तक्रारी ठेकेदारांनी केल्या होत्या.

सदर तक्रारीचे कसल्याही प्रकारे दखल न घेता व विशेष म्हणजे सदर निविदा भरलेल्या ठेकेदारांची छाननी अकलूज कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात करणे गरजेचे असताना सोलापूर येथील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात ती छाननी करून निविदा ओपन करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात आलेल्या या संशयास्पद कृत्यामुळे अनेक प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे.

### कारवाईची मागणी

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी की आर्थिक संगनमतामुळे छाननी सोलापुरात केली. तसेच अपात्र ठेकेदारांबाबत सहानुभूती दाखवली असा प्रश्न उपस्थित होत असून याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

---


## संक्षिप्त वृत्त



### माळशिरस येथे बौद्ध धम्मपरिषद उत्साहात

**नातेपुते, दि. २८ फेब्रुवारी-**

माळशिरस हॉटेल खताळ वाडा येथे बौद्ध धम्म पर्यटन करून आलेल्या बौद्ध उपासक व बौद्धउपसिका यांचा स्वागत समारंभ व धम्म परिषद हा उत्साहात कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उत्तरेश्वर लोंढे नगरविकास रचनेचे माजी सहाय्यक संचालक उत्तरेश्वर लोंढे, ज्योतीताई लोंढे, माजी डीवायएसपी नलवडे, कुंनताताई शिंदे, डॉ. प्रा. प्रदीप शिंदे, राजश्री शिंदे, शर्मिला नलवडे, सोमनाथ भोसले, विकास धांईजे, अनिल सावंत, शुद्धधन काकडे, प्रल्हाद गायकवाड, विद्या गायकवाड उपस्थित होते. डॉ. शिंदे यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्याबद्दल मनोगत चांगल्या पद्धतीने मांडले. कार्यक्रमासाठी प्रा. भारत शिंदे, हुंडे, विष्णू सावंत, श्रीकांत सावंत, समीर सोरटे, अमित सावंत, अक्षय सावंत, विकी सावंत, रमेश दादा साळवे, राजेश सावंत, साहिल सावंत, प्रणव सावंत, बाळू सावंत, जीवक सावंत, पोर्णिमा सावंत, ओमकार सावंत आदींनी परिश्रम घेतले.



### महाशिवरात्र निमित्त गंगेच्या पाण्याने विठ्ठलास जलाभिषेक

**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीच्या पर्वकाळा निमित्त गुरुवारी पहाटेच्या वेळी पर्वकाळाच्या मुहूर्तावर गंगोत्री येथून आणलेले गंगेच्या पाण्याने विठ्ठलास जलाभिषेक करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर संस्थान यांच्याकडून गेल्या तीनशे वर्षांपासून गंगेचे पाणी महाशिवरात्रीच्या निमित्ताने विठ्ठलाच्या जलाभिषेक आणले जाते. यंदाही होळकर संस्थांनच्या वतीने आदित्य फत्तेपूरकर यांनी गंगाजल विठ्ठल मंदिराकडे सुपुर्त केले. यानंतर महाशिवरात्री दिवशी विठ्ठलास जलाभिषेक करण्यात आला.



### प्रशांत कोरडकरवर कारवाई करण्याची मागणी

**टेंभुर्णी, दि. २८ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ यांची बदनामी करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या प्रशांत कोरडकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना इक्कालिटी फाउंडेशन व बहुजन मुक्ती पार्टीने निवेदन दिले. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक महावीर वजाळे, बहुजन मुक्ती पार्टी माढा लोकसभा अध्यक्ष महेंद्र सोनवणे, बहुजन मुक्ती पार्टी माढा लोकसभा प्रभारी प्रशांत गायकवाड, माणिक किर्ते, गणेश खरात, नागनाथ जगताप, राजवर्धन वजाळे, गौरव गाडे उपस्थित होते.



### अन्नछत्र मंडळाच्या वतीने कालिपुत्र कालिचरण महाराजांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २८ फेब्रुवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते कालिपुत्र कालिचरण महाराज यांचा श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, पुष्पहार श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीश्रीश्री १००८ विश्वानंद सरस्वती स्वामी महाराज मठाधिश बसवकल्याण, सनीराज पंडित दळवी, तिलख जाधव, रत्ना रेवणसिद्ध खेडगी, मंदार शिवयोगी रेणुका स्वामी, महेश कोरे उपस्थित होते. याप्रसंगी श्रीश्रीश्री १००८ विश्वानंद सरस्वती स्वामी महाराज मठाधिश बसवकल्याण यांचा देखील सत्कार कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान न्यासाच्या परिसरात असलेल्या श्री तुळजाभवानी माता मंदिर येथे श्रींचे पूजन कालिपुत्र कालिचरण महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, आप्पा हंचाटे, पुरोहित अप्पू पुजारी, सोमकांत कुलकर्णी, ज्ञानेश्वर भोसले, प्रवीण देशमुख, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, संजय गोंडाळ, गोविंदराव शिंदे, अनंत क्षिरसागर, कुमार पाटील, योगेश पवार, राहूल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, नारायणराव गडदे, विलासराव राठोड, राजू पवार, प्रसाद हुल्ले, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, रोहित कदम, एस.के. स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

---

# मराठी नष्ट होणारी भाषा नाही

## शैलशिल्पा जाधव : अक्कलकोटमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ फेब्रुवारी-**



मराठी भाषा ही काल परवा निर्माण झालेली नाही. ती पूर्वापार चालत आलेली आहे. मराठी भाषा ही कधीच नष्ट होणारी नाही. आपल्या मातृभाषेवर जो निस्सीम प्रेम करतो तो जगातल्या सर्व भाषांवर प्रेम करतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद अक्कलकोट शाखेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी केले.

मसाप शाखेच्या वतीने श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाच्या सभागृहात कवी कुसुमाग्रजांच्या साहित्याचे पूजन करून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. मराठी भाषेची अखंडता व त्यामधील गोडवा टिकून रहावयाचा असेल तर वाचन संस्कृती वाढली पाहिजे. वाचन संस्कृती नसेल तर मराठी भाषेपासून आपण दूर जातो. मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हा मराठीचा सन्मान आहे असेही शैलशिल्पा जाधव यांनी सांगितले. बापूजी निंबाळकर यांनी माझ्या मराठी मातीचा लावा ललाटीस टिळा व कणा या वि. वा. शिरवाडकर यांच्या कविता सादर केल्या. याप्रसंगी सुभाष सुरवसे यांनी त्यांच्या स्वरचित 'मृत्यू' व 'अस्तित्व' या कवितांचे वाचन केले. यावेळी मसापच्या संचालिका पुष्पा हरवाळकर, ग्रंथपाल दत्तात्रय बाबर, सुरेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

### व्यवहारात मराठीचा वापर कमी : काळे

मराठी मातृभाषा ही आईचे दूध आहे. आजची तरुण पिढी ही इंग्रजीच्या मागे लागल्याने दैनंदिन जीवनातसुध्दा मराठी भाषेचा वापर कमी होत आहे. मराठी भाषा ही टिकणारच आहे. पण ती बोली भाषा व ग्रामीण भाषा यावर जगणार आहे. यामुळे आपल्या संस्कृतीशी नाळ जोडणारी भाषा आपण जोपासली पाहिजे असे सांगून कवी कुसुमाग्रज यांची 'गर्जा जय जय क्रांतीचा' ही कविता ज्येष्ठ साहित्यिका आरती काळे यांनी सादर केली.

---

# दिल्लीच्या साहित्य संमेलनात सांगोला, पंढरपूरच्या कवयित्रींचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ फेब्रुवारी-**

सरहद्द पुणे आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन-२०२५ चे आयोजन दि.२१, २२, २३ फेब्रुवारी रोजी देशाची राजधानी दिल्लीमध्ये करण्यात आले होते. या संमेलनात सांगोला येथील कवयित्री हर्षदा दयानंद गुळमिरे, ग्रामीण कवयित्री सुवर्णा रमेश तेली व पंढरपूर येथील कवयित्री वीणा सारंग व्होरा यांनी पंढरपूर ते दिल्ली या साहित्य यात्री दिंडीत तुळस घेऊन साहित्यिक वारकऱ्या समवेत सहभाग घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी, तालकटोरा स्टेडियम, नवी दिल्ली येथील श्रीमंत सयाजीराजे महाराज गायकवाड सभामंडप व छत्रपती संभाजी महाराज विचार पीठावर खुले काव्य संमेलन यामध्ये हर्षदा गुळमिरे यांनी पांडुरंग तर सुवर्णा तेली यांनी शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी पोशिंदा तसेच वीणा व्होरा यांनी अस्तित्व ही कविता सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी फुलचंद नागटिळक, जितेंद्र कांबळे (आळेफाटा), डॉ. विजय पोपेरे (अकोले), नितीन पाटील (सोलापूर), हेमंत चिकणे, सुषमा आलेकर, यशवंत घोडे (जुन्नर), अलका नाईक (मुंबई), लक्ष्मण हेंबाडे, आदेश फुलगे, संदीप तोडकर, तुकाराम जेगोले, माणिकराव गोडसे, आकाश वानखेडे, तुकाराम मोरे, हेमंत बोरसे, तोरस्कर, सुवर्णा वाघमारे यांच्यासह कर्नाटक, बेळगाव अशा अनेक भागांतून आलेल्या निमंत्रित



छत्रपती संभाजी महाराज विचारपीठावर अभिनेते डॉ. शरद गोरे, संजय नहार, युवराज नळे, डॉ.विजय पोपेरे, संजय आवटे, राम दास मोरे, फुलचंद नागटिळक यांच्या हस्ते कवयित्री हर्षदा गुळमिरे, सुवर्णा तेली, वीणा व्होरा यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याबद्दल सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात त्यांचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

---

# स्वच्छता मोहीम, परदेश शिक्षण मार्गदर्शनाने शिबिराचा सहावा दिवस उल्लेखनीय ठरला



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ फेब्रुवारी-**

बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे आगळगाव येथे सुरु असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या सहाव्या दिवशी आरोग्य तपासणी, स्वच्छता मोहीम आणि परदेश शिक्षण मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज व जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने ३५० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. उद्घाटन डॉ.आर. व्ही. जगताप मेडिकल सुप्रिटेंडंट जगदाळे मामा हॉस्पिटल यांच्या हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी डॉ. बी. वाय. यादव हे होते. सूत्रसंचालन स्वयंसेविका क्षितिजा गायकवाड यांनी, तर प्रस्तावना ज्ञानेश्वरी क्षीरसागर यांनी केली. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा के एम माळी यांनी मानले. पीसीओडी विषयी मार्गदर्शन सत्र लोकसेवा उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय येथे जवळपास १५० विद्यार्थिनींसाठी पीसीओडी संदर्भात विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. डॉ. विद्याराणी टिक्के व डॉ. लोकरे यांनी विद्यार्थिनींना या आजाराविषयी सखोल माहिती दिली आणि उपस्थित विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन केले. आरोग्य केंद्राची स्वच्छता मोहिम- एक आदर्श उपक्रम सकाळच्या सत्रात स्वयंसेवकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आगळगाव येथे संपूर्ण परिसर स्वच्छ करुन एक आदर्श निर्माण केला. स्वच्छता मोहिमेत आरोग्य केंद्राचा संपूर्ण कायापालट करण्यात आला. परदेशातील उच्च शिक्षण प्रक्रिया आणि आव्हाने- विशेष मार्गदर्शन सत्र दुपारच्या सत्रात परदेशातील उच्च शिक्षण प्रक्रिया आणि आव्हाने या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. ॲड. दीपक चटप व ॲड. प्रणव देशमुख यांनी परदेश शिक्षणाच्या संधी, प्रवेश प्रक्रिया, तेथील आव्हाने आणि त्यावर मात करण्याच्या उपाययोजनांची सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सचिन उकिरडे हे लाभले तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के.एम. माळी, मनीष देशपांडे, आकाश दळवी, डॉ.अजय पाटील, ग्रंथालय प्रमुख यादव आणि प्रा. लिंगे उपस्थित होते. सूत्रसंचालन ऋतुजा बाबर यांनी केले. प्रस्ताविक अमृता जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय स्नेहल सुतार यांनी करुन दिला तर आभार प्रेमसाई वाघमोडे यांनी मानले.

---



# एस. पी. पब्लिक स्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २८ फेब्रुवारी-**

एस.पी.पब्लिक स्कूल नांदोरे येथे मराठी राजभाषा गौरवदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाल्यामुळे यंदाच्या मराठी राजभाषा दिनास विशेष महत्व प्राप्त झाले आहे.मराठी भाषा जगाच्या कानाकोपऱ्यात जावी,मराठी भाषेचा आदर व्हावा यासाठी महाराष्ट्रात २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा गौरवदिन साजरा केला जातो.याप्रसंगी सहशिक्षक माऊली मोकळे यांनी मराठी भाषेचे महत्व सांगितले.

मराठी विभाग प्रमुख साईनाथ कुंभार यांनी व्यसनमुक्तीपर गीताच्या माध्यमातून व्यसनाचे आपल्या शरीरावर कसे? व कोणते? दुष्परिणाम होतात याचे सादरीकरण तर आशिष काशीद यांनी सुरेल आवाजामध्ये विविध अभंग सादर केले.

मराठी साहित्यातील अभंग, गवळणी, एकपात्री नाटक, हरिपाठ, तबला वादन, भावगीते, भक्तीगीते,पोवाडे,छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक असे विविध कार्यक्रम विद्यार्थ्यांनी प्रसंगानरूप वेशभूषा करून सादर केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.संतोष वलगे,सचिव अश्वराज वाघ,सहसचिव बाळासाहेब चव्हाण,खजिनदार विक्रम भिंगारे,प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदीप जाधव व सुवर्णा चव्हाण यांनी केले.

---

# दिल्ली कार्यशाळेसाठी सरपंच वर्षा भंडारकवठे यांची निवड

**अक्कलकोट दि. २८ फेब्रुवारी-**



आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगाने पंचायती राज मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने ४ व ५ मार्च रोजी होणाऱ्या कार्यशाळेसाठी अक्कलकोट तालुक्यातील चपळगावचे सरपंच वर्षा सिध्दाराम भंडारकवठे यांची निवड झाली आहे. दिल्ली येथील कार्यशाळेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ४० तर सोलापूर जिल्ह्यातून सात महिला प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे. यामध्ये अक्कलकोट तालुक्यातून चपळगावच्या भंडारकवठे यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबद्दल देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ.सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी सरपंच तथा उद्योजक उमेश पाटील, संस्थाध्यक्ष रविकांत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आप्पासाहेब पाटील, बसवराज बाणेगांव, उपसरपंच सुवर्णा कोळी, जेष्ठ नेते अंबणप्पा भंगे, ग्रामसेवक सोमलिंग कणगी व सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांची कौतुक केले आहे.

---

# माचनूर शाखा क्र.२ साठी पाणी कोटा मंजूर

## माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रयत्नांना यश; शेतकऱ्यांमधून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपूते, दि. २८ फेब्रुवारी-**

निरा उजवा कालवा विभाग फलटण अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र. ४ माचणूर अंतर्गत शाखा क्र. २ साठी उन्हाळी हंगामामध्ये कायमस्वरूपी पाणी कोटा मंजूर करण्याबाबत माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन पत्र देऊन या भागातील शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या होत्या. यावर राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या भागातील शेतकऱ्यांसाठी तात्काळ कायमस्वरूपी पाणी कोटा मंजूर व्हावा, अशी कारवाई करण्याचे आदेश दिल्याने या भागातील शेतकऱ्यातून समाधान व्यक्त केले जात आहे.

निरा-उजवा कालवा फलटण विभागाअंतर्गत माचनूर उपविभाग शाखा क्रमांक २ मधील पाणी वापर संस्थेने १६ हजार ६०० हेक्टर क्षेत्र अधिसूचित केले आहे परंतु शाखा क्र २ ला उन्हाळा हंगामासाठी इतर वेळेस साधारणपणे ८००० क्युसेस पाणी मंजूर होते त्या ऐवजी १२००० क्युसेस पाणी मंजूर करावे जेणेकरून उन्हाळा हंगामामध्ये शेतकऱ्यांना २ आवर्तने मिळतील तसेच शाखा क्र. २ हे माचनूर उपविभागाला जोडल्यामुळे बारमाही ब्लॉक पद्धत बंद होऊन आठमाही ब्लॉक पद्धत झाली त्यामुळे शाखा क्र. २ मधील क्षेत्र हे माळशिरस तालुक्यामधील असताना देखील माचनूर उपविभागाला जोडल्यामुळे दोन आवर्तनाऐवजी एक आवर्तन मिळत आहे शाखा क्र २ हे बारमाही करावं जेणेकरून माळशिरस तालुक्यामधील तांदुळवाडी, मळोली फळवणी, कोळेगाव, धानोरे, शेंडेचिंच व तोंडले या गावातील शेती ही बागायत होईल व या गावांना बारमाही पाणी मिळणार आहे.

माचणूर शाखा क्र २ उन्हाळी हंगामासाठी कायमस्वरूपी पाणी कोटा मंजूर होण्याबाबत मा. आ. राम सातपुते यांनी प्रयत्न केल्याने जलसंपदा मंत्री महोदयांनी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिल्याने आमच्या शेतीच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी मिटणार आहे गेले कित्येक वर्ष प्रलंबित असणारा प्रश्न मा. आ. राम सातपुते यांनी सोडविल्याने आमच्या शेती उत्पन्नात वाढ होणार आहे यामुळे या भागातील शेतकरी समाधानी आहेत. **- सचिन पाटील, शेतकरी फळवणी**



माचणूर शाखा क्र. २ उन्हाळी हंगामासाठी कायम स्वरूपी पाणी कोटा मंजूर व्हावा, यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र देताना माजी आमदार राम सातपुते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उजनीचे पाणी उपळाई खुर्द ओढ्यात; शेतकऱ्यांमध्ये आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२८ फेब्रुवारी-**

ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर उजनी धरणातून भुताष्टे चिंचोली कॅनलमध्ये सोडलेले पाणी पाईपलाईनच्या माध्यमातून उपळाई खुर्दसह आजूबाजूच्या तळी व ओढ्यात पाणी पोहोचायला सुरुवात झाली असल्याने उपळाईसह परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

उपळाई खुर्द येथे उन्हाळ्याच्या तोंडावर वेळेत पाणी यावे यासाठी माढ्याचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील व आ.अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस महिला युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांनी प्रयत्न केले होते त्या त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून पुढील काळात देखील तळागाळातील लोकांसाठी मी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. उपळाई येथील पाझर तलावात पाणी आल्यावर त्या पाण्याचे पूजन विनंती कुलकर्णी यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी सचिन कदम, नागनाथ कदम, अजित अनुभुले, राजीव मोहिते, नानासाहेब गोरे, अमर देवकर, पांडुरंग माळी, राणबा कदम, उत्तम सरवदे, सुदर्शन गोरे, लहु बोराडे, नितीन कदम उपस्थित होते.



# करमाळा उपजिल्हा रुग्णालय लवकरच रुग्णांच्या सेवेत

## ४३ कोटींचा निधी मंजूर; अधिकारी व कर्मचारी वसाहतीचे काम प्रगतीपथावर

### माजी आमदार संजयमामा शिंदेंनी केली कामाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. २८ फेब्रुवारी,**

करमाळा उपजिल्हा रुग्णालय नवीन इमारत बांधकाम करणे व अधिकारी कर्मचारी वसाहत बांधकाम करणे या दोन कामांसाठी ४३ कोटी निधी मंजूर आहे. ही दोन्हीही कामे आता पूर्णत्वाकडे आलेली आहेत. लवकरच त्याचे लोकार्पण होणार असून या कामाची पाहणी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी केली.



याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभाग करमाळा, उपजिल्हा रुग्णालय येथील अधिकारी कर्मचारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.करमाळा तालुक्याच्या दृष्टीने आरोग्य क्षेत्रातील हे अतिशय महत्त्वाचे काम आहे.

या कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून संकीर्ण प्रशामा-२०२१/प्रक्र-१३१/आ-अ, दि.१ जुलै २०२१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली तर तांत्रिक मान्यता पत्र क्र. जा.क्रं. मुअपु/का-२/इमा-१/९५४/२०२२ दि.१५ फेब्रुवारी २०२२ रोजी मिळाली.तर ओंकार कन्स्ट्रकशन, पुणे यांना कार्यारंभ आदेश जाक्र/साबाविअ/निविदा/३७३६/ सन २०२२ दि.२८ नोव्हेंबर २०२२ रोजी मिळाला. हे काम नोव्हेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु ते पूर्ण झाले नाही.

#### अशी असेल नवीन इमारत

सदर इमारत ही तळमजला आणि इतर दोन मजले असली आहे.एकूण ७३२०.२१ चौमी बांधकामाचे क्षेत्रफळ आहे. यामध्ये बेसमेन्ट मजल्यावरती वाहनतळ ,ऑक्सीजन सिलेडर स्टोअर असणार आहे.तळ मजल्यावर तपासणी केंद्र, एलडीआर-१ आणि एलडीआर-२, विलगीकरण कक्ष, (खीश्ररींळेप ुरीव), एचडीयू, चाइल्ड ओपीडी, एएनसी वॉर्ड, ऑपरेशन थिएटर टॉयलेट प्रस्तावीत आहेत.पहिल्या मजल्यावर पीएनसी वॉर्ड, पेडियात्रिक वॉर्ड, आयसीयू, फिमेल सर्जिकल वॉर्ड, फिमेल मेडिकल वॉर्ड, डायालिसीस सेंटर असणार आहे तर दुसऱ्या मजल्यावर मेल सर्जिकल वॉर्ड, मेल मेडिकल वॉर्ड, वैद्यकीय अधीक्षक कार्यालय, कॉन्फरन्स रूम, संगणक रुम असणार आहेत. याशिवाय भूमिगत पाण्याची टाकी, सेप्टीक ढरपज्ञ, रेनवाटर हार्वेस्टिंग, भूविकास (पार्कस आणि गार्डन), अंतर्गत रस्ते संरक्षक भिंत व गेट व विद्युत विषयी कामांचा समावेश आहे. आतापर्यंत या कामावर १७३३.६७ लक्ष खर्च झालेला आहे. उपजिल्हा रुग्णालय नवीन इमारत बांधकाम पूर्ण झाले असून दरवाजे, खिडक्या व रंगकाम सध्या बाकी आहे. हे काम पूर्ण झाले की इमारत रुग्णांच्या सेवेत दाखल होणार आहे.र

## शेटफळ येथे नागनाथ महाराजांची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२८ फेब्रुवारी-**

छबीना मिरवणुकीवर गुलालाची उधळण करत शेटफळ तालुका करमाळा येथील नागनाथ महाराज यात्रा उत्साहात संपन्न झाली

प्रतिवर्षी महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी शेटफळ येथील नागनाथ महाराज यात्रा संपन्न होते यावर्षी या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी महा अभिषेक व त्यानंतर दंडवत घेण्याचे कार्यक्रम झाले दिवसभर शेरनी वाटपाचा व महाप्रसादाचा कार्यक्रम चालू होता. यात्रेनिमित्त मंदिर परिसरामध्ये नयनरमय विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सायंकाळी बारा वाजता आरती होऊन नागनाथ देवाचा छबिना व त्याच्या मागे पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये सोलापूर जिल्ह्याबरोबरच इतर ठिकाणावरूनही पारंपरिक वाद्य, वृंद, सनई, ताशाचे ताफे, हलगी व लेझीम पथक सहभागी झाले होते.यावेळी हलगीच्या तालावर गावातील २०० पेक्षा जास्त तरुणांनी लेझीम प्रात्यक्षिक सादर केले. याबरोबरच महाराष्ट्रातील प्रसिद्ध बँड पथकांचाही सहभाग या मिरवणुकीमध्ये होता मुक्त हस्ते छबिण्यावर गुलालाची उधळण करून नागनाथ महाराज की जयचा जयघोष करत ही मिरवणूक पार पडली. यावेळी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून या देवाची भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती दुसऱ्या दिवशी सकाळी हजेरी हा कार्यक्रम झाला. यामध्ये विविध कलाकारांनी आपली कला सादर करून इनाम मिळवले ही यात्रा उत्साहात पार पाडण्यासाठी नागनाथ यात्रा उत्सव समिती व ग्रामस्थांनी प्रयत्न केले.

## आ. अभिजीत पाटील यांच्यावतीने 'छावा'च्या निशुल्क शोचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

आमदार अभिजीत पाटील यांच्यावतीने येथील पालवी ज्ञानमंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी नुकतेच छावा चित्रपटाच्या निशुल्क शोचे आयोजन करण्यात आले होते. येथील डीव्हीपी स्केअर चित्रपट गृहामध्ये हा चित्रपट पाहण्यासाठी पालवीतील विद्यार्थी विद्यार्थिनी खास ऐतिहासिक वेशभूषा परिधान करून आले होते. याप्रसंगी आमदार अभिजीत पाटील, पालवी संस्थेच्या संस्थापिका मंगल शहा, समन्वयक तेजस घाडगे, डीव्हीपीचे शरद घाडगे, अमित घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास मोठ्या पडद्यावर पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. चित्रपटातील गड, किल्ले, युद्ध प्रसंग, मोठ्या पडद्यावर अनुभवता आले. चित्रपटाच्या मध्यंतरामध्ये पालवीच्या विद्यार्थ्यांनी 'जय भवानी जय शिवाजी' या स्फूर्तीदायी घोषणा दिल्या. तर चित्रपटाचा शेवट पाहून भाऊक झालेल्या विद्यार्थ्यांनी शिवगर्जना म्हणत वातावरण प्रेरणादायी बनवले.

> आजकाल बॉलीवूड मधील कलाकारांना विद्यार्थी आपले आदर्श मानत आहेत. मात्र हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे आपले आदर्श असावेत, हे या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक चित्रपटातून समजावे, या उद्देशाने आम्ही 'छावा' चित्रपटाच्या खास शोचे आयोजन केले होते.
>
> **- अभिजीत पाटील, आमदार**

## नवरंगे बालकाश्रम संस्थेला बालस्नेही पुरस्कार जाहीर

### ३ मार्चला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**


वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर या संस्थेला महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या बालस्नेही पुरस्कार २०२४ साठी उत्कृष्ट बालगृह या नामांकनासाठी पुणे विभागातून निवड झाली आहे. हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंट मुंबई येथे दि. ३ मार्च रोजी दुपारी १ वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांची उपस्थितीत राहणार आहे. अनौरस बालकाशिवाय आई वडीलांपैकी कोणाचाही मृत्यू, दारिद्र्य, आई वडील विभक्त होणे आदी कारणामुळे निराधार गृहहीन होणारी मुले व मुलींना या संस्थेत प्रवेश दिला जातो. महिला व बाल विकास आयुक्त पुणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर तसेच संस्थेचे अध्यक्ष, सदस्य, बालक कल्याण समिती, सोलापूर यांनी संस्थेच्या विकासासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले असल्याची माहिती संस्थेच्या अधिक्षिका राजश्री गाडे व धर्मराज डफळे यांनी दिली.

## माहीम येथे सापडला यादव काळातील दान शिलालेख

### संशोधक नितीन अणवेकर यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

इतिहास संशोधक नितीन अणवेकर यांना यादव काळातील राजाने दान दिलेला शिलालेख सापडला असून शिलालेखावर तब्बल २२ ओळी देवनागरी लिपीत कोरण्यात आलेले आहेत.



सांगोला तालुक्यातील माहीम गावात हा शिलालेख ऐतिहासिक सर्वे करताना अणवेकर यांना सापडला त्यानंतर गावकऱ्यांच्या मदतीने शिलालेख स्वच्छ करून ताबडतोब शिलालेखाचे अणवेकर यांनी शिलालेखाचे ठसे घेतले. तातडीने हे ठसे पुणे येथे वास्तव्यास असलेल्या इतिहास अभ्यासक अनिल दुधाने व अथर्व पिंगळे यांच्याकडे वाचन करण्यासाठी पाठविले त्यानुसार शिलालेख तेराव्या शतकातील असल्याचे स्पष्ट झाले शिलालेखावर शक ११९१ काल उल्लेख असून यादव राजा महादेव यांची प्रशस्ती करण्यात आलेली आहे . पिल्ले यांच्या जंत्रीनुसार शिलालेख कोरल्याची तारीख ९ मे १२ ६९ अशी आहे महादेव राजाच्या काळातील एका मंदिरास २० गद्यान (सुवर्ण नाणे)दिल्याची नोंद असलेला महत्त्वाचा उल्लेख शिलालेखात आला आहे. दिलेले दान नमूद करणे या शिलालेखाचा मुख्य विषय आहे.

शिलालेखाची भाषा संस्कृत असून मराठी मधील जुने शैलीची काही अक्षरे शिलालेखावर कोरलेली आहेत शिलालेखावर एकूण २२ ओळी असून अठराव्या ओळीनंतरचा शिलालेखाच्या शिळाचा भाग खंडित झाला तो भागही शोधण्यात अणवेकर यांना यश मिळाले आहे. शिलालेखाची सुरुवात स्वदत्ता परदत्तां वा यो हरते वसुंधरा अशी सुरुवात करण्यात आली आहे हे प्रसिद्ध शाप वचन आहे. सोलापूर जिल्ह्यावर मध्ययुगीन काळात कल्याणीचे चालुक्य मंगळवेढ्याचे कलचुरी अक्कलकोटचे शिलाहार द्वार समुद्र चे होयसळ देवगिरीचे यादव अशा विविध घराण्यांची सत्ता होती यापैकी यादव राजा महादेव यांच्या काळा तील सोलापूर जिल्ह्यातील हा पहिला शिलालेख आहे.

## ब्रम्हानंद महाराज मठात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२८ फेब्रुवारी-**

करकंब येथील श्री. सद्गुरु ब्रम्हानंद महाराज संजीवन समाधी मठात अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ झाला. या निमीत्त दि. ७ मार्चपर्यंत विविध अध्यात्मिक कार्यक्रम व कुस्त्यांच्या आखाड्याचे आयोजन करण्यात आल्याचे प.पु.श्री.१००८ श्री. रामनारायण दास महाराज यांनी सांगितले. शुक्रवारी दि. २८ रोजी सकाळी महाराजांच्या हस्ते अभिषेक, पूजा, काकडा व ध्वजारोहणाने सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. श्री. लालदास महाराज यांच्या हस्ते कलश, वीणा व ग्रंथपूजन करण्यात आले.व्यासपीठ चालक म्हणून हभप भारत व्होटे, हभप बळीराम व्यवहारे व हभप गोडसे तर दररोज ५ ते ६ ब्रम्हकुमारीज प्रजापतीच्या अनिता बहेनजी यांचे प्रवचन होणार आहे.गुरुवार दि.६ मार्च रोजी सकाळी वैदिक पूजा, ब्राह्मण भोजन व सायंकाळी ४ वा.हभप मच्छिंद्र भुजबळ यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दि. ७ मार्च रोजी दुपारी ४ वाजता कुस्त्यांचे (आखाडा) आयोजन करण्यात आले आहे.



#### यांचे होणार काल्याचे कीर्तन

दि. १ मार्च, शनिवार हभप ओंकार जोशी, रविवारी हभप भारत थोरात, सोमवार हभप शंकर गोसावी, मंगळवार हभप सविताताई आरकस, बुधवारी हभप आसबे महाराज, गुरुवार हभप मच्छिंद्र महाराज यांचे काल्याचे कीर्तन तसेच दररोज दुपारी २ ते ४ भजनी मंडळांचा कार्यक्रम होईल.

# दक्षिण तालुक्यात बेरोजगारीची समस्या गंभीर

- तुटपुंज्या पगारावर काम करण्याची वेळ
- नोकरीसाठी युवकांना करावे लागते स्थलांतर

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रुप, दि. २८ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शिक्षण पूर्ण करूनही युवकांना नोकरी मिळत नसल्याने अनेक जण हतबल झाले आहेत. विशेषतः उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांना त्यांच्या शिक्षणानुसार नोकऱ्या उपलब्ध होत नसल्याने मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

तालुक्यातील कृषी आणि शेतीपूरक व्यवसायांवरच रोजगाराचे प्रमाण मर्यादित आहे. कृषी उत्पन्नातील घट आणि हवामानातील बदल यामुळे शेतीसह इतर व्यवसायांमध्येही संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे बरेच तरुण रोजगारासाठी इतर मार्ग शोधत आहेत. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी नसल्याने आणि स्वयंरोजगारासाठी लागणारे मार्गदर्शन व भांडवल उपलब्ध नसल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. स्थानिक युवकांनी प्रशिक्षण आणि कौशल्यविकास केंद्रांची मागणी केली आहे, जेणेकरून त्यांना नव्या उद्योगधंद्यांमध्ये संधी मिळू शकेल.

#### उपाययोजनेची गरज

जर ही समस्या लवकरच सोडवली नाही, तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील बेरोजगारीचे संकट आणखी गहिरे होऊ शकते. यासाठी स्थानिक नेते, सामाजिक संस्था आणि शासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

> शिक्षण पूर्ण करूनही युवकांना नोकरी मिळत नाही. गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, तर स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही. तुटपुंज्या पगारावर कुटुंबाचा गाडा चालवणं कठीण आहे. मेहनतीच्या मानाने मोबदला मिळत नाही. शासनाने रोजगार निर्मितीसाठी ठोस पावले उचलावीत.
>
> **-रेवणसिद्ध बगले, युवक**

तालुक्यात अनेक तरुणांचे शिक्षण उच्चस्तरीय असले तरी इंग्रजी भाषेची अडचण आणि तांत्रिक कौशल्यांचा अभाव यामुळे खासगी क्षेत्रातही नोकरीच्या संधी मर्यादित झाल्या आहेत. अनेक कंपन्या रोजगारासाठी मोठ्या शहरांकडेच लक्ष केंद्रित करतात, ज्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना संधी मिळत नाहीत. काही युवकांना शेतीविषयक कामांमध्ये किंवा स्थानिक लघुउद्योगांमध्ये काम मिळते, परंतु त्यासाठी मिळणारा पगार तुटपुंजा असतो. कष्टाला न मिळणारे समाधानकारक मोबदला आणि कामाच्या अस्थिरतेमुळे युवकांची परिस्थिती कठीण होत आहे. काहींना आठवड्याला केवळ १५०० ते २००० रुपये मिळतात, ज्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणं कठीण जातं.

मंदावलेली आर्थिक स्थिती आणि तुटपुंज्या पगारामुळे अनेकांना काम असूनही आर्थिक स्थैर्य मिळत नाही. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मात्र, त्यासाठी लागणारे भांडवल आणि व्यवसायाची माहिती मिळवण्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज भासत आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सरकारी आणि खाजगी क्षेत्राने पुढाकार घेऊन, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीसाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. तालुक्यातील तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रोजगार संधी शोधण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची मागणी केली आहे.

ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनानेही या समस्येकडे लक्ष देऊन, रोजगारविषयक शिबिरे आणि स्वयंरोजगार योजनांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. तसेच, स्थानिक लघुउद्योगांना प्रोत्साहन देऊन आणि त्यांच्यासाठी सवलतीच्या योजना राबवून रोजगाराच्या संधी वाढवता येतील.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रशांत कोरटकर याला अटक करा; बार्शी तहसीलदारांना निवेदन

**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**

काही दिवसापूर्वी नागपूर येथील रहिवासी प्रशांत कोरटकर याने अखंड हिंदुस्थानाचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल गरळ ओकून महाराष्ट्राती शिवभक्तांच्या भावना दुखावल्या होत्या. इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना फोन करुन छत्रपती शिवरायांबद्दल गरळ ओकून इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना धमकीही देण्यात आली होती. त्या संदर्भात कोल्हापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हाही नोंद करण्यात आला. परंतु त्याला अद्यापपर्यंत अटक केली नाही. म्हणून शिवप्रेमींच्या भावना तीव्र झाल्या आहेत. त्याला तात्काळ अटक करावी म्हणून बार्शी शहर व तालुक्यातील शिवप्रेमींनी तहसीलदार यांना निवेदन दिले व प्रशांत कोरटकर नामक व्यक्तीला तात्काळ अटक करण्यात यावी व महापुरुषांच्या संदर्भात बदनामीकारक वक्तव्य करणाऱ्याच्या विरोधात कडक कायदे करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली. विशिष्ट समूहाकडूनच वारंवार छत्रपती शिवरायांबद्दल जाणीवपूर्वक त्यांची बदनामी केली जाते, याकडे ॲड. गणेश हांडे यांनी लक्ष वेधले. डॉ. प्रशांत मांजरे, प्रा. किरण गाढवेयांनी भावना व्यक्त केल्या.

### फत्तेसिंह संस्थेच्या अध्यक्षपदी जाधव, उपाध्यक्षपदी शिंदे

**अक्कलकोट दि. २८ फेब्रुवारी-**





फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी प्रल्हाद जाधव तर उपाध्यक्षपदी अमर शिंदे यांची निवड करण्यात आली असून डॉ. मनोहर मोरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेत माजी अध्यक्ष बाबासाहेब निंबाळकर, विलास गव्हाणे, सुभाष गडसिंग, दत्ता पाटील यांनी शिक्षक भरती पदोन्नती आणि संस्थेच्या एका शाळेतील गैरप्रकार बद्दल जाब विचारला होता. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष राजीव माने यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत राजिनामा दिला. नंतर झालेल्या विश्वस्त मंडळाच्या नवीन पदाधिकारी निवडीच्या सभेत अध्यक्षपदासाठी तानाजी चव्हाण, बाळासाहेब मोरे, अमर शिंदे, राजीव माने देखील पुन्हा इच्छुक होते. विश्वस्त सुधाकर गोंडाळ आणि संतोष फुटाणे यांनी कोणतीही अपेक्षा व्यक्त केली नाही. शेवटी ज्येष्ठ सभासद सल्लागार ॲड. शरद फुटाणे यांनी अध्यक्षपदासाठी प्रल्हाद जाधव तर उपाध्यक्ष पदासाठी अमर शिंदे यांचे नाव घोषित केले आणि त्यांची निवड करण्यात आली. प्रल्हाद जाधव हे सेवानिवृत्त शिक्षक असून अमर शिंदे हे माजी आरोग्य अधिकारी आहेत. यावेळी सल्लागार सुरेश सूर्यवंशी, सोपान गोंडाळ, स्वामीराव पाटील उपस्थित होते.

### राष्ट्रीय बंजारा सेनेच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी आकाश पवार

**अक्कलकोट, दि. २८ फेब्रुवारी-**



दुधनी शिवाजी नगर तांडा येथील आकाश नामदेव पवार यांची राष्ट्रीय बंजारा सेनेच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. राष्ट्रीय बंजारा सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयकुमार गुलाबराव राठोड यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे . या निवडी बद्दल शिवाजी नगर दुधनी येथील जगदंब व सेवालाल महाराज मंदिरात श्री सेवा प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अशोक राठोड मोरया कंस्ट्रक्शन यांच्या उपस्थितीत डॉ सुनिल चव्हाण यांनी सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून सत्कार केले. यावेळी प्रदिप राठोड, आकाश राठोड, अप्पाराव राठोड, प्रविण राठोड, महेश चव्हाण, अनिल राठोड, गोरख पवार, गुरुनाथ राठोड, सुनिल राठोड, रोहन राठोड, रितेश पवार, अमोल राठोड, विनोद राठोड, दादा राठोड उपस्थित होते .



### केलफॉस फॉउंडेशनच्या वतीने न्यू इंग्लिश हायस्कूलला बोर्ड भेट

**नातेपुते, दि. २८ फेब्रुवारी-**

लोकविकास पार्टी, धर्मपुरी यांच्या माध्यमातून व ॲड.संदीप वाघ यांच्या केलफॉस फॉउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी गावातील न्यू इंग्लिश हायस्कूलला चार ग्रीन बोर्ड भेट देण्यात आले. यनिमित्ताने न्यू इंग्लिश स्कूल व मुख्याध्यापक ॲड.वाघ यांच्याकडून सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी केलफॉस फॉउंडेशनचे संस्थापक ॲड. संदीप वाघ, लोकविकास पार्टी यांची सर्व टीम मेंबर्स तसेच हायस्कूल शाळा व्यवस्थापान समितीचे अध्यक्ष विजयकुमार पाटोळे, नितीन पाटील, दत्तात्रय झेंडे, कृष्णात काटकर, दीपाली पाटील, भारती निर्मळ, निलेश काटकर, गोरख पाटील, गोरख कर्चे, दत्तात्रय कर्चे, महादेव शेडगे, विवेक पाटील उपस्थित होते.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार...



**धाराशिव :** नूतन जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्विकारला. यावेळी स्वीय सहायक दत्तात्रय कुलकर्णी, सेवक लिंबराज शिंदे, अरविंद कवठेकर, युवराज तांदळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. सौरभ पाटील यांचा सत्कार

**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

शहरातील जय तुळजाभवानी अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेचे चेअरमन सुहास पाटील यांचे सुपूत्र डॉ. सौरभ पाटील यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली आहे. या यशाबद्दल डॉ. सौरभ पाटील व पाटील परिवाराचे अभिनंदन होत आहे. यावेळी बाळासाहेब जाधव, डॉ. सुभाष वाघ, रवी निंबाळकर, नरसिंह पाटील, समाधान देशमुख, गोविंद चव्हाण, नेताजी शेंडगे, उत्रेश्वर सोन्रे, पत्रकार सुभाष कदम-पाटील यांच्या हस्ते डॉ. सौरभ पाटील यांचा पुष्पगुच्छ व पेढा भरवून सत्कार करण्यात आला.



### पार्वतीमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**जळकोट, दि.२८ फेब्रुवारी -**


तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेत मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता कदम-सोमवंशी हस्ते कवी कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



### आझाद महाविद्यालयात मराठी दिन साजरा

**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

आझाद महाविद्यालय, आळसा येथे मराठी राजभाषा दिनानिमित्त एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बाबा इंगळे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. इंगळे यांनी मराठी भाषेची समृद्ध परंपरा विषद केली आणि संत साहित्याच्या अनेक उदाहरणांचा वापर करून मराठी भाषेच्या सामाजिक आणि सांस्कृतिक महत्वाचे विवेचन केले. त्यांनी सांगितले की, मराठी साहित्य केवळ साहित्यिक मूल्यांसाठीच नाही, तर समाज परिवर्तनासाठी देखील प्रभावी साधन ठरले आहे. त्याचप्रमाणे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे भाषेच्या विकासास फायदा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मासुमदर होते. यावेळी डॉ. श्याम पांडे आणि डॉ. मेहता यांनी देखील आपल्या विचारांची मांडणी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिंदे यांनी केले. कार्यक्रमात अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. शेवटी आभार डॉ. कांबळे यांनी मानले.



### संभाजीनगर शाळेत विज्ञान दिन साजरा

**जळकोळ, दि.२८ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील संभाजीनगर भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते थोर भारतीय शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच त्यांच्या संशोधनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्रतिमा पूजनानंतर विद्यार्थ्यांना मनोरंजनातून विज्ञान शिकता यावे यासाठी विज्ञानकोडे घेण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांमधील शोधक वृत्तीला चालना मिळावी यासाठी लिटल सायंटिस्ट ही स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमासाठी जळकोट बीटचे विस्तार अधिकारी जट्टे व होर्टी केंद्राचे केंद्रप्रमुख महाबोले यांचे मार्गदर्शन लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका एम.बी. महामुनी, एम.एस. रेणुके, एन.एन. इटकरी, एस.जी. अभिवंत, डी. एस. वनवे, जी.के. मुरमुरे, एम.एम. चव्हाण, विज्ञान शिक्षक डी.एम. कुडकले, एम.आर. आहेरकर, श्रीकांत कदम, आकांक्षा लोखंडे या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### नूतन जिल्हाधिकाऱ्यांचा स्वागत सत्कार

**तुळजापूर, दि.२८ फेब्रुवारी -**



धाराशिव जिल्ह्याचे नुतन जिल्हा अधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे स्वागत शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख बापूसाहेब भोसले, शिवसैनिक अमोल जाधव, संभाजी नेपते व तालुका शहर शिवसेनाच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. यावेळी आई तुळजाभवानी व तालुक्याचा विकास होवो तालुक्यातील भ्रष्टाचार मुक्त होवो, अशी मागणी करण्यात आली.

# धाराशिवमध्ये अनैतिक देह व्यापार प्रकरणी कारवाई; एक महिला अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**



धाराशिव शहरातील शेकापूर रोड, बालाजी नगर येथे चालवण्यात येणाऱ्या अनैतिक देह व्यापार प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दि. २७ फेब्रुवारी रोजी गस्तीदरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, शेकापूर रोडवरील एका घरामध्ये महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेतला जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी एका बनावट ग्राहकाला पाठवून खात्री केली. माहिती खरी असल्याचे स्पष्ट होताच दुपारी २:५५ वाजता पोलिसांनी त्या घरावर छापा टाकला. छाप्या दरम्यान, संबंधित ठिकाणी एक महिला आढळून आली. महिला पोलिसांच्या मदतीने चौकशी केली असता, रत्नमाला सतीश मदने (वय ४६, रा. बालाजी नगर, धाराशिव) ही महिलांना वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करत असल्याचे निष्पन्न झाले.

त्या महिलांना वाणिज्यिक उद्देशाने आश्रय देऊन जबरदस्तीने लैंगिक शोषणासाठी प्रवृत्त करत असल्याचे समोर आले. पोलिसांनी कारवाई करत रत्नमाला मदने हिला ताब्यात घेतले आणि तिच्याकडून ७ हजार ९०० रूपये रोख रक्कम व निरोधच्या पाकिटांसह एकूण ७ हजार ९७० रूपये किंमतीचा माल जप्त केला. तसेच, त्या ठिकाणी असलेल्या महिलांची सुटका करण्यात आली.

या कारवाईमुळे धाराशिव शहरात अवैध व्यवसायाविरोधातील पोलिसांची कठोर भूमिका स्पष्ट झाली आहे. स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून, अशा अनैतिक कृत्यांवर पोलिसांनी भविष्यातही कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# तुळजाभवानी मंदिरात पायऱ्या चढून दम भरल्याने वृद्ध भाविकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ फेब्रुवारी -**

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी बार्शी येथील भाविक नागेश रामचंद्र कलधोने (वय ६२) हे सहकुटुंब दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी मंदिरात आले होते. तुळजाभवानी देवीचे दर्शन करून गणपती मंदिरापासून मातंगी देवी मंदिराच्या पायऱ्यावरून जात असताना पायऱ्या चढून दम भरल्याने हे भाविक चक्कर येऊन पडले.

अचानक चक्कर आल्याने त्यांचे कुटुंब घाबरून गेले. मातंगी देवीच्या पायऱ्या जवळ भाविक चक्कर येऊन पडल्याने गर्दी झाली १०८ म्बुलन्स बोलून भाविकाला शंकर बसाडे यांनी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. हॉस्पिटलमध्ये येण्यापूर्वीच भाविकांचा मृत्यू झाला होता असे डॉक्टरांनी सांगितले.

मंदिर प्रशासनाकडून भाविकांना मातंगी देवी येथील मंदिराकडून दर्शनानंतर बाहेर काढले जाते. मातंगी देवीच्या पायऱ्या खड्या आणि अरुंद असल्यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणात तिथे गर्दी होते. अरुंद पायऱ्याचा रस्ता आणि त्यात दोन्ही साईडने व्यापाऱ्यांनी केलेले अतिक्रमण यामुळे भाविकांच्या गर्दीमुळे या भागात भाविकांची धांदल उडली जाते.

खड्या पायऱ्यावरून जाताना वृद्ध भाविकांनी आणि लहान मुलांना दम भरल्यासारखे होऊन त्रास होतो. मंदिर महाद्वारच्या पायऱ्या व्यवस्थित पसरट आणि रस्ता मोठा असल्यामुळे दर्शनानंतर भाविकांना महाद्वाराच्या पायऱ्या बाहेर जाण्यासाठी सोयीच्या होतात.

# रूपामाताच्या शुगर युनिट १ च्या गळीत हंगामाची सांगता



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

रुपामाता नॅचरल शुगर युनिट क्रमांक १ पाडोळी (आ) ता.जि. धाराशिव या कारखान्याच्या गळीत हंगामाचा सांगता कार्यक्रम धाराशिव जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड व रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक अजित गुंड पाटील यांच्या हस्ते व उपस्थितीत पार पडला.

सर्वांच्या सहकार्याने आपण या गळीत हंगामाची यशस्वी शेवट करत आहोत. यावर्षी रूपामाता उद्योग समूहाने दोन लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे. यावर्षी आम्ही २७०० रुपये प्रती टन भाव दिला असून, शेतकऱ्यांना लवकरात लवकर उसबिल मिळावे यासाठी प्रयत्न केले आहेत. ज्यांचे बिलाचे पैसे राहिले असतील ते लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न राहील, असे अजित गुंड यांनी बोलताना सांगितले. यावेळी कारखान्यावर आलेल्या अखेरच्या ट्रॅक्टरचे पूजन करण्यात आले व यावेळी हंगामात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ऊस वाहतूकदारांचा, शेतकरी यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर सूर्यकांत गरड, चीफ इंजिनिअर संजीव शिलवंत, शेतकी अधिकारी प्रेमनाथ पाटील, बाळासाहेब थोडसरे, माऊली गुंड, कामगार, सहकारी, ऊस वाहतूक ठेकेदार, उस उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंदुरमळा शिवारात बिबट्या; नागरिकांत घबराट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**



नळदुर्ग शहरापासुन जवळच असलेल्या कंदुरमळा शिवारात दि.२६ फेब्रुवारीच्या रात्री शेतकऱ्यांनी बिबटया बघितल्याचे सांगितल्यामुळे या परीसरात सर्वत्र भितीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ या परीसराची पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी व नागरीकांनी केली आहे.

सध्या धाराशिव जिल्ह्यात बिबट्या तसेच वाघाची दहशत पसरली आहे.वनविभागाच्या कॅमेऱ्यात वाघ कैद झाला असला तरी वनविभागाला अद्याप त्या वाघाला पकडण्यात यश आले नाही. असंख्य प्रयत्न करूनही अजुन वाघ वनविभागाच्या सापळ्यात अडकला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. अशातच आता नळदुर्ग परीसरात शेतकऱ्यांना बिबट्या दिसल्याने या परीसरात भितीचे वातावरण पसरले आहे. दि.२६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मुकेश राठोड यांनी आपल्या शेतात बिबट्या पहिल्याचे सांगितले आहे. हा बिबट्या अतिशय दणकट असल्याचे राठोड यांनी सांगितले आहे. शेतात बिबट्याच्या पायाचे ठसे आढळुन आले असुन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी हे पायाचे ठसे बिबट्याचे आहेत की आणखी कुठल्या प्राण्यांचे आहेत याचा खुलासा करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर रात्री अपरात्री या रस्त्यावरील वागदरी, गुजनुर, येडोळा, शहापुर, गुळहळ्ळी, दहिटना या गावचे नागरीक दुचाकीवरून मोठ्या प्रमाणात ये-जा करतात त्यांच्यामध्येही या बिबटयाच्या बातमीने भितीचे वातावरण पसरले आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ या परीसराची तसेच राठोड यांच्या शेतात जे प्राण्यांच्या पायाचे ठसे आहेत. त्याची पाहणी करून हे ठसे नेमके बिबट्याचे आहेत की आणखी कुठल्या प्राण्यांच्या पायाचे ठसे आहेत याचा खुलासा करणे गरजेचे आहे.

### उद्या रोगनिदान, तपासणी शिबिर

**जळकोट, दि.२८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील सलगरा दिवटी येथील पाटील क्लिनिक व लातूर येथील हार्मनी सुपर स्पेशालिटी अँड पेन क्लीनिक यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ मार्च रोजी सकाळी नऊ ते दुपारी तीन यावेळेतसर्व रोग निदान व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



**धाराशिव :** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा.प्रा. राम शिंदे हे आई तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर नगरीत आले असताना रूपामाता उद्योग समूहाचे अध्यक्ष तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड साहेब यांनी त्यांचे तुळजाभवानीची प्रतिमा देऊन स्वागत केले. यावेळी आ. राणाजगजीतसिंग पाटील, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, नितिन काळे, दत्ता सोनटक्के, प्रवीण पाठक व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सुजितसिंह ठाकूर : कार्यकर्त्यांना हत्तीचं बळ देणारा नेता

## पक्षाकडून मोठी जबाबदारी मिळण्याचे संकेत

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

प्रदेश सरचिटणीस व माजी आमदार जिल्ह्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते सुजितसिंह ठाकूर हे राजकारणात आता सक्रिय झालेलं पाहायला मिळत आहे. मागील काही वर्षापासून ते आजारी होते. त्यामुळे त्यांचा अनेक काळ आजारपणात गेला आता ते बरे झाले असून राजकारणात नेहमीप्रमाणे सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. ठाकूर आजारपणात असताना देखील त्यांनी कार्यकर्त्यांचा संपर्क मात्र कमी होऊन दिला नाही. नेहमी कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहत त्यांच्या अडीअडचणी समजून घेत पक्षाच्या संघटनात्मक कामावर कार्य सुरू ठेवले. ठाकूर यांची राज्यात एक वेगळी ओळख असून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू निकटवर्तीय आहेत. ठाकूर यांनी देशातील अनेक दिग्गज नेत्यांसोबत पक्ष वाढीसाठी संघटनात्मक काम केले आहे. युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष, प्रदेश सरचिटणीस, सदस्य नोंदणी अभियान, देवेंद्र फडणवीस यांची जनादेश यात्रा पक्षाच्या अश्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या असून जिल्ह्याच्या राजकारणात त्यांची मोठी पकड आहे. मागील काही दिवसापासून भाजपचे देशात तसेच राज्यात सदस्य नोंदणी अभियान मोठ्या जोराने सुरू आहे. हे अभियान सुरू झाल्यापासून पक्षांच्या बैठकांना हजेरी लावात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्यासाठी कार्यकर्त्यांशी त्यांनी संपर्क सुरु केला आहे. यावरून ठाकूर आता पूर्वीसारखे राजकारणात सक्रिय झालेले पाहायला मिळत आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी परंडा येथे त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी परंडा येथे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी राज्यातून मंत्री, आमदार, दिग्ज नेते तसेच हजारो कार्यकर्ते उपस्थित राहिले होते. त्याचबरोबर काल दि.२७ रोजी विधान परिषदेचे सभापती रामभाऊ शिंदे यांनी देखील त्यांच्या परंडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पक्षाच्या संघटनात्मक कामाविषयी चर्चा झाली असल्याचे उपस्थित नेत्यांनी सांगितले. त्यामुळेच ठाकूर यांच्या राजकारणात सक्रिय होण्याने कार्यकर्त्याला हत्तीचे बळ मिळत आहे,असे म्हणणे देखील आता नाकारता येणार नाही.

ठाकूर यांना भेटण्यासाठी नेत्यांच्या गाठीभेटी वाढल्याने येत्या काळात त्यांना पक्ष मोठी जबाबदारी देणार असल्याची कार्यकर्ते मध्ये जिल्हाभर चर्चा सुरू झाली आहे. आता पक्ष त्यांना काय जबाबदारी देणारा हे पाहणे गरजेचे आहे.

# तेर नगरीचे ऐतिहासिक पुनरुत्थान : जागतिक पर्यटन केंद्राकडे वाटचाल

**तभा वृत्तसेवा / शहाबाज मुलानी**
**तेर, दि.२८ फेब्रुवारी -**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या तेर नगरीच्या पुनरुत्थानाची प्रक्रिया सुरू असून, जागतिक पर्यटन केंद्र म्हणून तिच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सातवाहन कालखंडातील महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळखले जाणारे तेर (प्राचीन तगर) हे शहर रोमसह विविध जागतिक व्यापारी केंद्रांशी जोडले गेले होते. याच ठिकाणी संत गोरोबाकाका यांच्या समाधीस्थळासह अनेक ऐतिहासिक वारसा स्थळे आहेत, ज्यांना नव्याने उजाळा देण्याचे काम सध्या सुरू आहे.

महाराष्ट्रातील सर्वांत प्राचीन वारसा स्थळांपैकी एक असलेल्या त्रिविक्रम मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मंदिराच्या पूर्वीच्या सिमेंटच्या थरांना हटवून पारंपरिक चुना व सरकीचा वापर करून जीर्णोद्धार सुरू आहे. या प्रक्रियेत डिंक, गूळ, बेल, उडीद डाळ, गुळवेल, अंबाडी यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. मुख्य मंदिरासमोरील सभामंडप नव्याने उभारला जात असून, त्यासाठी खास पारंपरिक शैलीतील विटा तयार करण्यात आल्या आहेत. तसेच, मंदिरासमोरचा धर्मपार पुन्हा बांधला जात आहे. या मंदिराच्या प्रांगणातच बाराव्या शतकात संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, सोपानदेव आणि निवृत्तीनाथ यांचे संत गोरोबाकाकांच्या नेतृत्वाखाली पहिले संत संमेलन भरले होते.

तेर नगरीतील बौद्ध स्तूप आणि तीर्थकुंडांच्याही पुनरुत्थानासाठी प्रयत्न सुरू आहेत. बौद्ध स्तूपांच्या विकासासाठी २ कोटी २१ लाख रुपये, तर प्राचीन तीर्थकुंडांच्या संवर्धनासाठी ५ कोटी ११ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या विकास प्रकल्पांमुळे तेरचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होणार आहे. तेर येथील कोट टेकडी ही ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्वाची जागा आहे. येथे प्राचीन अवशेष सापडल्याने उत्खननाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, येथे प्रत्यक्ष उत्खनन प्रक्रियेसाठी प्रयोगशाळा उभारली जाणार आहे. यासाठी १३ कोटी ३८ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. ही प्रयोगशाळा पर्यटक आणि इतिहास अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.

तेर हे जागतिक पर्यटन नकाशावर झळकावे यासाठी स्थानिक प्रशासन आणि ऐतिहासिक वारसा संवर्धन समित्या विशेष प्रयत्न करत आहेत. वारसा स्थळांचे संवर्धन आणि पुनरुत्थान झाल्यास देशभरातून तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांची तेरकडे ओढ वाढेल.

प्राचीन इतिहास, संत परंपरा आणि व्यापार केंद्र म्हणून नावाजलेल्या तेर नगरीला पुनरुज्जीवित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. संतांचे कार्य, ऐतिहासिक बाजारपेठा आणि प्राचीन स्थापत्य यामुळे तेर भविष्यात पर्यटनासाठी महत्त्वाचे केंद्र ठरेल.



या प्रयत्नांमुळे तेर नगरीला नवा आत्मसन्मान मिळणार असून, तिच्या गौरवशाली परंपरेला जागतिक स्तरावर मान्यता मिळेल.

येथील कोट टेकडीवर उत्खननाची जिवंत प्रात्याक्षिक प्रयोगशाळा केली जाणार आहे. यासाठी १३ कोटी ३८ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच प्राचिन तीर्थकुंड विकासासाठी ५ कोटी ११ लाख, बौद्ध स्तूप विकासासाठी २ कोटी २१ लाख रूपयांचा निधी उपलब्ध आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जाणीव संघटनेचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न

**वाशी, दि.२८ फेब्रुवारी -**

वाशी येथील माऊली कॉम्प्लेक्समध्ये डिग्नीफाय योजना जाणीव संघटनेच्या वतीने कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिर नुकतेच संपन्न झाले.

शिबिरात बोलताना रामभाऊ लगाडे म्हणाले की स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी समाजातील गोरगरीब कष्टकरी विकासापासून वंचित असलेले लाभधारकांना शासकीय योजनेची कास धरून



त्यांना विकास पोहोचवा, अशी उद्गार जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी कार्यकर्त्याला मार्गदर्शन करताना केली.

यावेळी स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्ष लति फाकाजी यांनी संस्थेच्या ध्येयधोरण व शासकीय योजनेची माहिती दिली.

यावेळी प्रकल्प प्रमुख विजय क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले ४३ गावातून ६० ते ७० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## संक्षिप्त वृत्त...

### गणित प्रज्ञा परीक्षेसाठी निवड

**अहमदपूर, दि.२८ फेब्रुवारी -**

येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांनी राज्य गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत यश संपादन केले आहे. या परीक्षेला पाचवीचे एकूण ४२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २३ विद्यार्थी गणित प्रज्ञा परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. त्यात वीरा गुदळे, श्रावस्ती ससाने, पार्थ बोंडगे, समरवीर जाधव, श्रेयस देशमुख, अभिजीत चाटे, राजवीर मुंढे, चैतन्य पांचाळ, सुदर्शन घोगरे, अथर्व शिंदे, साई केसगिरे, आदित्य झरीकुंटे, हर्षदा हांडे, वैष्णवी ढाकणे, प्राची कदम, आरोही बेंबडे, विराज स्वामी, शेख सादेक, पार्थ किरडे, पायल उपासे, श्लोक आलापुरे, आदिश्री ताटीपामुलवार, युवराज वलसे यांचे कौतुक करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना सविता पाटील, प्राजक्ता भोसले, सविता करंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गणेश दादा हाके, सचिव प्राचार्या रेखा हाके-तरडे, उपाध्यक्षा एडवोकेट मानसी हाके, कुलदीन हाके, अमरदीप हाके, रोडगे, मीना तोवर यांनी कौतुक केले आहे.

### नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

देशात काही राज्यांमध्ये बर्ड फ्लू विषाणूचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. जिल्ह्यातील ढोकी परिसरात अचानक कावळ्यांचे मृत्यू आढळल्याने आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. या घटनेनंतर जिल्हास्तरीय शीघ्र प्रतिसाद पथकाने या भागाची पाहणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. बर्ड फ्लू हा विषाणूजन्य रोग असून तो प्रामुख्याने पक्ष्यांमध्ये पसरतो. परंतु, काही प्रकरणांमध्ये हा माणसांनाही बाधित करू शकतो. या आजाराची प्राथमिक लक्षणे ताप, सर्दी, खोकला, श्वास घेण्यास अडचण, गळा दुखणे, स्नायूंमध्ये वेदना इत्यादी स्वरूपात दिसतात.

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२८ फेब्रुवारी -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन म्हणून ग्रंथ प्रदर्शन व व्याख्यानाने उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे, प्रमुख वक्ते प्रा. लक्ष्मण धावारे, प्रा. भाग्योदय घाटे, ग्रंथपाल प्रा. राहुल कुलकर्णी, प्रा. महादेव उंदरे, प्रा. पांडुरंग तांबारे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राध्यापक लक्ष्मण धावारे म्हणाले की कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी मोठे योगदान दिले म्हणून त्यांचा जन्म दिन आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी मराठी भाषा ही इंग्रजी प्रमाणे ज्ञान भाषा होणे गरजेचे आहे त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अरुण गंभीरे म्हणाले की मराठी भाषेला मोठा इतिहास आहे. संत ज्ञानेश्वर यांनी सुद्धा मराठी भाषेचा गौरव केला आहे. अंतर्मनाची स्वच्छता करण्यासाठी साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बी. एन. घाटे यांनी केले, सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा. राहुल कुलकर्णी यांनी तर प्रा.एम.डी. उंद्रे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. कृष्णा थोरात, प्रा. अशोक पाटील, प्रा.डॉ. माने, विपुल भालेराव व अजय जाधव यांनी परिश्रम घेतले.




## रेशनकार्ड धारकांसाठी ई-केवायसी अनिवार्य; ३० मार्चपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ फेब्रुवारी -**

राज्य सरकारने सार्वजनिक वितरण प्रणालीतील सर्व रेशनकार्डधारकांसाठी ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रिया अनिवार्य केली आहे. ई-केवायसी न केल्यास शिधा वितरण बंद होण्याची शक्यता आहे.याआधी अंतिम मुदत २८ फेब्रुवारी होती. मात्र, नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन ३० मार्चपर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे.

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नागरिकांना रेशन दुकानातील ई-पॉस मशिनवर अंगठा स्कॅन करावा लागत होता. मात्र, सर्व्हर डाऊन होण्याच्या तक्रारी आणि अनेक शिधापत्रिकाधारक बाहेरगावी असल्याने अडचणी येत होत्या. या समस्येवर उपाय म्हणून केंद्र सरकारने Mera e-KYC Mobile pp Am{U adhar Face RD Service pp हे मोबाईल ॲप्स सुरू केले आहे. ई-केवायसी करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे. Google Play Store dê$Z Mera e-KYC Mobile pp आणि adhar Face RD Service pp डाऊनलोड करून इन्स्टॉल करावे. Mera e-KYC Mobile pp उघडून राज्य आणि ठिकाण निवडावे. आधार क्रमांक टाकून आलेला OTP संबंधित रकान्यात भरावा. सर्व माहिती भरून सबमिट बटणावर क्लिक करावे. Face e-KYC पर्यायावर क्लिक करून सेल्फी कॅमेरा सुरू करावा. डोळ्यांची CKS>Pmn करून फोटो काढावा. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर e-KYC पूर्ण झाल्याचा संदेश मिळेल.

जिल्हा प्रशासनाने सर्व रेशनकार्डधारकांनी ३० मार्चपूर्वी ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मोबाईल ॲपच्या माध्यमातून घरी बसूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असे स्वाती शेंडे यांनी कळविले आहे.

## धार्मिक कार्यक्रमात सहभागी होवून महिलांनी आपले जीवनमान उंचावावे : चौरे

**तभा वृत्तसेवा**
**पाडोळी, दि.२८ फेब्रुवारी -**

महिलांनी नाम संकीर्तनाच्या सप्ताहात सहभागी होऊन आपले जीवन मान उंच व्हावे असे आव्हान विश्व हिंदू परिषदेचे विभाग सेवा प्रमुख दत्तात्रेय चौरे यांनी केले सालाबादप्रमाणे करजखेडा मुख्य रस्त्यालगत संत मारुती महाराज विसावा मंदिरात यंदा परिसरातील अखंड रामनाम सप्ताह साजरा केला त्याचे सांगता प्रत्यार्थ रोजी चौरे बोलत होते.

या हिंदू संस्कृतीत महिलांचे महत्त्व अधिक आहे त्याबाबतीत सांगताना ते म्हणाले आई ही पहिला गुरु असून तिने बाळकडू संस्कार दिले तर ते आयुष्यभर टिकतात जसे जिजाऊने शिवबाला घडवले तदतच महिला मातृत्व शक्तीने स्वतः होऊन कुटुंबाचेही कल्याण कसे होईल ते पाहावे आणि आगामी आगामी काळातील सीता नवमीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे करावे असेही त्यांनी सांगितले. यावेळी महिला व वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हभप संतोष पाटील, मारुती पांचाळ परमेश्वर शिंदे, पुजारी भाऊ, भंडारकर महाराज, कानेगाव बसवंत महाराज आदी भाविक जमले होते या महिलांच्या सप्ताह नंतर लगेच पुरुषाच्या पारायण व किर्तन सप्ताह सुरू होणार आहे, असे हभप. पाटील यांनी माहिती देताना सांगितले.

## मागासवर्गीय सवलतीनुसार नुसार अंगणवाडी पद भरती करा

### तालुका विधायक कृती समितीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२८ फेब्रुवारी -**

सध्या चालू असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस या रिक्त पदांची भरती करण्यात येत असून शासनाच्या आरक्षण धोरणानुसार पद भरती करण्यात यावी, अशी मागणी महिला व बालकल्याण विभागामार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तालुका विधायक कृती समितीने केली आहे.

सरकारच्या वतीने देण्यात येणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी देण्यात येणाऱ्या वयाच्या अटी इतर जाती पेक्षा जास्त असते. परंतु अंगणवाडी कर्मचारी भरती संदर्भातील हा



कोठेतरी बाजूला ठेवून अंगणवाडी कर्मचारी भरती प्रक्रिया राबविली जाते आहे.

हा विषय शिरुर अनंतपाळ तालुका विधायक कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी लक्षात घेऊन महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली व त्यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अंगणवाडी भरती प्रक्रियेतील सर्वांना समान वयाची अट ठेवल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत.

मागासवर्गीय गटावर अन्याय होत असल्यामुळे संबंधित कार्यालयाकडून मागासवर्गीय उमेदवारासाठी वयाची अट वाढवून देऊन सहकार्य करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

या निवेदनावर तालुकाविधायक कृती समितीचे अध्यक्ष काकडे, कार्याध्यक्ष उत्तम कदम, राजू दिवेकर, निवृत्ती सूर्यवंशी, अविनाश जगताप, काशिनाथ जरीपटके, अविनाश शिंदे, सुरेश जाधव, बब्रुवान सूर्यवंशी, गोविंद अर्जुने, मच्छिंद्र लोंढे, उत्तम कांबळे, धनराज गायकवाड, धुरपत कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## उदगीर शहरात सुरु असलेल्या अंडरग्राउंड ड्रेनेज काम थांबवा

### राष्ट्रवादीचा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

उदगीर शहरात १६२ कोटी रुपये खर्च करुन पहिल्या टप्प्यातील २७ डिसेंबर २०२४ रोजी सुरू झालेले काम थांबवा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने सोमवारी (१७ फेब्रुवारी) उदगीर उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्याकडे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उदगीर न.प. अंतर्गत नाली आणि रोडसाठी मोठ्या प्रमाणात दलित वस्ती, नगरोत्थान, वैशिष्ट्यपूर्ण तसेच वित्त आयोगाचा निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला असून त्या कामाची निविदा नगर पालिकेने काढले असून त्या कामांना सुरूवात झाली आहे. काही कामाच्या कार्यारंभ होत आहेत.

परंतु त्याचबरोबर शहरामध्ये वॉटर ग्रीड अंडरग्राउंड नालीचे काम पण चालू झालेले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोड फुटणार आहेत याची जाणीव कदाचित न.प. च्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना झाली नसावी. कारण न.प. उदगीर यांनी अंडरग्राउंड नालीचे काम कोणत्या भागात किती किमी आहे किंवा शहराच्या कोणत्या भागात अंडरग्राउंड नाली होणार आहे याचा आराखडा न.प.ने जाहीर केला नाही. एकीकडे मोठ्या प्रमाणात शहरात नवीन कामे चालू केली जात आहेत. त्यामुळे आलेला निधीचा मोठ्या प्रमाणात संबंधीत अधिकारी भ्रष्टाचार करीत आहेत. यामुळे सरकारी पैशाचा अपव्यय होत आहे. त्यामुळे संबंधीत सर्व नवीन कामाला स्थगिती द्यावी. देऊन अंडरग्राउंड नाली बांधकाम स तरी स्थगिती सरकारच्या पैशाचा दुरुपयोग थांबविण्यात यावा, अन्यथा रास्ता रोको, धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्यध्यक्ष गजानन सताळकर यांच्यासह धनाजी बनसोडे, संदीपान कदम, नामदेव भोसले, रत्नदीप कांबळे, प्रेम तोगरे, अभिनव गायकवाड, केशव कांबळे, माधव उदगीरकर आदी कार्यकर्ते यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

## धर्मनिरपेक्ष भारताचा पाया छत्रपती शिवरायांनी रचला : शिवश्री प्रदीप ढगे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवरायांनी सतराव्या शतकामध्ये अठरापगड जाती व विविध धर्मातील लोकांना सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती. स्वराज्यावर प्रेम असणारा प्रत्येक मावळा हा मराठा होता. जाती-धर्मापेक्षा छत्रपती शिवरायांनी गुणवत्तेला अधिक प्राधान्य दिले होते. त्यामुळेच केवळ हिंदूच नव्हे तर मुस्लिमांनी देखील हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीमध्ये आपले योगदान दिल्याचे दिसून येते. विसाव्या शतकामध्ये ब्रिटिशांपासून स्वतंत्र झालेल्या भारताने अंगीकृत केलेल्या धर्मनिरपेक्ष भारताचा पाया छत्रपती शिवरायांनी रचला होता, असे मत शिवश्री प्रदीप ढगे यांनी व्यक्त केले.

ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने




आयोजित बहि:शाल व्याख्यानमालेतील डोंगरशेळकी येथे दुसरे पुष्प गुंफताना 'धर्मनिरपेक्ष राजा : छत्रपती शिवराय' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के हे होते. यावेळी व्यासपीठावर भानुदास मुंढे, सुरेश मुंढे, गंगाधर सूर्यवंशी, नरसिंग मुंढे, प्रा. संजय बिबीनवरे, प्रा. सतीश मुंढे यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना शिवश्री प्रदीप ढगे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे विश्ववंदनीय आहेत. त्यामुळे आपल्या देशातील अनेक समाजसुधारक व महापुरुषांनी छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच सामाजिक क्रांती घडवून आणली तसेच जगातील विविध राष्ट्र प्रमुखांनी छत्रपती शिवरायांच्या शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ या मार्गाचा अवलंब करून आपले अस्तित्व टिकवून ठेवले. सामान्य माणसांकडून असामान्य कार्यकर्तृत्व करून घेण्याची क्षमता छत्रपती शिवरायांमध्ये होती. तोच शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तरुणाईने वाटचाल करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के म्हणाले, सर्वसामान्य मावळ्यांना सोबत घेऊन ही नवीन स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय हे चिरंजीवी आहेत. ते कालही होते, आजही आहेत आणि उद्याही राहतील. छत्रपती शिवरायांचे मावळ्याच्या जातीकडे नव्हे तर सळसळत्या रक्ताकडे लक्ष होते. त्यामुळे महापुरुषांना एका जातीमध्ये बंदिस्त करू नये, असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय बहि:शाल केंद्राचे समन्वयक डॉ. गौरव जेवळीकर यांनी करुन दिला.

सूत्रसंचालन प्रा. प्रवीण जाहुरे यांनी तर बाबुराव मुंढे यांनी आभार मानले. यावेळी नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

## बारूळ महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

**तुळजापूर, दि.२८ फेब्रुवारी -**

श्री बाळेश्वर प्रतिष्ठान व सर्व बारूळ ग्रामस्थांच्या वतीने बारूळ महाशिवरात्र महोत्सव आयोजनचे आयोजन करण्यात आले असून २८ फेब्रुवारी रोजी या महोत्सवाचे उद्घाटन मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते तर दिपप्रज्वलन डॉ. कुलदीप मिटकरी यांच्या हस्ते झाले. ग्रामदैवत श्री बाळेश्वरांच्या यात्रेनिमित्त भव्य दिव्य राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन दि.२८ फेब्रुवारी ते ०१ मार्च पर्यंत करण्यात आहे.

धाराशिव, पुणे, मुंबई, संभाजीनगर, लातुर, बिड, जालना, नांदेड, सोलापूर, सह संपुर्ण महाराष्ट्रातुन शेकडो स्पर्धक श्री बाळेश्वर फेस्टीवलच्या माध्यमातून प्रसिद्ध झाले आहेत.

### जाहिर प्रगटन
**परंडा येथील जिल्हा न्यायालय- १, परंडा**

**उत्तरवादीस अपीलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस**

**आदेशावर व अपील** — **रेग्युलर दिवाणी अपिल क्र. ३७/२०२३**
**जुना रे. दि.अ.क्र .५३३/२०१४**
**सुखदेव विरुध्द विठ्ठल**

Respondent : -
**६. विठ्ठल रंगनाथ देवराम मयत वारस**
**६/३. सरस्वती प्रभाकर कोकाटे मयताची मुलगी रा.कोरेगाव ता. बार्शी**
**६/४. रुक्मीणी सतिश वाणी -मयताची मुलगी रा.बार्शी ता.बार्शी जि.सोलापूर**

तुम्हास नोटीस देण्यात येते की नियमीत दिवाणी दावा क्र. १७/२००४ या प्रकरणांतील हुकुमनाम्यावर/आदेशावर अर्जदार **सुखदेव निवृत्ती दिवटे, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसाव ता. परंडा जि. उस्मानाबाद** यांनी अपील सादर केले असुन ते या न्यायालयात नोंदविण्यात आले आहे. तथापि सदर प्रकरणातील प्रतिवादी नं.६ विठठल रंगनाथ देवराम चे वारस आपण असल्याचे या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला असुन सदरचा अर्ज मंजुर होवुन सदरील अपिलामध्ये आपणास प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ केलेले आहे. करीता सदरील अपिलावर सुनावणीसाठी **दिनांक २८/०३/२०२५** रोजी हा दिवस निश्चित केला आहे. तरी उपरोक्त दिवशी सकाळी **१०.३०** वाजता या न्यायालयात हजर रहावे.
तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा या अपीलात तुमच्या तर्फे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिक्त केलेलेली कोणीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत त्या अपीलाची सुनावणी निकाल देण्यात येईल.
**आज दिनांक २०/०२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**स्वाक्षरित /-**
**प्र. (अधिक्षक)**
**जिल्हा न्यायालय- १, परंडा (आदेशावरुन)**

## सामाजिक बंधुभाव हीच संत साहित्याची शिकवण : संजय बनसोडे

### शेतकरी बांधवांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करणार...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

उदगीर ही संताची पावन भुमी आहे. या पावन नगरीत विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने राहत आहेत आपल्या पुढच्या पिढीमध्ये वारकरी सांप्रदायामुळेच चांगले संस्कार येत असुन संताची शिकवण आपल्या पिढीने जपली पाहिजे त्यामुळेच सामाजिक बंधुभाव वाढतो हीच तर खरी संत साहित्याची शिकवण असल्याचे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर तालुक्यातील नळगीर येथील श्री बापुदेव पांडुरंग मंदिरात आयोजीत अखंड हरिनाम सप्ताह, काल्याचे किर्तन व वॉटर फिल्टर च्या लोकर्पण सोहळ्यात प्रसंगी बोलत होते. यावेळी हभप. श्रीराम कुटे महाराज हिंगोलीकर, धर्मपाल नादरगे, श्याम डावळे, लक्ष्मण सोनवळे, सत्यवान पांडे, हणमंतराव हंडरगुळे, रावसाहेब पाटील, अरविंद नागरगोजे, दयासागर यल्लावाड, सूर्यकांत नादरगे, बालाजी नादरगे, जयप्रकाश कापसे, सुरेंद्र अक्कनगिरे, तानाजी वडले, रामकिशन नादरगे, सुरेश पेद्दावाड, नितीन होळकर, प्रकाश गुंडरे, सोपान पेद्दावाड, लक्ष्मण उगीले, दिनकर मारमवार, विद्यासागर गट्टेवार, अरविंद जोशी, निवृत्ती भुसाळे, विलास पोतदार, राजकुमार मारमवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी वारकऱ्यांच्या प्रश्नासाठी मी मंत्री असताना मंत्रालयात बैठक लावुन त्यांच्या अडचणी समजुन घेवुन वारकरी सांप्रदायाच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली होती असे सांगुन भविष्यातही मी आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. आपल्या नळगीर येथील बापुदेवांच मंदिर हे जागृत देवस्थान आहे. येथे भाविकांची भक्ती असुन आपली ईच्छा पूर्ण करणारे हे स्थान असल्याचे भाविक सांगत असतात. मी फक्त एकच मागणे मागत असुन

मतदार संघातील जनता सुखी, समाधानी रहावे हीच प्रार्थना आज करतो. मागील निवडणुकीत माझ्या लाडक्या बहिणीमुळे मतांची लिड वाढली. आता भविष्यात अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, मदतनीस यांच्यासाठी मला काम करायचे आहे.

मागील काळात नळगीर गावाच्या विकासासाठी भरपुर निधी दिला असुन भविष्यात ही विकास कामासाठी निधी



कमी पडू देणार नाही. लवकरच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पुढील हप्ता हा लाडक्या बहिणींना मिळणार आहे. आपल्या शेतकरी बांधवांना दिवसा वीज पुरवठा करण्याचा माझा मानस असल्याचे ही आ. संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी नळगीर व पंचक्रोशीतील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## किलबिल स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२८ फेब्रुवारी -**

येथील किलबिल नॅशनल स्कूल जवळगा या शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्काराचे सादरीकरण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य संघटक हरिदास तम्मेवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागा करण्यासाठी व विज्ञानातून शिक्षण देण्यासाठी कोणकोणत्या पद्धतींचा वापर केला पाहिजे याबद्दल सरांनी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमात चमत्काराच्या सादरीकरणातून एकूण दहा प्रयोगांचे सादरीकरण केले व त्याची वैज्ञानिक कारण कोणते याचाही खुलासा केला सध्या समाजामध्ये अंधश्रद्धेचा पगडा कमी करण्यासाठी प्रयत्नशील असलेले हरिदास तम्मेवार आजही वेगवेगळ्या शाळांना भेट देत आपले कार्य अविरतपणे करत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संतोष पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन महारुद्र वाघमारे यांनी केले.

कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात संपन्न

**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

लालबहादूर शास्त्री विद्यालयात ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी विभागाच्या वतीने 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक कृष्णा मारावार पर्यवेक्षक किरण नेमट व प्रमुख मार्गदर्शक विद्यार्थीनी श्रुती माचपल्ले यांची उपस्थिती होती. मराठी विभाग प्रमुख अंबिका पारसेवार यांनी विद्यार्थ्यांना कवी कुसुमाग्रज यांचा परिचय व मराठी भाषेचा थोडक्यात इतिहास सांगितला. प्रमुख मार्गदर्शक श्रुती माचपल्ले हिने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला याविषयीचे निकष सांगितले. याप्रसंगी सुप्रिया बुधे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी साहित्यातील विविध प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. अभंग वीरेन पांचाळ, मराठी गौरव गीत भाग्यश्री, राजनंदिनी, सुमती या विद्यार्थिनींनी सादर केले. मराठी भाषेचा पोवाडा कविताने सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा गौतम तर आभार आशा कल्पे यांनी मानले.



### मोफत नेत्रतपासणी शिबिर संपन्न

**वलांडी, दि.२८ फेब्रुवारी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे महाशिवरात्रीनिमित्ताने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर दि.२६ फेब्रुवारी बुधवारी आयोजित करण्यात आले होते. वलांडी येथील रहिवासी असलेले रामबिलास बंग यांनी आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ या शिबीराचे आयोजन केले होते. या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून मंहत मौनी महाराज, पुजारी बालाजी मंदिर, बालाजीवाडी यांच्यासह डॉ. राम प्रसाद लखोटिया, डॉ. सुदाम बिरादार, डॉ. विलास गरड, डॉ. श्रुती गरड ह्यांनी तपासणी केली असून यामध्ये २४० रूग्णांच्या डोळयांची तपासणी करण्यात आली.त्यामध्ये ८० रूग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया उदगीर येथील उदयगीरी लॉयन्स नेत्र रुग्णालयात २७ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. यावेळी शिबिरात राम भंडारे, उमाकांत नागलगावे, राजकुमार हुडगे, उद्धव कोटमाळे आदींची उपस्थिती होती. या शिबिरांच्या यशस्वी करण्यासाठी लक्ष्मीकांत बंग, बद्रीनारायण बंग यांनी परिश्रम घेतले.



### गोळवलकर गुरुजी यांची जयंती साजरी

**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी**

येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांची जयंती उत्साहात साजरी झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार, विनायक इंगळे तर प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी पडलवार, प्रमोदिनी रेड्डी तसेच मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक माधव मठवाले, किरण नेमट अभ्यासपूरक मंडळ प्रमुख आशा गौतम, विजया गोविंदवाड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रमोदिनी रेड्डी म्हणाल्या की गोळवलकर गुरुजींनी समाज हाच परमेश्वर समजून समाजाची सेवा करण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून केले तर बालाजी पडलवार यांनी गुरुजींच्या जीवन कार्याची माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात विनायक इंगळे यांनी स्वयंसेवक तयार करण्याचे काम गोळवलकर गुरुजींनी केले. तसेच भारतातील विविध संस्थांना प्रेरणा देऊन पुढे आणण्याचे काम केले, असे मत इंगळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती शेंडे तर प्रास्ताविक विष्णू तेलंग व नियोजन विद्यालयातील विद्यार्थिनींनी केले.

### हिप्पळगावच्या महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

**शिरूर अनंतपाळ, दि.२८ फेब्रुवारी**

महाशिवरात्रीच्या निमित्ताने तालुक्यातील हिप्पळगाव येथील महादेव मंदिरात भाविक भक्तांनी महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली. हिप्पळगाव सह



पंचक्रोशीतील भाविकांनी महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. महादेव मंदिरात मध्यरात्रीपासून महिला भाविकांनी महादेवाचा अभिषेक पूजा करण्याची लगबग सुरू केली होती. बाहेर गावाहून येणाऱ्यांची व दर्शन घेण्यासाठी महिला पुरुषांची आलोट गर्दी होती. तसेच भजनी मंडळांनी नामस्मरण करीत महाआरती करण्यात आली गावकऱ्यांच्या वतीने येणाऱ्या भाविकांना फराळाचे पदार्थ वाटप करण्यात आले. येणाऱ्या अनेक भाविकांनी महादेवाची पूजा करून दर्शन घेतले.

सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत ग्राम दरबार...

# घरकुल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पंधरा हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२८ फेब्रुवारी -**

अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथील ग्रामपंचायत कार्यालयात जिल्हा परिषद लातूर आणि पंचायत समिती, अहमदपूर व ग्रामपंचायत कार्यालय, शिरूर ताजबंद यांच्या संयुक्त विद्यमाने नाविन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत एक दिवस गावकऱ्यांसोबत ह्या महाराष्ट्रातील पहिल्या ग्राम दरबाराचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता सुभाष पाटील, गटविकास अधिकारी अमोलकुमार अंदेलवाड, उपअभियंता पाणीपुरवठा धनंजय मुळे, उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयश यादव, बालविकास प्रकल्प अधिकारी राजेश गजलवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीनिवास मोरे, जि.प. तालुका कृषी अधिकारी यशपाल सातपुते, कृषी मंडळ अधिकारी संदीप आयनुले, वैद्यकीय अधिकारी डॉ. शरद गिरी, प्रवेक्षिका शोभा घोडके, मंडळ अधिकारी अशोक सोनकांबळे, तलाठी गणेश हिंगोले यांच्यासह आदींची उपस्थिती होती. यावेळी विविध शासकीय योजनेची माहिती सांगून मंत्री महोदयांच्या हस्ते मनरेगा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना जॉब कार्ड, मंजूर सिंचन विहीर, गाय गोटे, महिला व बालविकास विभागाकडून गर्भवती महिलांना बेबी किट व टी. एच.आर., जि.प. समाज कल्याण सेस फंडातून पात्र लाभार्थ्यांना पिको फॉल मशीन, ब्रास बँड, कृषी विभागाकडून बायोगॅस, कडबा कुटी यंत्र, बचत गटाच्या माध्यमातून महादेव महिला बचत गट चार लक्ष रुपये, जय ललिता महिला बचत गट चार लक्ष रुपये, श्री सरस्वती महिला बचत गट दोन लाख वीस हजाराच्या भारतीय स्टेट बँकेकडून पुरविण्यात



आलेल्या कर्जाचा धनादेश व घरकुल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पंधरा हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच मच्छिंद्र वाघमारे, उपसरपंच सुरज पाटील, ग्रा.पं. अधिकारी प्रशांत घुगे यांच्यासह सर्व ग्राम पंचायत सदस्य, सदस्या कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, विविध विभागाचे अधिकारी, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा वर्कर, बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

## मंगेशकर महाविद्यालयाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि.२७ फेब्रुवारी रोजी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.




यावेळी आयोजित व्याख्यानातून मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. शंकर कल्याणे यांनी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या साहित्याचा आढावा घेत मराठी भाषेचे महत्त्व व योगदान सांगितले. तसेच मराठी भाषेतून उपलब्ध असलेल्या करिअरच्या विविध संधींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यक्षीय समारोप प्रा. बलभीम सातपुते यांनी केले. सावरी (ता.निलंगा) येथे संपन्न होत असलेल्या महाविद्यालयाच्या रा.से.यो. विशेष वार्षिक शिबीरात महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा.डॉ. प्रदीप पाटील यांचे भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि.२७ फेब्रुवारी रोजी 'भारतीय संविधानाची ओळख' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज निंगाले व वैशाली बिरादार यांनी केले.

## महाराष्ट्र फार्मसी महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२८ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तालुका विधी सेवा समिती निलंगा आणि विधीज्ञ मंडळ निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला.

दि.२७ फेब्रुवारी रोजी संस्थेचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीचा चढता आलेख मांडला आणि विद्यार्थ्यांना कायदेशीर माहिती देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा न्यायालयाचे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश न्या.ए.बी. मरलेचा, सरकारी अभियोक्ता ॲड. कपिल पंढरीकर, निलंगा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रविण भोसले, ॲड.एस.व्ही. धैर्य, ॲड.एच.व्ही. अलमले, ॲड.व्ही.व्ही. कुलकर्णी, आणि ॲड.एन.एम. सोमवंशी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सी.व्ही. पांचाळ यांनी केले.

## डॉ. गुरुराज वरनाळे यांना श्रद्धांजली अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि चॅरिटेबल हॉस्पिटल, उदगीर येथील प्रा.डॉ.गुरुराज वरनाळे यांचे महाकुंभमेळा, प्रयागराज येथे जात असताना मध्यप्रदेश राज्यातील सतना जिल्ह्यामध्ये झालेल्या अपघातात दि.२२ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. राखी व मुलगा रेयांश तथा आई-वडील व दोन भाऊ आहेत.

यावेळी बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूरचे अध्यक्ष बाळासाहेब जाधव (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य) आणि सचिव बाबासाहेब पाटील (सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य), संचालक साहेबराव जाधव, सहसचिव बळीराम भिंगोले व अविनाश जाधव, कोषाध्यक्ष अंकुशराव कानवटे तथा संचालक मंडळाने स्व.डॉ. गुरुराज यांच्या अकाली निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त करून त्यांच्या पत्नी डॉ. राखी व परिवारातील सदस्यांना आणि तसेच सहकाऱ्यांना सांत्वना दिली. श्रयाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे यासाठी धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२८ फेब्रुवारी -**

बौध्द गया येथील महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात द्यावे या प्रमुख मागणीसाठी भंते महाविरो थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली येथील सम्राट मित्रमंडळ-लातूर अहमदपूर व सकल बौध्द समाजाच्या वतीने युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी देण्यात आलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, बौध्दाचे पवित्र स्थळ महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन बिहार येथे चालू आहे. या मागणीला पाठींबा देण्यासाठी संबंध देशभरामध्ये धरणे अंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या समर्थनात अहमदपूर येथे एक दिवसीय धरणे, निदर्शने आंदोलन करण्यात आले. प्रामुख्याने बौद्धगया येथील महाबोधि महाविहार १९४९ चा व्यवस्थापन कायद्यामध्ये तात्काळ दुरुस्ती करून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धाच्या हाती देण्यात यावे. बुद्धगया महाबोधी महाविहार येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील सर्व मागण्या त्वरित मंजूर करण्यात याव्यात. जगभरातील सर्व बौद्ध बांधवांच्या भावनेचा विचार करून व आदर करून १९४९ च्या व्यवस्थापन कायदा तातडीने दुरुस्त करावा अशा स्वरूपाचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी शेषेराव ससाणे, दयानंद वाघमारे, दूगाने, प्राचार्य एम.बी. वाघमारे आदींनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी सरस्वती कांबळे, शरद कांबळे, अण्णाराव सूर्यवंशी, बालाजी वाघमारे, बजरंग गायकवाड, योगिराज भालेराव, उमाकांत बनसोडे, बी.जी. दिवाणे, लखन गायकवाड, सरपंच राजेश कांबळे, मनोहर पाटील, सरपंच अशोकराव मोरे, शरद बनसोडे, ॲड. गायकवाड यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

## मनाच्या अंतरंगी डोकावले तर समाधान मिळते : प्रा.डॉ. सचिन घुगे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ फेब्रुवारी -**

मानसिक स्वास्थ्यावर महत्त्वपूर्ण संवाद: मनाच्या अंतरंगी डोकावले तर समाधान मिळते मानवी जीवनात सुख-दु:खाच्या चढउतारांचा समावेश असतो. बऱ्याच वेळा चुकीच्या समजामुळे दु:ख वाढत जाते. त्यामुळे, शरीराबरोबरच मनाची काळजी घेणं आवश्यक आहे, असे मत प्रा.डॉ. सचिन शेषराव घुगे यांनी व्यक्त केले.

उदगीरमध्ये चालू असलेल्या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळीनुसार, चला कवितेच्या बनात या या वाचक संवाद कार्यक्रमाच्या ३३१ व्या सत्रात प्रा.डॉ. घुगे बोलत होते. यावेळी त्यांनी डॉ. किरण सावे लिखित 'अंतरंगी डोकावताना' या साहित्यकृतीवर संवाद साधला. प्रा.डॉ. घुगे म्हणाले की, लेखकाने प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन महत्त्वाचा मानला आहे. या साहित्यकृतीमध्ये १९ प्रकरणांचा समावेश आहे आणि लेखकाने त्यात अतार्किक स्वगतामुळे मनुष्य दु:खी होतो, असा विचार मांडला आहे.

त्यांच्यानुसार, आनंद निर्माण करणारा ध्येयवादी दृष्टीकोन जगण्याला बळ देतो आणि आनंद देतो. साक्षीभाव असणं, सकारात्मकता आणि संयम वाढवते. दुसऱ्यांचे दु:ख ऐकून घेतल्याने जीवन आनंदी आणि उत्साही बनते, असे त्यांनी सांगितले. चर्चेच्या शेवटी, अध्यक्षीय समारोप करताना डॉ. विष्णू पवार, आदर्श ग्रंथपाल, शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर आणि स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांनी सांगितले की, प्रत्येक ठिकाणी आनंद आहे, मात्र तो घेता आलाच पाहिजे.

आपल्या ठरवलेल्या कार्याला मोठी किंमत दिली जाते, पण मोफत आनंद घेण्यासाठी वेळ नाही, म्हणूनच आपल्याला दु:ख जास्त होतं, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत कदम यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी केला. कार्यक्रमात परिसरातील डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी, वाचक रसिक आणि बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ येथील शेतकऱ्यांचा कचरा डेपो प्रस्तावाविरोधात विरोध

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२८ फेब्रुवारी -**

शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या वतीने प्रस्तावीत कचरा डेपो तयार करण्यासाठी सर्व्हे नंबर ११३/२२१ मध्ये जमीन दाखवली असल्याची माहिती मिळाल्यावर, या भागातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन कचरा डेपो प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांचा दावा आहे की, या सर्व्हे नंबरमधील जमीन अत्यंत सुपीक आणि बागायती आहे. याबरोबरच या क्षेत्राजवळ नदी आणि नाले आहेत. ज्यामुळे कचरा डेपो निर्माण केल्यास पर्यावरणीय दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकारच्या कचरा डेपोच्या स्थापनेसाठी हा भाग उपयुक्त नाही, कारण यामुळे शेतकरी वर्गाचे गंभीर आर्थिक नुकसान होईल. शेतकऱ्यांनी नगरपंचायतीला इशारा दिला आहे की, जर कचरा डेपोचा प्रस्ताव रद्द केला नाही तर ते नगरपंचायतीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहेत.

या निवेदनावर रत्नाकर चाकोते, अब्दुल तांबोळी, महमद तांबोळी, हाबीब तांबोळी, सुलगा सुगावे, उमाकांत सुगावे, विठ्ठल कलकुटे, जलिलसाब तांबोळी, लक्ष्मण बिराजदार, सुरेश कोटलवार, सूर्यकांत गलबले, आण्णाराव शेंरसाडे, शंकर चाकोते, उस्मान तांबोळी यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीच्या कार्याची अमेरीकेत नोंद

### शिष्टमंडळाची समितीला भेट...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.२८ फेब्रुवारी -**

पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीने बालकांच्या हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल अमेरीकेने घेतली आहे. पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीने ० ते १८ वयोगटातील बालकांच्या समस्यांवर कार्य करणाऱ्या एकमेव ग्रामस्तरीय शासकीय समिती म्हणून राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे. या कार्याचा आढावा घेण्यासाठी २६ फेब्रुवारी २०२५ रोजी अमेरीकाच्या मिराणी फाउंडेशनचे डॉ. हिरेश मिराणी, डॉ. ऐना मिराणी, क्राय अमेरीकेच्या सुप्रिता आणि शैलेंद्र आनंद यांचा पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीला भेट दिला.

बैठकीमध्ये पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीने बालकांच्या समस्यांवर केलेल्या कार्याचा अहवाल सादर केला. समितीच्या वतीने गावातील बालकांसाठी शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक विकासासाठी अनेक उपक्रम राबवले गेले आहेत. या समितीने पानगाव व आसपासच्या भागातील बालकांचे अनेक प्रश्न सोडवून त्यांना न्याय दिला आहे, तसेच बालकांच्या सर्वांगीण



विकासासाठी कार्यरत आहे.

अमेरिकेच्या शिष्टमंडळाने पानगाव ग्रामबाल संरक्षण समितीच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांचे कार्य जागतिक स्तरावर आदर्श ठरले असल्याचे म्हटले. यावेळी समितीचे अध्यक्ष मधुकर गालफाडे, सरपंच मिनाताई मोटाडे, माजी सरपंच सुकेश भंडारे यांच्यासोबत बैठक घेतली.

बैठकीत समितीचे सदस्य बाबा हलकुडे यांनी समितीच्या कार्याचा अहवाल मांडला, तसेच बाल स्नेही ग्रामपंचायतीच्या कार्याचा आढावा ग्रामपंचायत अधिकारी गोपिनाथ टकले यांनी दिला.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष विष्णू आचार्य, अनिल फुलारी, अन्वरबानू शेख, जयश्री थोरमोठे, भाग्यश्री चिताडे, सुप्रिया गोरे यांची उपस्थिती होती.

**जाहिर प्रगटन**
**उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयात**

**हिंदू विवाह अर्ज क्र. ७९/२०२४** — **पल्लवी विरूद्ध एकनाथ**
**नि.क्र. १२**

**प्रति,**
**गैरअर्जदार,**
**एकनाथ जयवंत पतंगे,**
**रा. गुंजोटी, ता. उमरगा जि. धाराशिव.**
**हा. मु. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, लातूर ता. जि. लातुर.**

ज्याअर्थी उपरिनामि अर्जदार यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, त्याअर्थी याद्वारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरूध्द कारण दाखविण्याकरिता दिनांक २७/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता मेमो दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

**आज दि.२४/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित /-** | **स्वाक्षरित /-** |
| **(एस.व्ही. भोसले)** | **(अ.ज. सय्यद)** |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहाय्यक अधिक्षक** |

**दिवाणी न्यायालय व. स्तर, उमरगा**

